म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

४

नाटक

THE

# NALA NÁTAK

## A MARATHI DRAMA

IN FIVE ACTS

COMPOSED

BY

THE MAHARASHTRA JANA PRABODHA
KAVITA PRASARAK MANDALI.

WITH THE ASSISTANCE OF

VINAYAK MAHADEV SHASTRI NATU

AUTHOR OF A MARATHI WORK ENTITLED

" GANESH PRATAP. "

CORRECTED BY

VED SHASTRA SAMPANNA

YADNESHVAR CHIMNAJI SHASTRI

SANSCRIT TEACHER IN THE ELPHINSTONE CENTRAL SCHOOL

SERIES No. I.

BOMBAY.

PRINTED AT GANPAT KRISHNAJI'S PRESS,
1862.

N - 6

पुस्तक पहिलें.

# नलनाटक.

पंचांकी

महाराष्ट्र जन प्रबोध कविता प्रसारक मंडळीनें

"गणेश प्रतापाचे" कर्ते

**विनायक महादेव शास्त्री नातु**

यांच्या

सहायतेनें केलें;

तें

एलफिनूस्तन् शाळेंतील संस्कृत शिक्षक

**वेद शास्त्र संपन्न यज्ञेश्वर चिमणाजी शास्त्री**

यांनी

शोधिलें;

तें

## मुंबईंत

गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापिलें.

सन १८६२.

TO

# BHAU DAJI ESQ^R. G. G. M. C;

HER MAJESTY'S JUSTICE OF THE PEACE; FELLOW OF THE BOMBAY UNIVERSITY; MEMBER OF THE BOMBAY BRANCH OF THE ROYAL ASIATIC SOCIETY, BOMBAY GEOGRAPHICAL SOCIETY; PRESIDENT OF THE MARATHI DNYAN PRASARAK SABHA;

&c &c &c

THIS HUMBLE ATTEMPT AT THE DIFFUSION OF MARATHI DRAMATIC LITERATURE IS MOST RESPECTFULLY DEDICATED AS A TOKEN OF APPROBATION OF HIS ZEALOUS AND ENERGETIC LABOURS IN THE PROMOTION OF THE CAUSE OF NATIVE EDUCATION ON THIS SIDE OF INDIA.

BY

THE MAHARASHTRA JANA PRABODHA KAVITA PRASARAK MANDALI.

## भाऊ दाजी, इस्क्वायर. जी. जी. एम. सी.

हर म्याजेस्टीस जस्टिस ऑफधि पीस; फेलो ऑफूधि
बॉंबे युनिव्हर सिटी; मेंबर ऑफूधि बांबें ब्रांच
ऑफूधि रॉयल एशीयाटिक सोसाएटी;
जीऑग्र्याफिकल सोसाएटी;
मराठी ज्ञान प्रसारक सभेचे
अध्यक्ष; इत्यादि.

यांस

एतद्देशीय लोकांमध्यें विद्या वृद्धि करण्यांत
त्यांच्या झटून उद्योगाकरितां महाराष्ट्र जन
प्रबोध कविता प्रसारक मंडळीनें काव्य
नाटकीय मराठी भाषेच्या प्रसारा-
करितां सरल प्रयत्न रूप हें
पुस्तक करून मोठ्या
विनय भावानें

नजर केलें असे.

# प्रस्तावना.

हल्लीं इंग्रेज सरकार आपल्या उदार हस्तानें बुद्धिमान् व विद्वान् लोकांस आश्रय देत आहे व ज्ञानाची अभिरुचि ही सर्वांमध्यें बरीच वृद्धिगत होत आहे, ह्मणून पुस्तकें छापून प्रसिद्ध करवावीं व नवीन नाटक व संवादरूपानें ज्ञात्यांची तृषा हरण करावी व अज्ञानांस ज्ञानाचें खाजें द्यावें, ह्या हेतूनें आह्मीं एक मंडळी स्थापून एका कवीच्या आश्रयानें हें " **नलनाटक** " छापिलें आहे. उत्तरोत्तर अनेक प्रकारचीं पुस्तकें छापवूं. प्रथमतः नल दमयंतीचें आख्यान घेण्याचें कारण हें कीं त्यापासून वाचणारांस अनेक प्रकारचा उपदेश व्हावा. ह्या आख्यानावरून त्यांस पहिल्यानें तर असें समजेल कीं हल्लीं लाहान पणींच मुलांचीं लग्नें करून त्यांचा कांहीं अंशीं आईबाप नाश करितात त्या प्रमाणें पूर्वीं लाहानपणीं लग्न करण्याची रुढी नसून, तरुण वयांत स्त्री पुरुषाचें परस्पर मतानें व प्रीतीनें लग्न होत असे. तेणें करून ते किती सुखी होते बरें ?

( २ ) आपणांस ह्यांत सचोटीचें व खरेपणाचें ही उदाहरण फार चांगलें सांपडतें. द्यूतानें मनुष्याचा नाश कसा होतो व द्यूताचें व्यसन हळूहळू कसें लागतें ह्याविषयीं नलराजाची स्थिति पाहिली असतां, राज्यतर काय, पण त्यानें आपलें सर्वस्वीं हरविलें — हें कळून द्यूत अनर्थकारक किंवा घातक आहे असें समजून घेवून त्याचा त्याग करण्यास प्रवृत्त व्हावें. कारण मोठाल्या सधन पुरुषांची आणि राजांची हीं नुसत्या फांस्यानें दुर्दशा उडवली, तर मग तेथें आपला परिणाम काय ?

( ३ ) विपत्तींत जी पत्नि पतीस सोडित नाहीं तीच एक साध्वी होय. पाहा, नलावर कसकशीं संकटें येऊन पडलीं. हरहर ! त्यानें वनवास भोगिले, उपोषणें काढिलीं, रात्रीचे दिवस

केले, एकांबर फिरला, परंतु दमयंती त्यास सोडून पितृ गृहीं गेली काय ? कित्येक स्त्रिया नुसत्या पैक्याच्या मात्र असतात. त्यांचे पति अंमळ संकटांत आले असतां त्यांस त्या त्यजून जातात. पुन्हा चढत्या कळेंत त्यांचा अंगीकार करितात. परंतु अशा प्रकारची दमयंती नव्हती. ह्या सर्व वर सांगितलेल्या गुणांची हल्लींच्या लोकांत कमताई वाटल्यामुळें त्यांचा प्रसार करण्याकरितां एक निराळें पुस्तक काढणार होतों. परंतु हे लावण्याकरितां एकादी गोष्ट कल्पावी किंवा फक्त उपदेश करावा ह्यापेक्षां कांहीं पुराणांतील गोष्ट घेऊन त्यांतील उदाहरणें घ्यावीं हें चांगलें वाटलें, ह्मणून नलदमयंतीआख्यान निवडून लिहिलें आहे. ह्यापासून सर्व प्रकारच्या लोकांस गुणच होईल: ह्मणजे लहान मुलांस व मुलींस, तरुण पुरुषांस व स्त्रियांस व वृद्ध जनांसही हें लहानसें पुस्तक किती उपयोगी पडेल हें आह्मी सांगणें नलगे. हें आख्यान बहुतेक कवींनीं रचलें असेल, परंतु आपल्या लोकांमध्यें प्रसिद्ध होण्याजोगें नाहीं, रघुनाथ पंडित, मोरोपंत, इत्यादिकांनी हें केलें आहे खरें, परंतु फारच लहान असून केवळ कथा भाग सांगितला आहे. त्यांत कित्येकांस गोडी लागेल कित्येकांस नाहीं. नाटकांत कोणी चव घेत नाहीं असा विरळा. आणि नाटकांची भाषा नुसते कथेपेक्षां चांगली व मनांत ठसण्याजोगी असून सुबोध असते ह्मणून हा ग्रंथ नाटक रूपानें लिहिला आहे. आणखीं हा ग्रंथ लोकांस पुनःपुनः वाचण्याची इच्छा उत्पन्न व्हावी ह्मणून हा केवळ गाथाबद्ध किंवा गद्यांतच न रचतां ह्यांत पद्य रचना बरीच आहे. एकाच प्रकारची कविता नाहीं. अनेक चालीवर पदें, लावण्या, कटाव, इत्यादि करून, कांहीं आर्या, श्लोक, दिंडया, साक्या, अभंग, ओव्या, ह्यांचा भरणा आहे. कित्येकांस इतक्यांत ही चव नलागली तर त्यांच्या करितां ठुमऱ्या, होऱ्या, दादरे, गझल आदिकरून चालीच्या कविता आहेत ह्यांतून ज्या वर चाली लिहिल्या पाहिजेत व राग लिहिले पाहिजेत त्यावर तसतसें

केलें आहे. श्लोकांवर त्यांचे छंद लिहून अंमळ कठीण शब्दांच्या टीपा त्यात्या पत्राच्या खालीं दिल्या आहेत. कवितेचा अर्थ तेव्हांच समजावा ह्मणून पदें पाडलीं आहेत. कित्येक वाक्यांस शास्त्रांतून संस्कृतप्रमाणें दिलीं आहेत.

हा ग्रंथ आमच्या अल्पमतीनें शुद्ध करून त्यावर विद्यागुण संपन्न **यज्ञेश्वर चिमणाजी शास्त्री** ह्यांनीं तो तपासून जागोजागीं शुद्ध केला आहे. तथापि ह्यांत दोष कदाचित् राहिले असतील व कोठें कोठें नजरचुका असतील. परंतु आमची सुज्ञांस अशी विनंति आहे कीं त्यांनीं दोषाकडे लक्ष न देतां ह्यांतला सारच ग्रहण करावा. तशांत आमचा पुस्तकें छापण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे, ह्यास्तव आह्मांस ह्यांत उत्तेजन मिळाल्यास उत्तरोत्तर चांगलीं चांगलीं पुस्तकें काढून लोकांचें मनोरंजन करून त्यांची वाचन तृषा हरण करूं, अशी आमची आशा आहे.

**मंडळी.**

**मुंबई माहे मे सन १८६२.**

[illegible stamp]

केले, एकांबर फिरला, परंतु दमयंती त्यास सोडून पितृ गृहीं गेली काय ? कित्येक स्त्रिया नुसत्या पैक्याच्या मात्र असतात. त्यांचे पति अंमळ संकटांत आले असतां त्यांस त्या त्यजून जातात. पुन्हा चढत्या कळेंत त्यांचा अंगीकार करितात. परंतु अशा प्रकारची दमयंती नव्हती. ह्या सर्व वर सांगितलेल्या गुणांची हल्लींच्या लोकांत कमताई वाटल्यामुळें त्यांचा प्रसार करण्याकरितां एक निराळें पुस्तक काढणार होतों. परंतु हे लावण्याकरितां एकादी गोष्ट कल्पावी किंवा फक्त उपदेश करावा ह्यापेक्षां कांहीं पुराणांतील गोष्ट घेऊन त्यांतील उदाहरणें घ्यावीं हें चांगलें वाटलें, ह्मणून नलदमयंतीआख्यान निवडून लिहिलें आहे. ह्यापासून सर्व प्रकारच्या लोकांस गुणच होईल: ह्मणजे लहान मुलांस व मुलींस, तरुण पुरुषांस व स्त्रियांस व वृद्ध जनांसही हें लहानसें पुस्तक किती उपयोगी पडेल हें आह्मी सांगणें नलगे. हें आख्यान बहुतेक कवींनीं रचलें असेल, परंतु आपल्या लोकांमध्यें प्रसिद्ध होण्याजोगें नाहीं. रघुनाथ पंडित, मोरोपंत, इत्यादिकांनी हें केलें आहे खरें, परंतु फारच लहान असून केवळ कथा भाग सांगितला आहे. त्यांत कित्येकांस गोडी लागेल कित्येकांस नाहीं. नाटकांत कोणी चव घेत नाहीं असा विरळा. आणि नाटकांची भाषा नुसते कथेपेक्षां चांगली व मनांत ठसण्याजोगी असून सुबोध असते ह्मणून हा ग्रंथ नाटक रूपानें लिहिला आहे. आणखीं हा ग्रंथ लोकांस पुन:पुन: वाचण्याची इच्छा उत्पन्न व्हावी ह्मणून हा केवळ गाथाबद्ध किंवा गद्यांतच न रचतां ह्यांत पद्य रचना बरीच आहे. एकाच प्रकारची कविता नाहीं. अनेक चालीवर पदें, लावण्या, कटाव, इत्यादि करून, कांहीं आर्या, श्लोक, दिंड्या, साक्या, अभंग, ओव्या, ह्यांचा भरणा आहे. कित्येकांस इतक्यांत ही चव नलागली तर त्यांच्या करितां ठुंबऱ्या, होऱ्या, दादरे, गझल आदिकरून चालीच्या कविता आहेत ह्यांतून ज्या वर चाली लिहिल्या पाहिजेत व राग लिहिले पाहिजेत त्यावर तसतसें

केलें आहे. श्लोकांवर त्यांचे छंद लिहून अंमळ कठीण शब्दांच्या टीपा त्यात्या पत्राच्या खालीं दिल्या आहेत. कवितेचा अर्थ तेव्हांच समजावा ह्मणून पदें पाडलीं आहेत. कित्येक वाक्यांस शास्त्रांतून संस्कृतप्रमाणें दिलीं आहेत.

हा ग्रंथ आमच्या अल्पमतीनें शुद्ध करून त्यावर विद्यागुण संपन्न **यज्ञेश्वर चिमणाजी शास्त्री** ह्यांनीं तो तपासून जागोजागीं शुद्ध केला आहे. तथापि ह्यांत दोष कदाचित् राहिले असतील व कोठें कोठें नजरचुका असतील. परंतु आमची सुज्ञांस अशी विनंति आहे कीं त्यांनीं दोषाकडे लक्ष न देतां ह्यांतला सारच ग्रहण करावा. तशांत आमचा पुस्तकें छापण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे, ह्यास्तव आह्मांस ह्यांत उत्तेजन मिळाल्यास उत्तरोत्तर चांगलीं चांगलीं पुस्तकें काढून लोकांचें मनोरंजन करून त्यांची वाचन तृषा हरण करूं, अशी आमची आशा आहे.

**मंडळी.**

**मुंबई माहे मे सन १८६२.**

# नलनाटक.

## अंक १.

### पात्रें.

सूत्रधार. ........................ नाटककर्ता.
नट. ........................ त्याचा सोबती.
सरस्वती. ........................ रंगदेवता.
नलराजा. ........................ निषध देशचा राजा.
दमयंती. ........................ भीमक राजाचीकन्या.

प्रधान, सेनापती, चोपदार, पौरकन्या व नागरिक स्त्रिया, दासी, मालिनी स्त्रिया व राजहंस पक्षी.

### प्रवेश १.

**स्थल ........................ रंगभूमी.**

**सूत्रधार, नट व सरस्वती.**

**सूत्रधार**— आर्या.

जय गजवदना यावें, नाटकरंगांत विघ्न हाराया[१] ॥
ज्याचें नाटक करितों, पुण्यश्लोकीं नलाख्य[२] हा राया ॥ १ ॥

**श्लोक.**

शिखरिणी छंद.

तुझे पादाब्जाचे परिमलपरागास[३] जितुके ॥
सदा भृंगा[४] ऐसे नरवरभवीं[५] मुक्त तितुके ॥
अशासाठीं देवा गणपति सुनामा वदनिं दे ॥
तरीं पापाब्धीतें[६] तरुन तुझि गा सेविन पदें ॥

**पद**

( रंगणीं तुं येइ आतां ॥ शीघ्रगणपती ) ॥ या चालीवर

---

१ हरण करण्यास. २ नल नामक ३ कमलांतील सुवासिक पीत पदार्थ
४ भ्रमरासारिखे. ५ संसारांत ६ पाप समुद्रास

रंगमंडपीं तुं ये ॥ अतां विघ्नहरा ॥ धृवपद ॥
सिध्दि बुद्धि धरुनि हातिं ॥ वरदकरा करुनि वर्ति ॥
सुभंग[2] आजि रंगभरी ॥ अशा दे वरा ॥ १ ॥ सदयपणें
न्हृदयिं धरी ॥ पाप ताप दैन्य[3] हरी ॥ प्रेमभरें माझे
शिरीं ॥ ठेव पुष्करा ॥ २ ॥ काम क्रोध मुख्य जाण ॥
असे सांहि[5] शत्रु जीर्ण । दया सत्य शौच[6] शांति ॥
मोद दे खरा ॥ ३ ॥ विनायकास आसमास[9] ॥ ध्यास
हाच होतसे ॥ वृत्ति माझि हरिपदीं ॥ भक्त प्रिय-
करा ॥ ४ ॥

नट० — ( पुढें येऊन मोठा आनंद पावून, हास्यकरून इकडे तिकडे फिरून सभेस अवलोकन करित होत्साता, आनंद लहरी जिरवून, स्थिर बुद्धि करून ह्मणतो. ) तूं मुख्य दया, सत्य, शौच, शांति, मोद खरा मागतोस. तूं मोठा मागणारांत चतुर आहेस. तुला विघ्नहर प्रसन्न होऊन तुझें सर्व कार्य परिपूर्ण करिताहे, हें मंगल पुरे कर. आतां श्रीसरस्वतीचें मंगल करावें ह्मणजे कृतार्थ होशील.

सूत्र० —

### पद.

जोगीराग.

( माझा कृष्ण देखिला काय ॥ कोणि तरि सांगाहो ) याचालीवर

जय जय सरस्वती तूं ये ॥ दासास दर्शनदे
॥ धृ ॥ हरिहर ब्रह्मादिक हे अमरें[11] ॥
वाल्मिक व्यासादि कवीश्वर ॥ तुझे भजनीं
अति सादर ॥ ज्ञानिवर[12] ह्मणुनी ते ॥ १ ॥तुझी नसतां
कृपादृष्टी ॥ ह्मणुनी जग हें होतें कष्टी ॥ निजभजकांवर
करुनी तुष्टी[13] ॥ राखिशि पृष्ठी दासाची ॥ २ ॥ त्रिगुणात्मक[14]

१ वर देणारहात. २ चांगला. ३ दारिद्र. ४ गजशुंडाग्र. ५ साहा शत्रु काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर ६ अंजिक ७ शुद्धि. ८ हर्ष. ९ स्वस्वरूपानंद. १० निरंतर ११ देव १२ अधिक ज्ञानी. १३ संतोष. १४ सत्व, रज, तम हे तीन गुण आहेत ज्यामध्यें.

तूं मयुरासना ॥ वीणा धारिणि मृगलोचना ॥ कुंदेंदु[1]
निर्मल श्वेतवसना ॥ प्रसन्न मना त्वां यावें ॥ ३ ॥
गुण[2] लिंगें[3] दोष[4] तीन ॥ पंचतत्वीं[5] मेळउन ॥ विश्वनाटक
अंबे करुन ॥ मायिक जन भुलवीशी ॥ ४ ॥

सूत्रधारानें नटाच्या उपदेशावरून श्रीसरस्वतीची प्रार्थना केली त्याकाळीं सरस्वती प्रसन्न होऊन सूत्रधारास दर्शन देत होत्साती सभेंत प्राप्त झाली.

**सूत्र०**— ( मोठा आनंदभरित होऊन कर जोडून विनयभावें करून श्रीसरस्वतीपाशीं मागणें मागतो. )

## श्लोक.

शार्दूल विक्रीडित छंद.

अंबे या भुवनास मोदलहरी शृंगारदा[6] दूसरी ॥
तूझेवीण नसे ह्मणून नमतो[7] हा दास पायांवरी ॥
रंगें पूर्ण सभा भरोनि सुलभा वाणी रसें साजिरी ॥
माझी त्वां करणें त्वद्दींच[8] भरणें स्वानंद गे यावरी ॥ १ ॥

**सरस्वती०**— (सुप्रसन्न होऊन सूत्रधारास वरदान देती झाली)

## ओंव्या.

प्रेमल भक्तस्तुती ऐकुन ॥ शारदा[9] झाली सुप्रसन्न ॥
वरदकर मस्तकीं अर्पुन ॥ वरदान अर्पी सूत्रधारा ॥ १ ॥
तुझें असो सदा कल्याण ॥ नाटकीं रंग भरीं परिपूर्ण ॥
होशी सभेशीं सुखकारण ॥ माझे वरदान[10] सूत्रधारा ॥ २ ॥

सरस्वतीनें सूत्रधारास वर अर्पण केल्यावर गमन केलें.—इतक्यांत पडद्यापलीकडून शब्द झाला "त्वराकरा त्वराकरा रात्रि अतिक्रम फार झाली सभारंजक सोंगाची तयारी करावी यापुढें उशीर करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं."

---

१ कुंद पुष्प व चंद्रासारिखें आहे स्वस्छ पांढरें वस्त्र जीचें २ सत्व, रज, तम. ३ स्त्री, पुरुष, नपूंसक. ४ कफ, वात, पित्त. ५ पृथ्वि, आप, तेज, वायु, आकाश. ६ शृंगार देणारि· ७ लीन होतो ८ त्वदयींच ९ सरस्वती. १० त्रितिया विभक्ति= आशिर्वादानें.

**नट०—** ( पडद्यासमोर उभा राहून ह्मणतो. ) हे सभानायकहो, सावधान सावधान; निद्रा, आलस दूर करून प्रस्तुत खेळाची तयारी झाली आहे इकडे चांगलें अवधान द्यावें ह्मणजे आह्मांस सूत्रधाराचे आज्ञेप्रमाणें खेळाचा गौरव करण्यास आनंद राहील.

याप्रमाणें नटानें सभासदांची प्रार्थना केल्यावर पडद्यापलीकडून "मेहेरबान मेहेरबान" असा दोन चोपदारानीं शब्द केला.

## प्रवेश २

### स्थल . . . . नलाचें दरबार.

### चोपदार, नलराजा, प्रधान, पौरकन्या व नागरिक स्त्रिया.

**चोपदार[१]-**( सभेंत येऊन ललकारणी करून ह्मणतात ) जो सोमवंशीका गुणगंभीर, धीर, वीर. उदार, शूर, रूपसंपन्न वीरसेन राजाका पुत्र पुण्यश्लोक नलाख्य राजेकी स्वारी आतीहै.

**नलराजा—** ( याची स्वारी सभेंत येतांच सभासदांनीं भरताजीम दिली असतां राजा सिंहासनावर बसून प्रधानादिक राजसेवक यांस पुसतो. ) हे सेवकहो, प्रजा यथा नीतीनें वर्तणूक करितात कीं ? त्यांचें पालन पदाधिकारी राजनीतीनें व दयालुपणानें करितात कीं ? पर्जन्य यथाकाळीं वर्षाव करिताहे कीं ? गोअश्वशाळा तुमुल पुष्ट आहेतकीं ? ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण निरुपद्रव शांत दांत[२] तपाचरण करितात कीं ? स्त्रिया केवल पतिपरायण[३] राहून पतिसेवा करितात कीं ? रसेंरस परिपूर्ण आहेत कीं ? राजसेवक आपले कामांत निरालस निःस्पृह वागतात कीं ?

**प्रधान ०—** ( राजाचे भाषण ऐकून वारंवार नमन करीत होत्साते करकमळें जोडून उत्तर देतात. ) हे राजन्,

### आर्या

राजान् शासनानें[४] सर्वहि राष्ट्रीं यथानिती आहे ॥

---

१ कामदार. २ समयीं इंद्रियें दमन करणारे ३ पतिसेवा तत्पर.
४ राजाचाशिक्षेनें.

प्राशन सेवक करिती राजाज्ञामृत करोनि गा आहे ॥ १ ॥

**नल** ० —( प्रधानापासून सर्व राज्यकारभार श्रवण करून राजा प्रसन्न मानस होत्सातां सेवकांस आज्ञा करितो.)आज मृगयेस जाणें अवश्य आहे, तस्मात् लवकर तयारी करा.

**सेनापती** ०—( पुढें येऊन राजपदाचें अभिवंदन करून बोलतो.)

### आर्या.

द्वारीं सिद्ध असे गज रथ वाजी[2] चातुरंग ही सेना ॥
मारूं मृगया व्याजें[3], घातक शार्दूल[4] रीसें[5] हीं[6] सेनां[7] ॥ १ ॥

राजानें सेनापतीची हुशारीपाहून, सेनाशस्त्रास्त्रें सिद्ध अवलोकन करून, रथारूढ होऊन, सेनेसहवर्तमान मृगया करण्याकरितां नगरांतून बाहेर निघतेसमयीं.

**पौरकन्या व नागरिकस्त्रिया** ( गवाक्षद्वारें[8] राजाची स्वारी पाहून रत्नदीप घेऊन, राजास आरती करून, लाजा ह्मणजे लाह्या राजावर उधळून परस्पर ह्मणतात. )

### ओंव्या.

याचें पाहातां राजस वदन ॥ चंद्र दिसे गे कलाहीन॥
मन्मथ[9] सांडावा ओंवाळुन ॥ पदनखावरून सयेबाई ॥ १ ॥
अगणित पुण्य जिचें पदरीं ॥ तीच वरिल गे याशिं नारी ॥
लावण्यराशी नरकेसरी[10] ॥ उर्वीवरी[11] मंडण[12] हें ॥ २ ॥

या प्रकारें महोत्साहें नगराबाहेर नलराजा निघून प्रवेश करिता झाला.

## प्रवेश २.

**स्थल. . . . . . . . . अरण्य.**

**नलराजा, राजहंस पक्षी व सेना.**

### कटाव.

नलाख्य राजा सेनेसहित ॥ प्रवेश करि जा अरण्यांत ॥ तरुवर[13] गेले

---

१ मुख पतरून २ घोडे ३ निमित्यानें ४. वाघ ५. अस्वल. ६ आणखी ७ सेनपक्षी ८ खिडकीमधुन. ९ मदन. १० नरसिंह. ११ पृथ्वीवर १२ भूषण. १३ मोठालेवृक्ष.

गगन भेदित ॥ बकूल केतकी सुवास भरित ॥ चंपक पिस्ते बद[1]-रि अनंत[2] ॥देवदारु चंदन ख्यात[3]॥ कृ[4]ष्णागर वर पारिजात ॥ साग शीसवे बिनले रात ॥ खैदिर[5] खीरण्या निंब तमाल ॥ शाल्[6]मलि अक्रोड पिपूरि शाल ॥ सात्विणि कांचन सुरु ते सरल ॥ मोहो पिं-पळ काजु विशाळ ॥ रातांजन[7] वट धूप ताल[8] ॥ जांभुळ पेरु क-मरि आमल[9] ॥ आंबे फणशी साल ढोल ॥ खजुरि नारळी शिंदी बेल ॥ नाणें उंबर अळु ते सुफल ॥ किति वर्णावे नाना तरुस ॥ ऐसे वनीं मृगयेस ॥ राजा फिरे आसमास ॥ धृ ॥ १ ॥ नाना औषधि मवालवेल्ली[10] ॥ तगर कूसरी कुंदचमेली ॥ मधूमालती ना-गवेली ॥ बट्टमोगरा मदन शेवती ॥ गुलूछबु गुलाब श्वेतमालती ॥ जपाकुसुम[11] गोकर्ण जाती ॥ सद्गुलाब जे त्रिकाल[12] फुलती ॥ रासतुरे अणि दवण शेवती ॥ अवनी[13] भेदुन चंपक फुलती ॥ कोऱ्हाढी त्या चार सुवर्ण ॥ मोति मोगरे मन्मथबाण[14] ॥ नेबाळी त्या अनेक वर्ण ॥ तेर्डे कुटजें मधुर सुवास ॥ दौणा मर्वा सब्जे तुळस ॥ मखूमाली फुल आलि भरास ॥ ऐसे वनीं मृगयेस ॥ राजा फिरे आसमास ॥२॥गवे लांडगे[15] ससे सांबरें ॥ रोहिले[16] आश्वल चिते भेकरें ॥ कोल्हे माकड नील वानरें ॥ व्याघ्र हत्ती रानमांजरें ॥ केसरि भालू त्या वनगाई ॥ पादोदर[17] ते ठाईं ठाईं ॥ कस्तुरि मृग कुरंग[18] डोळस ॥ उदें बागुलें अणि ते तरस ॥ मुख्य वर्णिलें सावजांस ॥ ऐसे वनीं मृगयेस ॥राजा फिरे आसमास ॥ ३ ॥ चातक चिमण्या. काकाकूवे ॥ सेन खंजरिट कपोत रावे[19]॥घुले सारस गीध पार वे ॥ रानकोंबडीं कवडे घार ॥ लावे रंजक घुले सुतार ॥ नानारंग रंगित मोर ॥ सार्य[20] घोर्पडी नकुळ[21] चकोर ॥ द्रोणकावळे[22] घुबडे तार ॥ ठाईं ठाइं उदक झझर ॥ तळीं पल्वलें[23] पंकज[24] भार ॥ रुंजति

---

१ बोर. २ वृक्ष विशेष. ३ प्रसिद्ध. ४ काळा चंदन. ५ खैर ६ सांवरी. ७ कोकम. ८ ताड. ९ आंवळी. १० पोंवळीवेल. ११ जासवंद १२ निरंतर. १३ पृथ्वी १४ मदनबाण मोगरा — पुण्यांत प्रसिद्ध आहे. १५ महिषी विशेष. १६ जनावर विशेष. १७ सर्प. १८ हरिण. १९ पोपट. २० साळू. २१ २२ डोमकावळे. २३ संचितोदक २४ कमल.

वर्ती काळे भ्रमर ॥ बुड्या मारिती बदकें फार ॥ मछ घातकी बगळे शुभ्र ॥ पानकोंबडीं निरीं अपार ॥ चक्रपक्षी जळीं सूरस॥त्या वनि आले तेव्हां हंस ॥ ऐसे वनीं मृगयेस ॥ राजा फिरे आस मास ॥ ४ ॥

नलराजा वनीं मृगयेस फिरत असतां तें वन पक्षिगणास[२] राहण्यास[१] रम्य, तेथें पक्ष्यांचासमुदाय फार असे; यास्तव सत्यलोकीं राहाणारे, मौक्तिकाचा[३] चारा खाणार, असे अंग तेजें दैदीप्यमान हंस त्या वनीं क्रीडा करण्या करितां प्राप्त झाले, त्यांनीं नलराजास अवलोकन करून व त्याचें स्वरूप पाहून ते फार आश्चर्य पावले आणि परस्पर ह्मणतात.

**राजहंस** ० — या राजा सारिखा देव गंधर्व मनुष्यांत लावण्य नाहीं, याचा दमयंतीशीयोग केला असतां जोडा चांगला शोभेल, विवाह कार्याची खटपट केली असतां लौकिक व पुण्य आहे.

असें आपल्या भाषेंत बोलून त्यांतील एक हंस परकार्या विषयीं दक्ष[४] असा उड्डाण करून, राजाच्या गळ्यांत शुक्र बृहस्पतीसारिखी तेजःपुंज मौक्तिकमाला होती, तिजवर झेप घालून राजाचे हातावर बसला असतां राजानें पक्षी पाहिला, तो केवळ चित्र विचित्र मनोरम रत्नकांती; यास पिंजऱ्यांत घालून मंदिरांत ठेवावा या हेतूनें हळूच करायानें धरिला.

**हंस** ० — ( मनुष्यवाचेनें राजाशीं भाषण करितो. ) अगा राजन्, मी सत्यलोकीं राहणारा हंसपक्षी. मला धरूं नको. जर सोडशील तर जन्मपर्यंत सौख्य पावशील असा उपकार करीन.

## आर्या.

जित जरि सोडिशि मातें, येइन तूझे बहूत कामातें ॥
घडविन ऐशा लाभा नाहिंच इंद्राग्नि चंद्र कामा तें ॥ १

---

१ पाण्यांत. २ पक्षीसमुदायास. ३ मोती. ४ कुशल.

# नलनाटक.

## लावणी.

मुलतानींत किंवा सारंगांत
( अधरपुटीं बतीस हिरकण्या, एका ओळिनें विराजती )
याचालीवर.

जित जरि सोडिशि, उपकारार्शी फेडिन आतां नलराया ॥ भीमककन्या दमयंती अंशि[1], मिळउन देइन तुज जाया[2]॥धृ०॥जीचे पाहुन वदनेंदूला[3], चंद्र शरीरीं क्षय झाला॥ भुजंग वेणी लक्षुन जीची, लज्जा कालिय सर्पाला ॥ होउन शिरला कालिंदीचे. डोहीं लववी वदनाला ॥सरक्त[4] पाहुन अधरें[5] तिचे नीरसत्व[6] विद्रुमवल्लीला[7]॥डोळे पाहुन सुभग[8] जिचे गा कुरंग[9] चंद्रा आड लपला ॥ शंखें तीची ग्रीवा[10] पाहतां, दरिद्र आलें जगिं त्याला ॥ तीचा दंतप्रकाश पडतां, हिरकणि भूमधिं धरि ठायां ॥ १ ॥ पीन पयोधर[11] संगिनें[12] पाहुन, चक्रवाकें दुर होती।भुजदंडाची शोभा पाहुन, ग्रस्त[13] शोकें वनिं हत्ती ॥ कृश[14] कटि मृदुतर लक्षुनि सिंहिणि, प्रसूतकाळीं त्या मरती ॥ पीवर मांड्या[15] पाहुनि तीच्या, कर्दळि[16] पसउनि[17] जिव देती॥नासाग्रातें[18] पाहुन क्रोधें, रक्तानन[19] ते शुक[20] होती॥ मधूर वाणी ऐकुन तीची, कोकिल काळे वनिं फिरती ॥ करांग्राची[21] शोभा पाहुन, गेली रक्तोत्पल[22] वाया ॥ २ ॥ जीचा फांके अंगसुवास, क्रोशावधि[23] गा अवनिपती ॥ वसंत वेष्टुन तीचे सदना, भोंतीं फिरतो करि खंती ॥तीचें पाहुन गमन गजेंद्र हि, घाली गंडावर माती ॥ मयूर पिच्छाहुन तें कोमल, शरीर तीचें वर्णुं किती ॥ शिरीष चंपक पुष्पांहुन

---

१ यांत वर्णन केलेली. २ स्त्री ३ मुख चंद्राला. ४ तांबडे ५ ओंठ. ६ रसहीनत्व. ७ पोंवळ्याच्या वेलीला. ८ चांगले. ९ हरिण. १० मान. ११ मांसल पयोधर. १२ संगाती राहणारे. १३ ग्रासलेला १४ बारिक. १५ मांसल मांड्या. १६ केळी. १७ प्रसूत होऊन. १८ नाकाचाबोंडीस. १९ लाल तोंडाचे २० राघु २१ हाताचे पणजे २२ तांबडीं कमलें २३ कोप पावतो.

गा, गोरी आहे तनु[1]कांती॥ सौंदर्यो[2]दधि लहरिच केवळ, भीमक[3]जा ती दमयंती॥ब्रह्मांडींच्या गाळुन हर्षा, ओतिलि तीची मुखचर्या ॥ ३ ॥रंभा[4] उर्वशि[5] आणि सुकेशी, मंजुळघोषा तिलोत्तमा ॥ सुरांगना त्या नागकन्या, रोहिणि[6] इंद्रा[7]यणि रामा ॥ तीतें पाहुन लाजति सान्या, सौंदर्याची अशि सीमा ॥ या भूमीवर मानवकांता, चरणांगुष्ठीं निरूपमा ॥ गुणरुप तीचें वर्णन करिती, संज्ञा[8] छाया उमा[9]रमा॥ चतु[10]र्मुखानें अपूर्व रचिली, कला[11]वंती ती गुणधा[12]मा ॥ अनंत कोटी सुकृ[13]त गांठी, विभाग त्याची ती भार्या ॥ भीमक कन्या दमयंती अशि, मिळउन देइन तुज जाया ॥ ४ ॥

असें दमयंतीचे रूपगुणांचें वर्णन हंसमुखें श्रवण करून राजाच्या मनांत आलें कीं " अशी स्त्री आपणास वरील तर आपले रूपास योग्य असून संसारांत सुख निर्दोष होईल."

नलराजा— हे सन्मित्रा, तूं पक्षी असून परम चतुर, देशोदेशीं गमन करणारा, व परोपकारशील आहेस, तर अशा दमयंतीचा लाभ मला घडेल असें अविलंबें करावें ह्मणजे मजवर मोठा उपकार होईल.

## श्लोक.

### द्रुत विलंबित छंद.

फिरउनी द्विज या वरुनी करा॥
नल तया वदला गमना करा ॥
मज तिचा अति घोषच लागला ॥
मनिं तुं पाड तिचे श्रम चांगला ॥१॥

## आर्या.

पुण्येच्छु जो या जगिं, करितो जपुनी परोपकाराशीं ॥
स्वर्गी त्या वाम घडे, त्यजि परपीडा क्रियाविकाराशीं ॥१॥

---

१ शरीर कांती २ सौंदर्य समुद्र लाट ३ भीमककन्या. ४ मुख्य अप्सरा ५ चंद्रस्त्री ६ इंद्रस्त्री ७ इंद्रस्त्री ८ सूर्यस्त्रिया ९ पार्वती लक्ष्मी १० ब्रह्मदेवानें ११ कलाजाणणारी १२ गुणाचें घर. १३ पुण्य.

## ओंवी.

नल ह्मणे पक्षीवरा ॥ तूं आतां करिं त्वरा ॥
मज होईल दमयंती दारा॥ ऐसा खरा यत्न करी ॥ १ ॥

याप्रमाणें नलराजानें हंसाची प्रार्थना करून मुक्त केलें.

**हंस॰**— ( नलराजास ह्मणतो. ) हे राजन्, तूं स्वस्थ असावें किमपी चिंता करूंनये. मी दमयंतीकडे जाऊन ती सर्वांचा परित्याग करून तुलाच वरील असें करितों.

## आर्या.

बोले हंस नरेंद्रा, स्वस्थ असावें तुं चार दिवस वरी ॥
तीचे मनि मी भरितों, त्यजुनी देवादिकां नलास वरी ॥ १ ॥

असें नलराजास आश्वासन देऊन सर्व हंस जातिसहवर्तमान गगनमार्गें उड्डाण करून, वैदर्भदेशीं गमन करून दमयंतीचे उपवनांत क्रीडा करून राहिले.

## प्रवेश ४.

## स्थल — दमयंतीचें उपवन.

**दमयंती, मालिनी स्त्रिया दमयंतीचा सख्या व राजहंस.**

ते देवलोकीचे पक्षी, मनुष्यांस त्यांचें दर्शन दुर्लभ असें वन रक्षकांनीं पाहून परम आश्चर्य पावले व त्यांतील मालिनी स्त्रिया नाना प्रकारचीं सुगंध सुमनें घेऊन दमयंतीस अर्पण करून ह्मणतात.

**मालिनीस्त्रिया** ——— हे राजकन्यके, कोमलगात्रें, मृगनयने आपले उपवनांत पक्षी फार उत्तम, कनकपद रत्नकांति, शतशः प्राप्त जाहले आहेत; तेणेंकरून नाना द्रुमलता शोभिवंत दिसतात, असे सुभग पक्षी कधींही पाहिले नाहींत; यास्तव त्यांचें अवलोकन करण्याची मर्जी असेल तर उपवनांत अवश्य आलें पाहिजे. ( असें मालिनीस्त्रियांचे मुखें श्रवण करून पित्याची आज्ञा घेऊन

---

१ स्त्री.

पद्मीणी ऐशा लावण्यवती प्राणसख्या सहस्रशा बरोबर घे-ऊन आपले उपवनीं ह्मणजे बागांत जाती झाली; तेथें आदर्शयुक्त शतखणी बंगल्यांत बसून वृक्षांवर हंस समुदाय पाहून परम आश्चर्य पावली —

**दमयंती** — हे प्राणसख्यांनो, असे पक्षी मृत्यु लोकीं नाहींत देवलोकी राहाणारे आहेत. ( असें भाषण करित आहे, तों मध्यस्ती करणारा राजहंस भूमीवर उतरून इकडे तिकडे फिरूं लागला हें पाहून

दमयंती सख्यांचे फिरण्याचा व भाषणाचा गलबला बंदकरून आपण सोपानमार्गें खालीं उतरून हंसासन्निध गेली तों हंस पुढें गेला, त्याचे मागें दमयंती गेली तों हंस पुन्हा पुष्पवाटिकेंत शिरला; त्यामागें दमयंती पायांतील शब्द करणारीं भूषणें काढून मंदगतीनें गेली, तेथें एकांत स्थल पाहून हंस तिचे हातीं सांपडला. )

**हंस०** — हे राजदुहिते, सौंदर्य खाणी, गुणसीलयोग्ये, मला धरूं नको; यांत तुला किमपी लाभ नाहीं. जर मला मुक्त करिशील तर तुझें रूप गुणास योग्य अश्या पतीचा तुला लाभ होई असें करीन.

### श्लोक.

शार्दूल विक्रीडित छंद.

बोले हंस तिशीं सुहास्यवदनें सोडी मला येधवां ॥
सौंदर्यें तुज योग्य मी कथिन गे लावण्यपुंजे धवा ॥
संसारीं अति योग्य रूप सुगुणी भर्ता जितें लाभला ॥
तीचा जन्म तरीं सुखास्पद सदा वाटे जगाला भला॥१॥

**दमयंती** ( हंसाचें वाक्य श्रवण करून) हे वीहंगमवरा, तूं सुरगुरूसारिखा चतुर आहेस, तुझे दर्शनाचा लाभ मला केवळ कल्याणास कारण दिसतो. मी उपवर असून आपल्यास योग्य वर मिळावा ह्मणून चिंता करित आहें, ती चिंता तूंच

२ जिना. १आरसे महाल २पक्षी.

हरण करिशील; येवढा चितारोग दूर करिशील तर मोठा उपकार होईल.

**राजहंस**—हे लज्जोकृत गजगमने, नैषधदेशी वीरसेन राजाचापुत्र नलनानें करून चौदा वेद्या, चौसटकला, अश्वपरीक्षा,पाकक्रिया, यांत अतिप्रवीण असून, अतिलावण्य आहे. त्यासारिखा देवगंधर्वमनुष्यांत कोणीच नाहीं. अश्विनीकुमर, चंद्र, मदन हे ज्याचें स्वरूप पाहून खिन्न होतात, त्यास तूं वरावें ह्मणजे पार्वती शंकर, व रमाजनार्दन,याप्रमाणें तुमचा जोडा याभूलोकीं विख्यात होऊन शोभेल असें मला मान्य आहे. मलाच मान्य असें नाहीं देवही मान्य करितील —

## श्लोक.

### स्वागता छंद.

या जगांत बघतां नल जैसा ॥ रूपशील सुगुणी नच तैसा ॥
वाजिशास्त्र अणखी बहु विद्या॥त्यास वागति असा नचसद्यां॥

## आर्या.

जोडा गिरजाशंकर, पद्मा नारायणाख्य जो किंवा ॥
तूझा नलयांशि तसा, संभ्रम कविभार ती भजो कींवा ॥१॥
अश्विनि सुतरोहिणीश, रतिपति लावण्य हे नलीसमता ॥
करितांनयेच बोले, सुरसुंदर्य बकावली समता ॥ २ ॥

**दमयंती** ० — ( असें नलराजाचें वर्णन हंस मुखें श्रवण करून प्रतिज्ञा पूर्वक भाषण करिते ) मी पूर्वींच नलाची कीर्ति ऐकिली होती, त्याकाळींच त्यांकडे चित्ताची उत्कंठा होती आतां तर तुझे मुखं त्याचें सांग श्रवण करून माझें मन अत्यंत वेध पावलें. नला खेरीज सर्वपुरुष मात्र पित्याबंधुप्रमाणें मानिले. नलासच वरीन, त्याणें अंगिकार नकेलातर प्राण त्याग करीन, याजकरितां जसी सुदेवब्राह्मणाने पत्रिका पोंहचवून श्रीकृष्णाचा लाभ रुक्मिणीस करविला तसा माझा प्रार्थनापर्वक नलराजास निरोप

१ चंद्र २ मदन ३ सुरसुंदरी — अंबकावली= देवांगनाच्या

# अंक. २

## पात्रें.

सूत्रधार ................ नाटककर्ता.
नट .................. त्याचासोबती.
भीमक ................ विदर्भदेशचा राजा.
दमयंती ............... त्याची मुलगी.
इंद्रादिकदेव ............ स्वयंवरास जाणारे.
नल .................. त्यांचा दूत.

दमयंतीच्या सख्या, मुख्य माता, उप माता, भीमकाचे ज्योतिषी, वैद्य, चोपदार, प्रधान, आचार्य, घड्याळजी, कारकून.

## प्रवेश. १

स्थल............ रंगभूमी.
सूत्रधार .......... नट.

**सूत्रधार.**— हें नटारे, हंस नलराजाचा निरोप घेऊन गेल्यानंतर पुढें काय झालें त्याचा खेळाची तयारी करून सभासदांचें रंजन करावें.

**नट.**— ( अशी सूत्रधाराची सूचनाश्रवण करून, सभेंत येऊन, सभासदां पुढें इकडे तिकडे फिरून, वारंवार मोठें हास्य करीत होत्साता आपलीं अंग प्रत्यंगें वाकडीं तिकडीं करून, आनंदाच्या लहरी जिरऊन, सभासदांस विनंती करितो. ) हे सभासद हो, सावधान, सावधान, दमयंतीचा विवाह संभ्रम[1] आहे, तुह्मास पोषाग हार तुरे यथेष्ट भोजन दक्षणा मिळण्याचा अवसर[2] आहे असें सांगून दमयंतीस बागेंतून सख्या सहवर्तमान भीमकाचे राजवाड्यांत घेऊन गेल्यावर काय झालें.

---

१ समारंभ. २ वेळ.

## प्रवेश. २

### स्थल. ........ दमयंतीचे मंदिर.

दमयंती, सख्या, उपमाता, व मुख्यमाता;

दमयंती आपले मंदिरांत गेली परंतु तिला तें मंदिर उदास वाटूं लागलें, नलाकडे चित्तवृत्तीचा वेध लागून वारंवार कुच स्फुरण होऊं लागलें. शरीरांत मदनाग्नी प्रज्वलित होऊन शरीराचा दाह अत्यंत झाला. तेणेंकरून तिचे नेत्र आरक्त-वर्ण झाले; आरक्त अधर शुष्क पडले; अति उष्ण दीर्घ श्वास टाकूं लागली; आणि अंगावरील तीर्णे सर्व भूषणें काढिलीं; हें पाहून तिच्या सख्या मुग्धा[1] होत्या त्याणीं तिला कांहीं बागेंत उपद्रव झाला कीं काय ह्मणून तिजवरून दहींभाताची मूट[2] ओवाळून टाकून सीतलोपचार करूं लागल्या. हरि-चंदन अंगास लावून वाळ्याचे व्यंजनानें[3] वारा घालूं लागल्या, सीतल कमल पुष्प माळा गळयांत घालत्या झाल्या, आणि गच्चीवर नेऊन चंद्राचे चांदण्यांत शयन करवूं लागल्या परंतु हे सारे सीतल योग असून अग्नी प्रमाणें अधिकच तिचे अंगाचें दहन करूं लागले. तेव्हां त्या सख्यांत कोणी तरुण कामिनी होत्या त्याणीं तिची अवस्था पाहून अंतरखूण समजून तिला पुसतात.

**सख्यातरुणी.**— हे राजदुहिते[4] दमयंती, तुझी एकाएकीं अशी अवस्था कां झाली हें आह्मांपाशीं स्पष्ट सांगावें. आह्मीं तुझ्या जिवलगगडणी[5] आहों आणि यौवनावस्थेच्या अनुभवी आहों, आह्मांपाशीं संकोच धरूंनको.

---

१ किंचित् तारुण्य स्थितींत आलेल्या. २ ओंजळयाभर. ३ पंख्यानें.
४ राजकन्ये. ५ सख्या.

## पद.

जोगी राग.

माझाकृष्ण देखिला काय.

या चालीवर.

साजणी सांग लाजुनको, ह्दयांतिल हेतू ॥धृ॥ अंगी आली कां धवलिमा ॥ शुष्क जाला मुखचंद्रमा ॥ तनुशी झाली कृशता शिमा ॥ काय कामा करितांगे ॥ १ ॥ कशासाठीं करिशी खंती ॥ डोळे लाल तूझे दिसती ॥ चंचल आहे चित्त वृत्ती ॥ निद्रा तुजप्रति नयेच कां ॥ २ ॥ कथाकौतुक अवडेना ॥ तांबुलहीन केलें वदना ॥ चित्त कोठें लागेचना ॥ व्याकुल मना कां असशी ॥ ३ ॥ श्वासोश्वास टाकिशि फार ॥ त्यजिले कां तूं अलंकार ॥ ह्मणे विनायक काम विखार ॥ दुःसह फार विष त्याचें ॥ साजणी ॥ ४ ॥

**उपमाता**— ( जवळ येऊन, तिची अवस्था पाहून, ह्दयीं दमयंतीस धरून मुख कुर्वाळून ह्मणते. ) वोसाजणी इंदुवदने दमयंती, तुझें चित्त फार उदास कशास्तव जाहलें, अंगावर भूषणें कां घालित नाहींस, तांबूल अंजन आदर्श यांचा परित्याग कशास्तव केलास, याचें कारण स्पष्ट सांगावें ह्मणजे आह्मीं तुझें चित्त व शरीर स्वस्थ होईल असा उपाय करूं.

## ओव्या.

उपमाता ये धांवत ॥ ह्दयीं तीतें आलिंगित ॥
करें वदन कुर्वाळित ॥ मग पुसत वृत्त तिशीं ॥ १ ॥
सुगुणराशी दमयंती ॥ कामविकार तुशीं होती ॥
चंचल आहे मनो वृत्ती ॥ ऐशी स्थिती कां झाली ॥२॥
नबोलसी उघड वचन ॥ कोठें गुंतलें तुझें मन ॥

---

१ फिक्केपणा. २ कामसर्प. ३ चंद्रमुखी. ४ आरसा.

## प्रवेश. २

### स्थल. ........ दमयंतीचे मंदिर.

दमयंती, सख्या, उपमाता, व मुख्यमाता;

दमयंती आपले मंदिरांत गेली परंतु तिला तें मंदिर उदास वाटूं लागलें, नलाकडे चित्तवृत्तीचा वेध लागून वारंवार कुच स्फुरण होऊं लागलें. शरीरांत मदनाग्नी प्रज्वलित होऊन शरीराचा दाह अत्यंत झाला. तेणेंकरून तिचे नेत्र आरक्तवर्ण झाले; आरक्त अधर शुष्क पडले; अति उष्ण दीर्घ श्वास टाकूं लागली; आणि अंगावरील तीणें सर्व भूषणें काढिलीं; हें पाहून तिच्या सख्या मुग्धा[1] होत्या त्याणीं तिला कांहीं बागेंत उपद्रव झाला कीं काय ह्मणून तिजवरून दहींभाताची मूद[2] ओवाळून टाकून सीतलोपचार करूं लागल्या. हरिचंदन अंगास लावून वाळ्याचे व्यंजनानें[3] वारा घालूं लागल्या, सीतल कमल पुष्प माळा गळ्यांत घालत्या झाल्या, आणि गच्चीवर नेऊन चंद्राचे चांदण्यांत शयन करवूं लागल्या परंतु हे सारे सीतल योग असून अग्नी प्रमाणें अधिकच तिचे अंगाचें दहन करूं लागले. तेव्हां त्या सख्यांत कोणी तरुण कामिनी होत्या त्याणीं तिची अवस्था पाहून अंतरखूण समजून तिला पुसतात.

**सख्यातरुणी.**— हे राजदुहिते[4] दमयंती, तुझी एकाएकीं अशी अवस्था कां झाली हें आह्मांपाशीं स्पष्ट सांगावें. आह्मीं तुझ्या जिवलगगडणी[5] आहों आणि यौवनावस्थेच्या अनुभवी आहों, आह्मापाशीं संकोच धरूंनको.

---

१ किंचित् तारुण्य स्थितींत आलेल्या. २ ओंपाळ्याभर. ३ पंख्यानें. ४ राजकन्ये. ५ सख्या.

## पद.

जोगी राग.

माझाकृष्ण देखिला काय.

या चालीवर.

साजणी सांग लाजुनको, त्हृदयांतिल हेतू ॥धृ॥ अंगी आली कां धवलिमा ॥ शुष्क जाला मुखचंद्रमा ॥ तनुशी झाली कृशता शिमा ॥ काय कामा करितांगे ॥ १ ॥ कशासाठीं करिशी खंती ॥ डोळे लाल तूझे दिसती ॥ चंचल आहे चित्त वृत्ती ॥ निद्रा तुजप्रति नयेच कां ॥ २ ॥ कथाकौतुक अवडेना ॥ तांबुलहीन केलें वदना ॥ चित्त कोठें लागेचना ॥ व्याकुल मना कां असशी ॥ ३ ॥ श्वासोश्वास टाकिशि फार[1] ॥ त्यजिले कां तूं अलंकार ॥ ह्मणे विनायक काम विखार[2] ॥ दुःसह फार विष त्याचें ॥ साजणी ॥ ४ ॥

**उपमाता**— ( जवळ येऊन, तिची अवस्था पाहून, त्हृदयीं दमयंतीस धरून मुख कुर्वाळून ह्मणते. ) वोसाजणी इंदुवदने[3] दमयंती, तुझें चित्त फार उदास कशास्तव जाहलें, अंगावर भूषणें कां घालित नाहींस, तांबूल अंजन आदर्श[4] यांचा परित्याग कशास्तव केलास, याचें कारण स्पष्ट सांगावें ह्मणजे आह्मीं तुझें चित्त व शरीर स्वस्थ होईल असा उपाय करूं.

## ओव्या.

उपमाता ये धांवत ॥ त्हृदयीं तीतें आलिंगित ॥
करें वदन कुर्वाळित ॥ मग पुसत वृत्त तिशीं ॥ १ ॥
सुगुणराशी दमयंती ॥ कामविकार तुशीं होती ॥
चंचल आहे मनो वृत्ती ॥ ऐंशी स्थिती कां झाली ॥२॥
नबोलसी उघड वचन ॥ कोठें गुंतलें तुझें मन ॥

---

१ फिक्रेपणा. २ कामसर्प. ३ चंद्रमुखी. ४ आरसा.

आरक्त दिसती तुझे नयन ॥ राजसवदन कोमाविलें॥३॥
जें असेल तुझे मनीं ॥ तें सांगे अह्मा लागुनीं ॥
तुझे पित्यास कथन करुनीं ॥ तुज नंदिनी संतोषवूं ॥४॥

दिंडी.

तुझे चित्ताला गदरिपु[1] कां जाळी ॥
दिल्ही टाकोनी सुभग मुक्तजाळी[2] ॥
कशासाठीं वो करिशिच तापाला ॥
हरूं चिंतागे कथुनहि बापाला ॥ १ ॥
असें करिशी कां दीन वदन हें तूं ॥
कथी आतांगे त्वरित ह्र्दयहेतू[3] ॥
अशा देहाची करिशि धूळ धानी ॥
अहो सर्वस्वीं होत सुखविधानी[4] ॥ २ ॥

मुख्यमाता— ( येऊन दमयंतीचे मुखावरून लिंबलोण करून आलिंगन करिती जाली, आणि मांडीवर घेऊन मुखकुर्वाळून ह्मणते. ) मत्तनुजे, तुझी शरीर प्रकृति फार बिघडली आणि मनस्थिर नाहीं असें वाटतें. राजसमुख पिंगट वर्ण दिसतें. तुला कोणाचा दृष्टिविकार झाला किंवा शाकिनी डांकिणीचा उपद्रव झाला, मला मोठी चिंता लागली आहे. सालमजकुरीं तुझा विवाह करावा असें आमचे मनांत होतें आणि तुझी शरीर प्रकृति अगदीं बिघडली आहे कसें काय होईल नकळे, हुशारी धर अन्न खात नाहींस, तुझी जा पदार्थांवर इच्छा असेल तें अरुवार करून देईन.

पद.

देस राग.

कांहि बोलामाहाराज

या चालीवर.

इच्छा तरीं तुझी काय ॥ मनिं तूं तळमळ करिशि कशास्तव

१ रोग. शत्रू, २ मोत्यांची जाळी. ३ कारण. ४ कार्य. ५ माझेमुली.
६ पिशाच, भेद. ७ घृतमिश्र.

झिजविशि अपला काय ॥ धृ ॥ मंदिरिं तुजला चैन पडेना ॥ खालीं वर फिरतेशीं ॥ उपवनिं[1] झाली बाधा तुजला ॥ करूं तरिं काय उपाय ॥ १ ॥ अंगाभरणें[2] त्यजिलिस कांगे ॥ मोकळि कां तुझि वेणी ॥ तांबुल शोभा वदनीं नाहीं ॥ नूपुरविरहित पाय ॥ २ ॥ तल्पक[3] शय्या त्यजुनी कां तूं ॥ भूमीवर निजतेशी ॥ आदर्शांजन[4] परिमळ विपरी ॥ करितिल ह्मणशि अपाय ॥३ ॥ वसंत वैभव चंद्रकला त्या ॥ रिपुवत् मानिशि त्यांतें ॥ ऐशी स्थिति तुझि उदास ऐकुनि ॥ चिंता करि मनि राय ॥ ४ ॥

## प्रवेश. ३

## स्थल - भीमकराजाचें गृह.

### भीमकराजा. जोतीषी व राजवैद्य, चोपदार.

**भीमकराजा.** — (आपले वैद्यास बलावून आज्ञा करितो.) दमयंतीची प्रकृति फार बिघडली आहे तर तुह्मी जाऊन तिचे विकाराची परीक्षा करून औषधी उपाय करण्याची योजना करावी. ( अशी भीमक राजानें आज्ञा केल्यावरून राजवैद्य जाऊन दमयंतीचा हात पाहून त्याणें परीक्षा करून तिचे रोगाचें राजास निवेदन केलें.)

**राजवैद्य.**— हे राजन्, मी जाऊन दमयंतीचा हात वगैरे लक्षणें पाहिलीं त्याजवरून निर्दान केलें कीं दमयंती ही उपवर झाली, तिचे अंगीं मदनाग्नि प्रज्वलीत होऊन वात प्रकोपप्रेरित शरीराचें दहन करित आहे; यास प्रमाण "कामशोकभयाद्वायुः क्रोधात्पित्तं त्रयो मलाः" याचा अर्थः काम, शोक, भय यांपासून वायु कुपित होतो; "क्रोधात्पित्तं," क्रोधापासून पित्त कोपाप्रत येतें, "भूताभिषंगात्," ह्मणजे वात

---

१ बागांत. २ अंगावरील अळंकार. ३ तोरड्या. लंगर. ४ पलंग. ५ आरसा. काजळ. सुवास. ६ वसंतऋतूची शोभा. ७ निश्चय.

पित्त कफ हे तीन दोष कोप करितात; असें वैद्यशास्त्राचें मत आहे यास औषधी उपाय करितां आरोग्य होणें नाहीं. तिचा विवाह करण्याची तयारी करावी हाच उपचार आहे.

## श्लोक.

मालिनी छंद.

उपवर दमयंती जाहली राज बाला ॥
ह्मणुनि शरिरिं तीचे मन्मथें वायु केला ॥
तनु अतिकृश झाली त्याचयोगें निदाना ॥
करुनि कथन केलें योग्य झालीच दाना ॥ १ ॥
मदन शरिरिं तीचे चेतला काय दाही ॥
तळमळ निशिदीनी वाहते गा सदाही ॥
ह्मणुनिच अविलंबे सैंवरातें करा हो ॥
वर करिं वधुदानें धन्यता या करा हो ॥ २ ॥

असें वैद्यानें भीमकराजास निदान करून सांगितल्या वरून, राजानें ज्योतिषशास्त्रवेत्ते ब्राह्मणांस बलावून, लग्न मुहूर्ताची योजना करण्याचें मनांत आणिलें.

**भीमकराजा.**— ( ज्योतिषी यांस सांगतो. ) दमयंतीचें स्वयंवर करणें अवश्य आहे. तर मुहूर्त निश्चय करून सांगावें तसा समारंभ धरीन.

## आर्या.

ज्योतिर्विदांस भीमक, सांगे उत्तम मुहूर्त काढावा ॥
जेणें दंपत्याचा, संसारीं प्रीति योग वाढावा ॥ १ ॥

**ज्योतिषी.**— ( भीमक राजास आशिर्वाद करून सांगतात. ) हे राजन्, याच मासांत दमयंतीस चंद्र अनुकूल असा उत्तम मुहूर्त आहे.

१ लग्नास. २ शरिर. ३ जाळी. ४ सत्वर. लौकर. ५ स्वयंवरास. ६ कन्यादान, ७ हातास. ८ ज्योतिषियांस. ९ स्त्रीपुरुषाचा.

**भीमकराजा.**— हे ज्योतिर्विदहो, याला अवधि[1] किती दिवसांची आहे.

**ज्योतिषी.**— हे राजा, आजपासून बारा दिवसांची आहे.

## आर्या.

ज्योतिषि ह्मणती राया, कलेश अनुकूल याच मासांत ॥
आहे दमयंतीला, अवधी हो दिवस पांच आणि सात ॥ १ ॥

**भीमकराजा.**— या मुहूर्तास अवधी थोडी आहे, साहित्य करण्यास गडबड होईल.

**ज्योतिषी.**— राजारे, त्वरा होईल तितकी चांगली. यास लोकांत "शुभस्य शीघ्रं," असें विदित[2] आहे.

**भीमकराजा.**— ( याणें चोपदारांस आज्ञा केली. ) आज कचेरींत येणें घडेल बरें सभेची तयारी लौकर करावी.

**चोपदार.**— ( राजाचें अभिवंदन करून प्रधानादि राजसेवकांस राजाज्ञा निवेदन करितो. )

## प्रवेश. ४

## स्थल— भीमक राजाचें दरबार.

भीमकराजा, प्रधान, घडयाळजी, कारकून.

प्रधान सभेंत येऊन सभासदादिलोकपाल घेऊन सिंहासना निकट बसला आहे तों चोपदार सभेचे द्वाराजवळ येऊन ललकारणी करितो. "मेहर्बान, मेहर्बान, राजाधिराज महाराज भीमक राजेकी स्वारी आती है."

कचेरीचे द्वारा बाहेर येऊन खुर्नुसा ह्मणजे वंदन करित होत्साता राजानें प्रतिनिधीचा हात धरून, मोठ्या मिजाशीनें चालत असतां शतावधी भालदार ललकारणी करिताहेत अशा संभ्रमानें भद्रासनावर[3] बसला असतां, घड्याळजी समोर येऊन दिवसाचें मान कथन करून, खुर्नुसा करून गेल्यावर.

---

१ अवकाश. २ माहित, विदित. ३ सिव्हासन.

**कारकून.**— ( राजास वंदन करून सर्व जिनसा निरखे वा॰ चून दाखवितो. ) महाराज, वस्तु मात्र मागील आठवड्याहून हल्लीं स्वस्त आहे, परंतु तूप, केशर, कांहीं माहाग ह्मणजे तूप दरमणी दोन तीन रुपये ज्यास्ती आहे.

**प्रधान.**— ( राजास वंदन करून राज्यांतील प्रजेचें यथानीति पालन व वर्तणूक निवेदन करून विनंती करितो. ) हे राजन्, चित्तास आनंद असून उद्यांची आज सभा करण्याचा हेतु कळून आज्ञा झाली पाहिजे.

**भीमकराजा.**— हे प्रधानहो, आमची जी प्रिय कन्या दमयंती तिचें स्वयंवर करावें असा उद्देश आहे, यास्तव कार्य शोभिवंत होईतोंपर्यंत गडबड होईल, राज्यकारभार मध्यें चालणार नाहीं, ह्मणून उद्यांची कचेरी आज करणें जरूर झालें, मंगलकार्य होई तों राज्याचा बंदोबस्त नीट ठेवण्याची आज्ञा केली आहे.

**प्रधान.**— ( वंदन करून ह्मणतो. ) महाराज मंगल कार्य होई तों राज्याचा बंदोबस्त चांगले रीतीनें राही असें करितों.

**भीमकराजा.**— हे प्रधानहो, राज्याचा बंदोबस्त चांगला ठेवून मंगल कार्याचे ततुंजीस कामदार नेमावे ते फार चतुर असावे.

**प्रधान.**— ( आनंद पावुन ह्मणतात. ) हे राजन्, सर्व तयारी आज्ञप्रमाणें उत्तम प्रकारची ठेवितों.

## प्रवेश. ५

## स्थल— भीमकराजाचें मंदिर

भीमक, राजकांता, दासी.

**भीमकराजा.**— ( प्रधानास आज्ञा करून आपले मंदिरांत जाऊन आपले पट्टमहिषीस[2] येण्याची आज्ञा दासीस करितो.) लौकर वल्लभेस[3] बलावा बरें.

१ भाव. २ पट्टराणीस. ३ स्त्रीस.

देउनि आशिर्वचनें, भूपति कुलगुरु ह्मणे अगा राया ॥
त्वद्दूतानें कथिलें, राजा विनवुनि वदे अगारी या ॥ २ ॥

**भीमकराजा.**— ( कुलगुरूस विनंतिपूर्वक ह्मणतो. ) हो आचार्य, दमयंती स्वयंवर करण्याचा उद्देश केला आहे, ज्योतिषी यांणीं मुहूर्त नेमिला आहे त्याप्रमाणें देशींचे श्रेष्ठ ब्राह्मण व राजे यांस लग्नपत्रिका लिहून बलाविलें पाहिजे; तर सर्व ऋषीचे नावनिशीचे माहितीचे पत्रें लिहवून मंगलकार्याचें सुसाहित्य करण्याची आज्ञा केली पाहिजे.

## ओव्या.

राजा ह्मणेगा आचार्या ॥ देशोदेशीं ऋषिवर्या ॥
लग्नपत्रिका लिहोनियां ॥ मंगलकार्या अणवावें ॥ १ ॥
जेंजें असेल विधानीं ॥ तैसें साहित्य करवोनीं ॥
न्यून[2] नपडे कार्य शोभनीं ॥ तैसें अनुदिनी करावें ॥२॥

**नृपाचार्य.**— ( राजाचें वचन श्रवण करून उपाध्याय ह्मणतो. ) हे राजन् सर्व तयारी करितों बरें.

## आर्या.

भीमक कुल गुरु बोले, स्वस्त असावें करीन साहीत ॥
न्यून पडों नच देई, करिन मि नाहीं दुजा तसा हीत ॥१॥

**भीमकराजा.**— ( कुलोपाध्यायास निरोप देऊन प्रधानास बलावून आज्ञा करितो. ) देशोदेशींचे राज कुमरांस कुंकुम पत्रिका लिहून पाचारणें करावीं व मंडप उत्तम प्रकारचा सिद्ध करावा.

## ओव्या.

राजाह्मणे प्रधान वरा[4] ॥ छपन्न देशींचे राजकुमरां ॥
कुंकुमपत्रें पाठवी त्वरा ॥ दमयंती सैंवरां कारणें ॥ १ ॥
आदर्श युक्त शतखणी ॥ मंडप उभारा बहुगुणीं ॥

---

१ गृहीं. २ कमिपणा. ३ कार्याच्या शोभेचेठायीं. ४ प्रधान श्रेष्ठा. ५ आरशासहवर्तमान.

कारंजाचें उडवा पाणी ॥ नीटपणीं शोभा करा ॥ २ ॥
ध्वज पताका तोरणें ॥ लावूनि नगर हें शोभविणें ॥
पाहातांच भुलावें राणे ॥ चित्रें काढणें भिंतीं वरीं ॥ ३ ॥
कुंकुम कस्तुरीचे सडे[1] घालुन ॥ मार्ग करा गंध संपन्न ॥
मंगल तुरें वाजवून ॥ नगर नादान[2] मोदवा[3] ॥ ४ ॥
बलावुनियां सूपकार[4] ॥ षड्रस[5] अन्नें करा अपार ॥
भोजन तृप्त करा विप्र ॥ वराडि इतर तसेपैं ॥ ५ ॥
आणोनियां वारांगना ॥ मंडपीं नाचवा चंद्रवदना ॥
पाहत्याचे भूल नयना ॥ पडोनि मना आनंदहो ॥ ६ ॥
तांबूल करात्रयोदश[6] गुणीं ॥ तुरे हार कमालखानी ॥
गजरे अत्तर गुलाब पाणी ॥ अर्पोनि वऱ्हाडी शोभवा॥७
देऊनि वस्त्रें अलंकार ॥ दासां शोभवा समग्र ॥
वस्त्राभरणें वाजी[8] कुंजर[9] ॥ करा तयार सहस्रशा ॥ ८ ॥
दमयंतीच्या सख्या चतुरा ॥ आणि राणी दाशी शृंगारा ॥
आप्त सुहृद[10] पाचारा ॥ स्वयंवरा कारणें ॥ ९ ॥
उल्हाट यंत्रांचे[11] भडमार ॥ स्वयंवरीं करा अपार ॥
( ऐशीआज्ञा नलेश्वर॥ करी साचार प्रधानाशीं ) ॥१०॥

**प्रधान०**— ( राजाचे आज्ञेचें अभिवंदन करून. ) आज्ञेप्रमाणे सर्व तयारी करितों. ( असें राजासीं बोलून त्या अन्वयें सर्व तयारी करिता झाला. )

## प्रवेश. ८

### स्थल दमयंतीचें मंदिर.

### दमयंती व सख्या.

**दमयंतीच्या सख्या०**— ( दमयंतीस ह्मणतात. ) हे सखे दमयंती, तुझे स्वयंवर, करण्याची तयारी राजानें केली, आतां

---

१ शिंपणें. २ नादानें. ३ हर्षवा. ४ आचारी. ५ लेह्य. पेय. चोष्य. खाद्य. भक्ष. भोज्य. ह्मणजे. बोटानें चोखून घेणे. ६ पानें. चुना. सुपारी. कात. लवंग. वेलदोडे. जायपत्री. जायफळ. कंकोळ. कापूर. चंदन. कस्तुरी. वर्खसोने. ७ लांबहार. ८ घोडे. ९ हत्ती. १० सोयरे, धायरे. ११ तोफांचें.

हुशारीधर आणि सर्व राजपुत्र येतील त्यांत आपले आवडी जोगा वर असेलतर वरून सुख भोग करें.

### पद.

खमास राग.

भोला नाथ दिगंबर हें दुःख मेराहरो.

या चालीवर.

सखे तुझें स्वयंवर, या मासिं राजा करीगे ॥ धृ ॥ हीं रत्न भूषणें ल्यावि[1] तुं सखये ॥ सुमनानें[2] वेणी भरी गे ॥ ॥ १ ॥ ही पुष्पशय्या कोमल रचितें ॥ आज निजे पलंगावरी गे ॥ २ ॥ तांबुल खावा परिमळ[3] घ्यावा ॥ हें अंजन नयनीं धरी गे ॥ ३ ॥ त्या राजपुत्रीं वाटेल सुभग ॥ दमयंती नलाशि वरी गे ॥ ४ ॥

भीकमराजाचीं कुंकुमपत्रें देशोदेशीं गेल्यावरून ऋषि व राजपुत्र दमयंतीचे स्वयंवरास आले; त्यांस भीमक राजानें सन्मान केला असतां नगराभोंवती डेरे[4] देऊन उतरले. ऋषींयांस राजानें निरुपद्रव मंदिरें दिल्हीं, तेही उतरले. नलराजाही आपले नगराहून निघाला. इतके संधींत सर्व मुनीमध्यें श्रेष्ठ परमभागवत त्रिलोकीं ज्याचें गमन महाकलिकर[5] नारद, स्वर्गलोकीं गेला असतां, इंद्रानें वारंवार नमस्कारून सिंहासनावर बसवून पूजा केली, आणि कर जोडून इंद्र नारदास विनंती करितो.

## प्रवेश. ९

### स्थल. स्वर्गलोक.

### इंद्र व नारद.

इंद्र॰— अगा भागवोत्तमा नारदमुने, कोणी कडोन आगमन झालें ?

---

१ पांघरावीं. २ पुष्पानीं. ३ सुवास. ४ तंबु. ५ कळलाव्या.

## आर्या.

इंद्र ह्मणे मुनिवर्या, झालें कोणी कडोनि आगमन ॥
बोले नारद जेणें, पावे कुसुमायुधाचि आंग मन ॥१॥

## पद.

मुलतानी किंवा पूर्वी किंवा बहिरवी,
देईपदाची जोड मोरया देईपदाची जोड.
याचालीवर.

रूपसती दमयंती ॥ फारच रूपसती दमयंती ॥ धृ ॥
सौंदर्यातें पाहुन तीच्या ॥ लाजति साऱ्या युवती[२] ॥
॥ फा० ॥१॥ जीचें पाहुन वदनेंदूला[३] ॥ लज्जित तारापती[४]
॥ फा० ॥ २ ॥ लावण्योदधि लहरिच[५] केवळ ॥ हेलावलि[६] भूवर्ती[७] ॥ फा ॥ ३ ॥ अपुल्या सरिसा जोडा ह्मणुनी ॥ तीचि नलावर प्रीति ॥ ४ ॥

याप्रमाणें नारद मुखानें दमयंतीचे स्वरूपाचें वर्णन इंद्रानें श्रवण करून त्याचे मनांत आलें कीं स्वयंवरास आपण जावें. जरीं नलराजा रूपवान आहे तरीं आपण देव आहों ह्मणून ती त्याचा परित्याग करून आपणासच वरील असा विचार करून कामानलतप्त[८] होत्साता बरोबर अग्नि वरुण व यम यांस घेऊन भूलोकीं प्राप्त झाला.

## प्रवेश. १०

### स्थल. भूलोक.

### नल, इंद्रादिदेव.

( तों नलराजा स्वयंवरास जातआहे त्याची व देवांची गांठ पडली तेव्हां देवांनीं त्याचें स्वरूप पाहिलें असतां त्यांस वाटलें या राजाप्रमाणें या भुवनामध्यें देवगंधर्व मानवांत को-

१ मदनाचादह. २ तरुणस्त्रिया. ३ मुखचंद्राला. ४ चंद्र. ५ लावण्य. समुद्रलहरी. ६ आली. ७ भूमीवर. ८ कामाग्नि.

णी नाहीं. याला पाहून ती आमचा अव्हेर करून यासच वरील तर आतां कपट करावें असा विचार करून नलास भेटले आणि विचारितात )

इंद्रादिदेव॰— तूं कोण, कोणीकडेस जातो.

नलराजा॰— मी नैषध देशींचा राजा, मला नल असें ह्मणतात. दमयंतीचे स्वयंवराचें लिखित आल्यावरून दमयंतीस वरण्याकरितां जातों. तुह्मीं कोण कोठील तें सांगा बरें.

इंद्रादिदेव॰—(आपलें स्वरूप करून नल राजास ह्मणतात.) तूं-अत्यंत परोपकारी पुण्यश्लोक आहेस तुझी कीर्ति दिगंतरी आहे, तर तूं आमचें दूतत्व करून दमयंती आह्मा चौघांतुन कोणासहि वरी असें करावें बरें.

नलराजा॰— फार गोष्ट चांगली आहे, परंतु दमयंती अंतःपुरांत असेल तेथें माझा प्रवेश कसा होईल.

इंद्रादिदेव॰— हे राजारे, आह्मी तुला गुप्त व प्रगट होण्याचा वर देतों. ( असें ह्मणून वर देते झाले. )

## प्रवेश. ११

### स्थल. दमयंतीचें मंदिर.

### देवदूत, नल, दमयंती.

त्याकाळीं राजानल आपली सेना त्यास्थळीं ठेवून गुप्तरूपें भीमकराजाचे नगरांत जाऊन तेथें अंतःपुरांत गेला; आणि दमयंती गौरीहराजवळ श्रीईश्वरीचें पूजन करीत होती; या लक्षणावरून तेथें प्रगट होऊन दमयंतीचे दृष्टिगोचर झाला. त्यास पाहून दमयंती मदनविव्हल होऊन मूर्छित झाली. ती मूर्छा सावरून बोलते.

दमयंती॰— हे कोटिमन्मथ सुंदरा पुरुषवरा, तूं कोठील कोण ? राजपरवानगी खेरीज तुझा अंतःपुरांत प्रवेश कसा झाला ? तुझी रूपरेखा पाहून नेत्राचें साफल्य झालें.

## अभंग.

नलाशीं पाहोनी दमयंती बोले ॥
येथें कैसें झालें येणें तुझें ॥ १ ॥
कोठील तूं कोण कंदर्पाचा[1] गाभा ॥
इथें कांरे उभा राहीलाशीं ॥ २ ॥
काय कामासाठीं येथें तूं आलाशी ॥
सांग मजपाशीं अविलंबें ॥ ३ ॥
माझीया डोळ्यांशीं पाहतां हें मूख ॥
अत्यंत हरीख सांगूं कीती ॥ ४ ॥

**देवदूत नलराजा०**—(दमयंतीस ह्मणतो.) हे लर्ज्जीकृतकोकिलें-[2]रवे दमयंती, मी इंद्र, अग्नि, यम, वरुण यांचा दूत आहें. मला नल असें ह्मणतात, देवांनीं तुजकडे पाठविलें यामुळें गुप्तरूपें येथें प्राप्त झालों आहें; तर मी तुला उपदेश करितों याचा विचार करून मला उत्तर सांग. इंद्रादि चारीदेव यांतून तूं एकास वरावें, देवास वरशील तर स्वर्गलोकींचें सुख भोगिशील, महाउत्कट[3] पुण्य करून सुखेच्छु स्वर्गवासी होऊन नंदन वनांत क्रीडतात व अमृत पान करितात यास्तव देवास वरून स्वहित कर बरें.

## श्लोक.

### शार्दूल विक्रीडित छंद.

बोले तो नल राज भीमक सुते त्यागून तूं मानवा ॥ १ ॥
देवांशीं वरणें स्वहीत करणें गे पावणें मान वा[4] ॥
माता वाणि वदेल बापहि तसा मी दूत ज्याचा असें ॥
वज्री[5] पश्चिमकांत[6] अग्नि यम हे प्रार्थीति तूला असे ॥

---

१ मदनाचा. २ लाजिवलेला आहेकोकिलांचा शब्दाजिणें. ३ उग्र. ४ वाहवा. ५ इंद्र. ६ वरुण.

## आर्या.

या चौघांतून एका, वरुनी पावे अनंत सुखराशी ॥
धीमान्[1]स्व हीत ऐके न रुचे जरि वाणि गुरुचि सुखराशी ॥१॥

**दमयंती**०— ( नलराजाचीं भाषणें ऐकून शंकित होऊन ह्मणते.) तूंनल ह्मणवितोस आणि परास वरण्याचें बोधून स्वहित सुचवितोस हें आश्चर्य वाटतें. मीं काया वाचा मनानें नलयास वरून त्याचे वाचून इतर पुरुषास पित्या बंधूप्रमाणें मानिलें. आतां दुसरे प्रकारचें हित कोणी सांगेल अथवा दिसेल तत्रापि जो निश्चय करून प्रतिज्ञा केली ती फिरविण्यास मार्ग राहिला नाहीं. याजकरितां तूं नल ऐस किंवा वंचक देवदूत असोस. परत जावें तुला या कामांत यश मिळणें नाहीं.

## आर्या.

बोले दमयंती मग, पूर्वींच चित्तें नलास मीं वरिलें ॥
आतां मत्सक्त जरि,तदितर मन पाहिजेच आवरिलें ॥ १ ॥

## प्रवेश. १२

## इंद्रादिदेवाचें स्थान.

**नलराजा.** ....................**इंद्रादिकदेव**

**नल**०— ( याप्रमाणें दमयंतीचा निश्चयपाहून आपले उद्योगास यश मिळत नाहीं असें जाणून गुप्त होऊन ज्यास्थळीं इंद्रादिदेव होते तेथें येऊन देवांस भेटून इंद्रादि देवांची प्रार्थना करून ह्मणतो. ) मी तुह्मास दमयंतीने वरावें असा तिला उपदेश केला. "मनुष्याचा त्याग करून देवास वरिलें असतां तुझें फार हित होईल" असा तिला उपदेश केला; परंतु तिणें एकच सांगितलें, कीं मी पूर्वींच प्रतिज्ञापूर्वक मनेंकरून नलास वरिलें, आतां दुसरें हित पाहाणें नाहीं.

---

१ बुद्धिवान.

## ओव्या.

नल ह्मणे इंद्रादिकांशीं ॥ मी जाऊन दमयंती पाशीं ॥
वरावें तूं अमरांशीं ॥ ऐसें तिजशीं उपदेशिलें ॥ १ ॥
मान त्यागोनि देवांस ॥ वरिशी पावशी स्वर्गवास ॥
तरीं तव मातापितरांस ॥ होय सुखास कारण हें ॥ २ ॥
अपूर्व तूझें रूपवैभव ॥ ह्मणोनि याचिती तूज देव ॥
सर्वोत्कृष्ट तुझें दैव ॥ नकळे माव[1] तयाची ॥ ३ ॥
ऐसें उपदेशिलें नानापरी ॥ नमानोन भीमक कुमरी ॥
जे बोलली मत्युत्तरीं ॥ त्याचे परी ऐसे हे ॥ ४ ॥
इतर पुरुष नलावांचून ॥ मी मानिलें पित्यासमान ॥
आतां व्यर्थ करिशीं कां यत्न ॥ तुज लागोन यश नये ॥५

ऐसें नलानें दूतत्व निष्कपट केलें तें त्याचे मुखानें श्रवण करून तेथून नलाबरोबर निघाले.

## प्रवेश. १३

### लग्नमंडप.

### भीमकराजा. आचार्य.

ते भीमकराजाचे नगरास आले आणि नलाचें स्वरूप धारण करून लग्नमंडपांत बसले व नलराजा ही येऊन बसला. देशोदेशींचे संपूर्ण राजपुत्र आले, ते सर्व मंडपांत प्राप्त झाले, व ऋषिही मंडपांत बसले असतां भीमकानें मोठा समारंभ केला. वारांगनाचें नृत्य गायन ठाईंठाईं होत आहे, व सर्वांस तांबुल,हार,तुरे, अत्तर, गुलाबपाणी भीमकराजानें अर्पुन मोठा सत्कार केला; तेथें बंदिजन ह्मणजे भाट हे राज कुलांचे कीर्तीचें वर्णन करीत असतां भीमकराजानें आचार्यास विनंती केली. “महाराज सर्व राजे, ऋषि स्वयंवरास आले. आतां दमयंतीचे हातून मंगलागौरीचें पूजन करवून, सुवासिनीस सौभाग्य वायनें देववून तिचे

१ क्रिया कर्म.

हातीं नवरत्न माला देऊन इच्छित वर वरण्याकरितां मंडपांत आणावी बरें."

## प्रवेश. १४

## दमयंतीचे अंतःपुर.

आचार्य.................... दमयंती.

आचार्य— ( अंतःपुरांत जाऊन दमयंती कडून श्रीची पूजा करवून सौभाग्य वायनें देवविता झाला, आणि तीस सांगतो. ) हे शुभानने दमयंती, छपन्नदेशींचे राजकुमर मंडपांत आपले रूपवैभवानिशीं प्राप्त झाले आहेत, आणि तुझे दर्शनाची अपेक्षा करित आहेत. व ऋषि ही महासमर्थ आले आहेत, भीमकराजानें सर्वांचा सत्कार करून या सुमुहूर्तावर मंडपांत येऊन, सर्वांस अवलोकन करून, जो तुला आवडेल त्याचे गळ्यांत माळ घालून वरावें अशी आज्ञा केली आहे.

### पद.

( नको सख्या आतां बाहेर जाऊं गवळ० ) याचालीवर.
अतां चलोनी राजसभेसीं बाले इच्छित वर तुं वरी ॥धृ॥
भू मंडळिचे सर्वहि राजे मंडपि बसुनीं सुखासनी ॥ तूझें
दर्शन व्हावें ह्मणुनि इच्छा करिती अभ्यंतरीं[1] ॥ १ ॥ स
र्वा भरणीं[2] भूषित होउनि, नूतन साडी नेस अतां ॥ को
री कंचुकि घालुन अंगी, माथां मुक्ता जाळि धरी ॥ २ ॥
राज कुळांचीं गोत्रें नामेंवर्णन करितिल बंदिजन ॥ ल-
ज्जासोडुनि नयनी पाहे, अपुल्या सरिसा नर केसरी[3] ॥
॥ ३ ॥ उदास चित्तें वागत होतिस, आतां होउनि मोद-
मनां ॥ यासमयाशीं मंगल पावे अतिसुख भोगी
संसारीं ॥ ४ ॥

---

१ मनांत. २ सर्व अलंकार घालून. ३ नरसिंह.

## प्रवेश. १५

### सभामंडप.

**राजा, आचार्य, दमयंती, नल, सभासद,**

आचार्यांनें शिबिकासनीं दमयंतीस बसवून सख्यांसहवर्तमान पुढें मंगल वाद्यांचा गजर करीत मंडपांत आणिले, त्याकाळीं दमयंती पालखींतून उतरून हातीं नवरत्नांची माळा घेऊन राजकुमर अवलोकन करित असतां बंदिजन राजांचीं नामें व गोत्रें व त्यांचे पूर्वज्यांची कीर्ति याचें वर्णन करून दाखवितात; अशा संभ्रमानें एक एक राजा पाहत हंसगतीनें चालत असतां शतशः दासीजन मागें पुढें चालतात. याप्रमाणें सर्व राजे पाहून ज्या सिंव्हासनावर नलराजा होता तेथें आली, तों एक मुख्य नल व इंद्रादिदेव यांणीं नलाचीं स्वरूपें धरून नलाचे शेजारीं बसलेले असे पांच नल स्वरूपानें त्या सभेंत पांचच सूर्य उगवले हें पाहून दमयंती साशंक झाली; आणि मनांत समजली "देवांनी पूर्वीं आह्मांस वरावें ह्मणून नलराजास आपणाकडे पाठविलें होतें त्यांचा अनादर केला, यास्तव यांत चार नल वंचक रूपाचे आहेत; परंतु मुख्य नल याचें ज्ञान कसें होतें याचा विचार करून खिन्न होऊन परमेश्वराची प्रार्थना करिते.

**दमयंती.**— हे देवाधिदेवा, माझें चित्त नलावर खचित असून त्या व्यतिरिक्त इतर पुरुष पित्याबंधुप्रमाणें मानिले असतील, हें सत्य असेल, आणि सत्याचा राखणारा ईश्वर असेल तर मुख्य नल मला दाखविशील.

### ओव्या.

रत्न माला घेऊन हातीं ॥ राजसभेंत पातली दमयंती ॥
बंदिजन पुढें चालती ॥ कथन करिती राजांचें ॥ १ ॥

---

१ पालखींत. २ वांचून.

तेथें न लागे मन ॥ म्हणोनी पुढें करी गमन ॥
ऐसें सर्व राजे अवलोकुन ॥ सुहास्य वदन चाले पुढें ॥२॥
आले नलराया निकट ॥ तेथें स्तब्ध झाले भाट ॥
खुंटली वर्णनाची वाट ॥ नल चोखट पांच तेथें ॥ ३ ॥
जैसे उगवले तरणीं[1] ॥ तैशी पंच नलश्रेनी[2] ॥
पाहोनिया अंतःकरणीं ॥ शंकित तरुणी जाहली ॥ ४ ॥
मनीं ह्मणे दमयंती ॥ पांच नल येथें दिसती ॥
यांत असे कृत्रिमस्थिति ॥ मजमति भुलवावया ॥ ५ ॥
देवांशीं मी अनादरिलें ॥ त्यांणीं येथें कृत्रिम केलें ॥
मुख्य नलाचें स्वरूप भलें ॥ तें कळलें पाहिजे ॥ ६ ॥
मी काया वाचामनेंकरून ॥ वरिलें असेल नला लागुन ॥
इतर नर पित्यासमान ॥ माझें मन मानी जरीं ॥ ७ ॥
या सत्याचे योगान[3] ॥ मजवर तुष्टो भगवान ॥
कृत्रिम नलाचें ज्ञान ॥ मजलागुन बोधविल ॥ ८ ॥
ऐसा करोनि विचार ॥ ईश्वरास करि नमस्कार ॥
तुष्टोनि परमेश्वर ॥ करी उपकार तिजवरी ॥ ९ ॥
देवमानवांची स्थिति ॥ तीं चिन्हें तिज दिसती ॥
मानवांची नयनपाती ॥ लवती वारंवार सदां ॥ १० ॥
मानवांची पडे छाया ॥ ते तेजस्वी ह्मणोनियां ॥
अशी नसे देवचर्या ॥ चोजवे माया देवांची ॥ ११ ॥
अमर ते स्वयंप्रकाश ॥ ह्मणोनि छाया नसे त्यांस ॥
भूमंडळीं आसनस्पर्श ॥ नहोय कदांही ॥ १२ ॥
पातीं नलवतीं देवांचीं ॥ हीं देव मानव लक्षणें सांची ॥
समजोनियां दमयंतीची ॥ मनोवृत्ति संतोषली ॥ १३ ॥
वंचक देव नलरूप नटले ॥ त्यांचीं वंदोनियां पावलें ॥
मुख्य नलाशीं वोळखिलें ॥ मग चाले तयाकडे ॥ १४ ॥
हातीं होती रत्नमाळा ॥ ती घाली नळाचे गळां ॥

---

१ सूर्य. २ पंक्ति. ३ योगानें.

जन वाजवितां करतळां ॥ झाला सोहळा स्वयंवरीं ॥१५
झाला वाद्यांचा गजर ॥ उल्हाट यंत्रांचा भडमार ॥
हाय करिति राजे समग्र॥झाली वेरझार व्यर्थ त्यांची॥१६
भीमकराजा आनंदला ॥ हार तुरे तांबुलाला ॥
वांटोनि तेणें सत्कार केला ॥ राज कुलांचा तेधवां ॥१७॥
देवनिजरूपें प्रकटोन ॥ नलास झाले सुप्रसन्न ॥
अर्पिते झाले वरदान ॥ करिती नमन वधूवरें ॥ १८
गुप्त आणि प्रकट होणें ॥ अति वेगानें चालणें ॥
अनिष्टकाळीं धैर्य धरणें ॥ पराक्रमी होणें इंद्र वदे ॥१९॥
वरवदे दक्षिणेशे[2] ॥ माझे नस्पर्शती तुला पाश ॥
धर्मनिष्ठ तूं नरेश ॥ वाढो यश सर्वदां ॥ २० ॥
वर बोले तेव्हां वरुण ॥ रिक्त[3]घटीं करितां स्मरण ॥
उदकभरें नलागतां क्षण ॥ हो कल्याण राया तुझें ॥२१॥
मग वर समर्पि अनलें[4] ॥ जेव्हां तूं काष्ठं फुंकशील ॥
तेव्हांच तो मी करीन ज्वाल ॥ मानी बोल सत्य हे ॥२२
ऐसे वर अर्पोनी ॥ देव चालले स्वस्थानीं ॥
तों द्वापार कलियुगें दोनी ॥ मार्गवेगानें क्रमितातो ॥२३॥
त्यांस पुसती देव ॥ कोठें घेतारे धांव ॥
ते ह्मणती वासव ॥ ऐकों अभिनव[6] वृत्त असें ॥ २४ ॥
अतिरूपवती दमयंती ॥ तिचे जातों स्वयंवराप्रती ॥
हांसोनियां अमर बोलती ॥ व्यर्थ ह्मणती उद्योग हा॥२५
आह्मी चौघेहि त्याच कारणें ॥ स्वयंवरीं केलें होतें जाणें॥
अह्मांस टाकोनियां तिणें ॥ वरिलें नलरायाशीं ॥ २६ ॥

दमयंतीनें नलास वरिलें, हें पाहून छपन्नदेशींचे राजे आपले परिवारानिशीं मनांत तळमळ करीत गेले. इकडे दमयंती नल वधूवरें यांणीं सर्व ऋषींस व भीमकास नमस्कार करून त्यांचे आशिर्वाद घेतल्यावर नलराजा दमयंतीचें गृ-

१ येणें जाणें. २ यम. ३ रिकामा. ४ अग्नि. ५ हेइंद्रारे. ६ चमत्कारिक.

हण करून आपले छावणींत जाण्याची इच्छा दर्शविता झाला.

**भीमकराजा.**— ( कुलगुरु व प्रधानादि सेवक यांस सांगतो. ) तयारी करा, तयारी करा. नलराजाचें छावणींत जाणें जरूर आहे बरें.

**प्रधानादिसेवक.**— ( सर्व तयारी करून विनंती करितात. ) हे राजन्, मंगळवाद्यें आदिकरून स्वारीची सर्व तयारी झाली आहे.

( भीमकराजा कुलगुरूस घेऊन मंगलवाद्यें वाजवीत सेवकांसहवर्तमान नलराजाचे छावणींत जाऊन राजाचे डेऱ्यांत गेला असतां, नलराजा सामोरा येऊन नमन करून सिंहासनावर भीमकराजास बसविलें व त्याचे कुलगुरूस श्रेष्ठासनावर बसविता झाला. )

**भीमकराजा.**— ( नलराजाची स्तुतीकरून प्रार्थना करितो. ) हे जामात, तुह्मांस दमयंतीनें वरिलें येणेंकरून आह्मांस मोठा आनंद होऊन निरंतर सुखास कारण झालें. परंतु सध्यां तिला आमचे गृहीं पाठवून विधीनें पाणिग्रहण करून चारदिवस लग्नसोहळा संपादून मग तीस घेऊन आपले मंदिरीं जावें. हें फार उचित आहे.

**नलराजा.**— वडीलहो, तुमची आज्ञा आह्मांस प्रमाण आहे बरें.

**भीमकराजा.**— आपले नगरास पत्र पाठवून, समारंभास वडील कुलाचार्य आप्त मित्र आणवावे.

**नलराजा.**— वडीलहो, सर्वांस बलावितों बरें. ( असें ह्मणून जाता झाला. )

**भीमकराजा.**— ( नलाचा निरोप घेऊन आपले मंदिरीं येऊन दासींस आज्ञा करितो. ) हे दासीहो, आमची प्रियकांता दमयंतीची माता हीस लवकर बलावा.

## प्रवेश. १६

### भीमकराजाचें मंदिर.

राजकांता, दासीजन, भीमकराजा.

**दासीजन०**— ( राजाची आज्ञा वंदन करून राणीचे महालांत जाऊन विनंती करिते. ) बाईसाहेब, आपल्यास राजानें भेटीस लवकर येण्याची आज्ञा केली आहे; महाराज, शृंगार करण्याची त्वरा करावी.

**राजकांता.**— (दासीचें वचन श्रवण करून आनंदयुक्त निघोन राजाजवळ येऊन राजाचें वंदन करिती झाली. तीस राजानें आलिंगन दिलें असतां सुहास्यमुखी सलज्ज नेत्रकटाक्षें अवलोकन करित होत्साती हात जोडून विनंती करिते ) महाराज, काय आज्ञा आहे ?

**भीमकराजा०**— हे शशांकवदने प्राणवल्लभे, दमयंतीनें नलराजास वरिलें ह्मणून नल तीस घेऊन आपले छावणींत गेला, त्यास मी जाऊन विनविलें कीं विधीनें पाणिग्रहण करून चारदिवस सोहळा करून मग तिजला घेऊन जावें. अशी विनवणी केल्यावरून त्याणे अंगिकार केला. सबब तूं शिष्ट सुवासिनी घेऊन तीस वाजत गाजत समारंभानें आपले गृहीं आणावें बरें.

**राजकांता.**— उत्तम आहे. ( असें राजाशीं भाषण करून आप्त वडील स्त्रियांचा समुदाय घेऊन दमयंतीचे भेटीस वाजत गाजत गेली. )

इतक्यांत दमयंती सामोरी येऊन मातेसहवर्तमान वडील स्त्रियांस नमन करून सत्कारानें रंगबैठकीवर बसवून आपण सर्वांस हरिद्रा[१] कुंकुम, विडे देती झाली.

**राजकांता** ( दमयंतीचे मुखावरून लिंबलोण करून ह्मणते ) सये आतां आमचे घरीं चलावें. तुझा पाणिग्रहणविधि

---

१ हळद कुंकु.

करून चारदिवस सोहळा झाला ह्मणजे तूं आपले पतीबरा-
बर आपले घरीं जाशील.

**दमयंती.**— ( अशी ममतेची वाणी श्रवण करून ) उत्तम आहे ( ह्मणून सिद्ध झाली. ) दमयंतीस वाजत समारंभानें आणि-ल्यावर राजानें सुमुहूर्तावर पाणिग्रहण विधीनें कन्यादान नल राजाचे हातीं केल्यावर लग्न होमादि सकल विधि झा-ल्यावर राजाने विप्रांस बहुत दानें व दक्षिणा देऊन मोठा समारंभ केला. )

## श्लोक.

द्रुत विलंबित छंद

अणुनि मंदिरिं त्या दमयंतिला ॥
नल करीं विधिनें मग दे तिला ॥
बहुत उत्सव भीमक तो करी ॥
अतिच शोभवि कंकण त्यांकरीं ॥ १ ॥
द्विजजना अवनीपति दक्षिणा ॥
बहुत अर्पि करि नंतती क्षिणा ॥
वधुवरें अनुपम्य ति शोभलीं ॥
कथन तें कविवाणि करी भली ॥ २ ॥

— वधुवरांचा पाणिग्रहणविधि झाल्यावर उभयतांस सुखासनीं बसवून दमयंती आणि नलपक्षांच्या स्त्रियांभोंवतीं लाहान थोर मिळून वधुवरांचा कौतुक खेळ करितात.

## पद.

( भोला नाथ दिगंबर हें दुःख )

होरीच्याचालीवर.

किति लाज धरिशितूं ॥ दमयंति तोड विडीगे ॥ धृ ॥ इच्छित लाभुनि, गेलिसचिंता ॥ समुद्राचे पैलथडीगे ॥ १ ॥ बहुत

---

१ पृथ्वीपति. २ लववी.

उशिरहा, होऊनिगेला ॥ हसतातिं राजगडींगे ॥ २ ॥ मंगलखेळा, खेळुनि मतिशीं ॥ सुखसागरीं मार बुडीगे ॥ ३ ॥ वधुवरसंभ्रमी, चोजजनाला[1] ॥ अवलोकनि हौसबडिगे ॥ ४ ॥

## ओव्या.

नलास ह्मणती सकल नारी ॥
नवरी घ्यावी कडेवरी ॥
मग चलावें बहुल्यावरी ॥
हरिद्रा तरीं खेळावया ॥ १ ॥
कडे घेऊनि नवरीला ॥
नल बहुल्या वरी चढला ॥
मान देऊनि करवल्यांला ॥
नारिजनाला तोषवी ॥ २ ॥
वधुवरांचा हरिद्रा खेळ ॥
पाहतां आनंदती सकळ ॥
मंगल स्नान घालिती तत्काळ ॥
उष्ण जळ परिमळें ॥ ३ ॥

**भीमकराजा**— ( नलाकडील मानकरी यांजकडे जाऊन भोजनाचें आमंत्रण करितो, अहो मानकरी वधुवरांचे पंक्तीस सर्वांनीं कृपाकरून भोजनास यावें बरें.

**मानकरी**.— हो सुह्रद्हो!उत्तम आहे.

**भीमकराजा**.— ( आपल्यामंदिरीं येऊन सेवकांस आज्ञा करितो ) ह्याही मानकरी वधुवरांचे पंक्तीस बलाविले आहेत तर तुह्मी लवकर तयारी करा.

**सेवकजन**.— ( हात जोडून राजास विनवितात ) हे राजन्, सर्वं तयारी आहे; पात्रें वाढिलीं. मानकरी यांस आणावें.

---

१ हौस.

## कटाव.

वधुवरांचि पंगत खाशि ॥ वाढिति नारी रुप राशि ॥ धृ० ॥
रंगित रांगोळ्यांचा थाट ॥ सुवर्णांकितखालीं पाट ॥
सुगंध बत्या जळती दाट ॥ अडण्या वर्ति सुवर्णांचि ॥
तार्टे मांडिलि एके साचि ॥ रत्न जडित त्या दाहा वाट्या ॥
वरि वाढिती नारि गोमट्या ॥ नानापरिच्या कोशिंबीरी ॥
रुचिकर चटण्या ओळदूसरि ॥ खमंग रायतीं कोथिंबीरी ॥
पंचामृत भजिं बोंडे खारीं ॥ नाना तिखटें पाचितसारीं ॥
मोरांब्याच्या वाढित हारी ॥ लिंबे अंबें माहाळुंगाची ॥
ईड आवळे नेम्रीयांची[1] ॥ वंशांकुरहे[2]कर्कटिकांची[4] ॥
आलें कर्मरी करवंदांचि ॥ हिंगण बेटें माय मुळाचि ॥
खारूनक्षारें आम्ललोणचीं ॥ डांगर मेत्कुट आंबट गोड ॥
कुरकुरफेण्या पाचितपापड ॥ नानापरिचि चिकूवडी ॥
सांडूगेकुडकुड नादितचिकडि॥रसवडि पात्वडि अणखी तीळवडि
लवणा वर्त्या लिंबू फोडी ॥ करती पाचन भोजनाशि ॥ १ ॥
नानाशाखावांगिरसाळे ॥ दोडूके श्रावण्या आणिपडवळें ॥
शेगट भेंड्या दूधभोपळा ॥ अगस्तिशेंगा डांगर कोळें ॥
चनूळिंगवारि आणि कोव्हळे ॥ सुरणबटाटे कडूकारलीं ॥
घडघोसाळी केळ फुलें काळीं ॥ अंजिर दिडशि डांगरसाली
कवाळे मोग्रि डिग्रि घेवड्या ॥ अपक्वकेळीं हितारकावड्या ॥
चणे मसाले दार बिरड्या ॥ चवळी मेथी माठ फोकळा ॥
शेफूकत् मुळें टाकळा ॥ चंदनबटूवा चील कडई ॥
अळी शिर्सा अंबाडी राई ॥ अडूवळितळिली
रुचिबहु त्याशी ॥ व० ॥ २ ॥ थाट वाढिति पक्वान्नाचे ॥
पुरणपोळि लाडु मुगाचे ॥ घिवर गुरोळ्या लाडु बुंदिचे ॥
मोदक जिलब्या अनारशाचे ॥ थाटवर्ते करंजाचे ॥
वरिवाढिति चिरोट्याला ॥ बेसनलाडु दळियायाला ॥

---

१ मिर्ए. २ नेम्रफळें. ३ वासोते. ४ कांकडयांची. ५ तळलेले.

शिरा पुरि आणि श्रीखंडाला ॥ वाढिति मोते चुरते गोळे ॥
लाडुतिळाचे किंचितकाळे ॥ राघवलाडु ति तारफेणी ॥
वडेघारगे वर्ते लोणि ॥ पायसकेळीं याचि शिखरणी ॥
वाढिति नाजुक पोळि गुळाचि ॥ खापरपोळी दुग्धरसाचि ॥
चुर्मा लाडु मालपोवा ॥ मोहंन्मोक तोउन्हुनूनवा ॥
वांगी भात तो गरम वाढिति ॥ साकर भात रक्तकांति ॥
आळिवखीरी वरणूं कीति ॥ बासुंदीती स्वच्छदुधाचि ॥
केशर बर्फि नारळाचि ॥ ताजे पेढे बर्फिखव्याचि ॥
झुणका अंबटी पंचामृतें ॥ द्राक्षांसार आम्र फन्याते ॥
दहींसाजुक मठ्ठायाशि ॥ ३ ॥ शुद्धरजतरंगकांति ॥
भाताच्यात्या मुदा वाढिति ॥ वर्ते वरान्न कांचन कांति ॥
सद्यस्तप्तघृत वाढिति ॥ सुगंध सीतळ निरचांगलें ॥
सुवर्ण झाऱ्या मधें सुदेलें ॥ ऋषी मानकरि भले भले ॥
व्याहि जावई सर्व बैसले ॥ केशर कस्तुरि तिलक लल्लाटि ॥
शरिरीं लाविति सुगंधऊटी ॥ सुगंध पुष्पमाळा कंठीं ॥
अन्नाचा बहु परिमळ सुटला ॥ तो अंबर भेदित गेला ॥
भोजन इछा होयसुरांशि ॥ वधुवर० ॥ ४ ॥

(वधुवराचे पंक्तीस सर्व ऋषी, व्याही, मानकरी, बसून मोठ्या आदरानें भोजन समारंभ होत असतां, )

**दमयंती सख्या०—** (येऊन कौतुकानें दमयंतीस सांगतात) हे दमयंती, नल करींचा मुखीं ग्रास घेऊन तूं पतीचे मुखांत ग्रास घाल. तुझी माता आदि करून कौतूक पाहण्याकरितां उभ्या आहेत.

## आर्या.

ह्मणति नारी राया, द्यावें नवरी मुखांत घिवराचे ॥
ग्रासा मगतूं देई, दमयंती पांच घांस सुवराचे ॥ १ ॥

याप्रमाणें चारदिवस भोजनादि मानपान सत्कारानें करून भीमकराजानें जामातास आंदण रथ, वाजि, कुंजर, दा-

सदाशी, अलंकार, वस्त्रें, अपरमीत देऊन सर्वांस वस्त्रेंभूषणें, हारगजरे, तुरे तांबूल, देऊन पूजिले. चारदिवसांनी ऐरिणी पूजन करून साडे झाल्यावर नलराजानें आपले नगरीं वधुसमवेत जाण्याची तयारी केल्यावर दमयंतीस हातीं धरून वडील माणसांस नमस्कार करून निरोप घेता झाला.

**नलराजा.**— ( दमयंतीसमवेत वडील माणसांस नमस्कार करून निरोप मागतो. ( माहाराज आह्मांस आज्ञा असावी.

## आर्या.

( धरुनि नवरी हातीं, राजा वडिलांस नम्र नमन करी ॥
मागे निरोप जेंव्हां, जा वदण्याशीं तयांच न मन करी ॥१॥ )

**भीमकराजा.**—( नलास आशिर्वाद देऊन ह्मणतो. ) हे नलजामाता माझी दमयंती गुणवान आहे हिचें पालन ममतेनें करून आपले गृहीं सुखरूप सुख भोगून निरंतर कुशलार्थ कळवून आमचा समाचार घेत जावा.

## ओवी

राजाह्मणे नलराया ॥ माझी गुणवती आहे तनया ॥
इजवर करी तूंमाया ॥ नेईनिलया तूं समारंभें ॥ १ ॥
पत्रपाठवी वरचेवर ॥ आमचा घेतजा समाचार ॥
भूमंडळीं तूं अतिचतुर ॥ तुज फार सांगणें नको ॥ २ ॥

**दमयंतीची माता.**— ( अति सद्गदित होऊन नेत्रानें अश्रूगाळून राजास आशिर्वाद देऊन विनविते. ) राजारे आजवर हीचें पाळण पोषण करून वाढविली; ही माझी गरीब धाकटी गुणवंती दमयंती हिचें पाळण सदयमनेंकरून हिचे हातें सेवा घ्यावी आणि आह्मास आनंदद्यावा ह्मणजे मसूतकाल दुःखाचा विरडेल नेणून एखादेवेळीं सेवेंत चुकेल जरीं तर ती क्षमाकरून तीस उपदेषित जावें बरें.

पद

खमाज. ( साजणी वेडिझालें फार० )
याचाली वर.

आजवर पाळोनिमी ॥ दिल्हि आजतव हातीं ॥ धृ ॥ समर्यादधाकटि गरिबहिगाई ॥ रक्षीतुंगुणवंती नेणतिच द-मयंती ॥ १ ॥ नवमास पोटीं रक्षोनिभार ॥ वाढविली वर्णूं कितीं विसरवि इचि खंति ॥ २ ॥ जातस्त्रियांची पुरुषाधीन ॥ वागणुक त्याचे हातीं इजवर धरप्रीती ॥ ३ ॥ निजवस्तु पालनी सांगणे कांहीं ॥ ममतेनें पोटीं येती उमासेहे मजम-ती ॥ ४ ॥

मातापित्याचा निरोप झाल्यावर दमयंती आपल्या जिवलग गडणीस विनविते.

**दमयंती.**— हे प्राण सख्यांनों मी आतां पतीबरोबर सासरीं जातें. आतां मजवर लोभ असावा, माझी आठवण त्दयांत ठेवावी आणि वरचेवर कुशलार्थ कळवून माझा समाचार घ्यावा ( असें बोलून निघाली तेसमयीं दमयंती स्फुंदस्फुं-दोन रोदन करिती झाली. )

पद.

( यशोदे बाई आज निरुपाय झाला, कृष्ण घडोघडीं छ-ळितो आह्मला. )
या चालीवर.

निजग्रहिं जातें मी, लोभ असू द्यावा ॥ माझिया स्नेहाची आठवण तुह्मिठेवा ॥ धृ० ॥ जिवलग तुह्मिगडणी, ममतेच्या खाणी ॥ क्रीडोनि तुमच्याशीं, रिजविलें जीवा ॥ १ ॥ वरचेवर तुमचा, येणाराहातीं ॥ प्रीतीने मजलागीं, संदेसायावा ॥ ॥२॥ मित्रत्वाऐसा, संसारिं मधुर ॥ नाहीं हो साजणी, सुख-कारी मेवा ॥ ३ ॥ जात स्त्रियांची, पुरुषा अधिन ॥ जाणें त्यामागें हो, निरोप मजद्यावा ॥ ४ ॥

लाहान थोरांचा निरोप घेऊन दमयंती सहवर्तमान गज-स्कंदी मिरवत मंगलवाद्य गजर करित होत्साता सपरिवार नलराजा आपले नगरास जाता झाला.

### श्लोक.

मालिनीछंद.

करुनि नमन सर्वां राज कन्या सुसीला ॥
नल निजनगराशीं जाय घेऊन तीला ॥
करि मग निजगेहीं इंदिरा पूजनातें ॥
धन वसन सुदानें तोष देत्या जनातें ॥ १ ॥

इतिश्रीनलोपाख्याननाटकाचा द्वितिय अंक

समाप्त.

## अंक. ३

### पात्रें.

| | |
|---|---|
| सूत्रधार. | नाटककर्त्ता. |
| नट. | त्याचा सोबती. |
| नल. | निषध देशचा राजा. |
| दमयंती. | त्याची स्त्री. |
| फरास. | बिच्छाईत करणारे. |
| सूतिका. | सुइण. |
| द्वापर. | यूग तिसरें. |
| कलि. | यूग चौथें. |
| पुष्कर. | नलदायाद. |
| वार्ष्णेय. | सारथी. |
| इंद्रसेन. | नलराजाचा मुलगा. |
| भीमक. | विदर्भ देशचा राजा. |

सभासद, सेवक, दासीजन, प्रधान, नागरीकजन.

### प्रवेश. १

स्थल. रंगभूमी.

सूत्रधार. व नट.

सूत्रधार.— अरे नटा, नल दमयंती सहवर्तमान गेल्यावर पुढें कसें काय झालें त्याचाखेळ करून सभासदांचें रंजन करावें.

नट.— ( पुढें येऊन सभासदांपुढें इकडे तिकडे फिरून हास्यकरित होत्साता सभासदांस विनंति करितो ) हे सभासदहो सावधान असावें नल दमयंतीचा स्वयंवर संभ्रम झाल्यावर त्याची कशीव्यवस्था झाली त्याचा खेळ करण्याचा सूत्रधाराचा आदेश[1] आहे; यास्तव मोठे गांभिर्यानें अवलोकन केलें पाहिजे.

---

१ आज्ञा.

## प्रवेश २.

### नलाचा रंगमहाल.

नलराजा. दमयंती.

**नलराजा.**— ( आपले आदर्श युक्त रंगमाहालांत दमयंतीसह सुखासनीं बसून दमयंतीस ह्मणतो ) हे प्राण वल्लभे तुझा लाभ व्हावा ह्मणून फार इच्छा करित होतों बरें.

**दमयंती.**— हे प्राण नाथ, तुमचा लाभ मला होऊन या देहाचें सार्थक करावें अशी इच्छा करून श्रीस[1] वारंवार प्रार्थित होतें. तो योग अंबेनें पूर्ण केला आतां मजपासून सेवा घेऊन माझें पालन करावें ह्मणजे जन्म घेतल्याचें सार्थक होईल.

### पद.

( कृपा घना तुज कां नये करुणा. )

याचालीवर.

ध्यास मनाशीं हा निशिदिनि होता ॥ होइन कधीं या पदाची दासी ॥ धृ ॥ आत्म तुल्य ललना[2] प्रति नाथ ॥ रंगरति संसारि यांशि ॥ १ ॥ सारिखाचि विलसे जरि जोडा ॥ तोष तरीं जनदृष्टी यांशि ॥ २ ॥ हंसवाणि करुनी गुण रूपा ॥ ऐकुनियां भुलने मनाशीं ॥ ३ ॥ अहर्निशीं मी प्रार्थित होतें ॥ देई अंबे नलरूप राशी ॥ ४ ॥

### आर्या.

गौरी पूजन योगें, वरसुगुणी रूपराशि ललनाशी ॥
मिळतां धन्यसतीती, कुल वधुला जार संग मल[3] नाशी ॥

**नलराजा.**— हे सुंदरी कोकिलरवे, गुणवती, मनोवृत्तानुसारिणी, लावण्यश्री मिळाली असतां त्याचा संसार सार होतो.

---

१ लक्ष्मी. २ स्त्रियांस. ३ दोष.

## श्लोक.

वसंत तिलका छंद.

शृंगार शास्त्र रसिका शशशावनेत्रा ॥
लीला स्वतापे हरिणी परिरम्य गात्रा ॥
नाथव्रता प्रिय तमाललना जयातें ॥
त्याचा द्वितीय वरें आश्रमहो जयातें ॥ १॥

**दमयंती.**— हे मनोरम वल्लभा राजेंद्रा पुरुषास धर्म सुलभ आहे. कसा ह्मणाल तर एकस्त्री मनोवृत्तासारिखी नसल्यास तो आपले अर्थ पुरविण्यासाठीं दुसरी वरितो. तसें स्त्रियांस नाहीं; एक वार जाशीं संबंध घडेल त्याशींच जन्म गुजरला पाहिजे.

## आर्या.

ह्मणते दमयंती नर, एका चतुरा न दूसरी वरितो ॥
तैसें नव्हे स्त्रीला ॥ कुत्सित जरि भाग जन्मजों वरितो ॥१

**नलराजा.**— हे सुशीले दमयंती, तूं व्यवहार नीति जाणतेस येणें करून माझें चित्त सदा प्रसन्न राहील आणि तूं यालोकीं मान पावून उत्तम लोकीं नांदशील.

## श्लोक.

शार्दूल विक्रीडित छंद.

जाणे जी व्यवहार शास्त्र नितिशी आणी तशी वागते ॥
भर्त्याचा अभिमान पूर्ण धरुनी तत्कीर्तिला सांगते ॥
सेवा त्याचि करी प्रसन्न हृदयें धर्मानुकूलासती ॥
यालोकीं जनमान्य होउनिकरी स्वर्गी सदा वास ती ॥१॥

**दमयंती.**—( प्रार्थना करिते, ) हे मच्चित्त मानस मराळा भूपाळा

---

१ ससा. २ मुलगा. ३ क्रिडेकरून श्रम हरिवणारा. ४ सर्वावयव सुंदरी दुसरा श्रेष्ट आश्रम ह्मणजे गृहस्थाश्रम. ६ होतो. ७ मोक्षातें. ८ अर्थ, हेतु, इ. ९ माझें चित्त हें मानससरोवर आणि तेथील तूं हंस.

नलराजा दमयंतीस घेऊन उपवनीं गेल्यावर नाना परी क्रीडा करून दमयंतीचें रंजन करिता झाला.

**नलराजा.**— हे चारूसीले, मन्मथ सदने, दमयंती, सुख शयनीं निद्रा करूं वरें.

## प्रवेश. ४

### राजवाडा.

### नल, दमयंती, त्यांचे आप्त सुह्रद.

त्याप्रमाणें उपवनीं दमयंतीसह क्रीडा करून प्रातःकाळीं तिचे सहवर्तमान राजवाड्यांत येऊन राज्यकारण संपादन करिता झाला.

**दमयंती.**— ( प्रभातकाळीं स्नान करून पतीची भोजन करण्याची तयारी उत्तम प्रकारची करून सेवकांस आज्ञा करिते. ) सेवक हो, राजास भोजन करण्याकरितां येण्यास विनंती करा.

**नलराजा.**— ( सेवकांनीं विनंती पूर्वक भोजनास येण्याची सुचना केली असतां राजा पाकशालेंत येऊन ब्राह्मणगण आप्त सुह्रदांसह भोजन करून दमयंतीचा गौरव करितो. ) हे पीयुषकरे वल्लभे, तुझी हस्तक्रिया फार उत्तम आहे.

**दमयंती.**— राजानें भोजन केलें असतां त्याचे रत्नजडीत उच्छिष्ट ताटांत आपण भोजन करून आपले भोगमंदिरांत जाती झाली.

## प्रवेश. ५

### भोगमंदिर.

### नल. दमयंती.

**नलराजा.**— ( सभास्थानीं जाऊन भद्रासनावर बसून, प्रजेचे पालनाचा धर्म संपादन करून, सायंकाळीं नित्य कर्म संपादून, दमयंतीचे महालीं गेला. तेथें मंचकावर बसून दमयंती

दूर, सलज्ज, हास्यमुखी, पाहून तीस ह्मणतो. ) प्रिये, शय्ये वर कां येत नाहींस ?

**दमयंती.**— ( अतिलज्जित होऊन नतमुखी होत्सातां राजास विनविते. ) हे नरवरा स्वामी, मी शय्या स्पर्श करण्याजोगी नाहीं.

## लावणी.

### खमाजराग.

पति वीण जाहाल्या मिहि रागे.

या चालीवर.

ऋतुमति झालें अतांची, कशि सेवा करुं तुमची. ॥ धृ ॥ स्नान करोनि सकाळीं ॥ चिरडी नेसुन काळी ॥ कुंकु लावुन भाळीं ॥ हळदी ही मुख कमळी ॥ शिरिं लेउन जाळी ॥ ल्यालें अंजिरि चोळी ॥ अलंकार सारे घालुन नटलें ॥ द्वारिं उभी कधींची ॥ क० ॥ १ ॥ रंगित मंदिर सजवीलें ॥ परिमळ धूपें भरिलें ॥ हारस्वयें गुंफीले ॥ गजे पुष्पांचे झेले॥ पाच अत्तर अणवीले ॥ तार्टी तांबुल भरिलें ॥ गाद्या गिरद्या नुतन भरिल्या ॥ अशिहौस मनाची ॥ क० ॥ २ ॥ तल्पकिं सुमनें रचिलीं ॥ सुगंध शय्या केली ॥ कुचतटिं रंगित लिहिली ॥ पत्रावलि[1] हिकपोलीं[2] ॥ केशर कस्तुरि खलिली ॥ गंध कचोळी भरलीं ॥ दौणामर्वा केतकी पाच ॥ चंपक गंध भराची ॥क०३॥ भर शृंगाराचा ॥ करुन मि दिवसाचा ॥ बहु जव[3] मदनाचा ॥ अति हर्षमनाचा ॥ आज दिवस सणाचा ॥ मनि लोभ रतीचा ॥ धरुन मि होतें आनंदांत ॥ अलि फेरि याची ॥ ४ ॥

---

१ वेलचुटी. २ गालावर. ३ वेग.

## श्लोक.

इंद्रवज्राछंद.

न्हावोनि आजी सुमनें सकाळीं ॥
नेसोनियां चंद्रकळाहि काळी ॥
शृंगार नानापरि हा रमाया ॥
केला परी स्पर्शु नकाच राया ॥ १ ॥

## श्लोक.

शार्दूल विक्रीडितछंदः

न्हावोनी दमयंति तुर्य दिवसीं नेसोनि शुभ्रांबरा ॥
नेत्रीं अंजन सोगयांच भरुनि शृंगार वाहे बरा ॥
भाळीं कुंकुचिरी मुखास हळदी मुक्तालका कामिनी ॥
रायानें शयनी तिच्या सहसुखें ती लोटिली यामिनी ॥१

(नलराजानें दमयंती ऋतुमति भोगिली असतां पूर्ण रती होन्सातां गर्भधारण करिती झाली.)

(दमयंती गर्भिणी झाली असतां तिला डोहाळे होऊं लागले ते येणेप्रमाणें.)

## श्लोक.

शार्दूलविक्रीडितछंद.

झाली ती रमणी कृशा सुगरिमा[1] कुक्षींत[2] वाहे सदा ॥
मूर्छावांति करी अरोचक मुखें थुंकी त्यजी सर्वदा ॥
जृंभा[3] ग्लानि धरी सिमंतिनि[4] तदां रोमांच अंगी जिचे ॥
सस्तन्याति कठीण शाम मुख ते वक्षोजें[5] होती तिचे ॥१॥

(याप्रमाणें दमयंतीस दोहदलक्षणें झालीं असतां नलराजा तिचे महालांत येऊन तीस अंकावर घेऊन विचारितो.)

**नलराजा.**— हे कुरंगनेत्रे दमयंती, तूं कृश कां झालीस, व्याधीनें किंवा गरोदर आहेस हें सांग बरें.

---

१ जडत्व. २ कुशींत. ३ जांभई. ४ दमयंती. ५ कुच.

**दमयंती.**— हे नाथ, मला कांहीं व्याधि नाहीं. ( दमयंतीचें व्याधि नाहीं असें वचन नल ऐकून ती गर्भिणी आहे असें मनांत समजला. )

**नलराजा.**— ( दमयंतीस आलिंगन देऊन ह्मणतो. ) हे आपन्न[1] सत्वे विलासिनी, तुझी इच्छा कशावर जाते हें सांग, लाजूं नको.

## ओव्या.

निजजाया दोहवती[2] ॥ समजतां आल्हादोन भूपती ॥
आलिंगून पुढतपुढती ॥ तिजमती पुसतसे ॥ १ ॥
तुझी इच्छा कशावरी ॥ हें सांगेवो सुंदरी ॥
पूर्ण करीन या अवसरीं ॥ दुर्मिल जरीं असेल तें ॥ २ ॥
सांगावया जरीं लाजशी ॥ तरी व्यंगता ये गर्भाशीं ॥
शास्त्र व लोकरुढी अशी ॥ मन्ययाशी येतसे ॥ ३ ॥

( नलराजा वैद्यशास्त्राचें मत दमयंतीस दाखवितो. )

## श्लोक.

वसंत तिलकाछंद.

वायु मकोप करितां तिजला न देतां ॥
मागेल तेंच अति दुष्ट पिता स्वमाता ॥
त्याच्या कुदोष गतिनें स्विय पाप मानें ॥
होईल कुब्ज मकहीन करांघ्रिकानें ॥ १ ॥

**दमयंती.**— ( पतीचें वाक्य श्रवण करून लज्जा निगूढनतमुखी ह्मणते. ) हे प्रियकरा, लक्षशः विप्रसुवासिनीस वस्त्रालंकार देऊन पंचपक्वान्नांनीं भोजन घालून त्यांहीं भुक्तशेष आपण तुमचासह भोजन करावें अशी इच्छा आहे.

## ओव्या.

ऐकोन पतीचें वचन ॥ दमयंती बोले लाजुन ॥
सुवासिनी विप्रां अन्नदान ॥ करून भोजन करावें ॥ १॥

---

१ गर्भिणी. २ गर्भिणी.

सौभाग्यवायनें अलंकार ॥ तयांशीं देउनि अपार ॥
नूतन भूषा समग्र ॥ तीणें शरीर शोभवावें ॥ २ ॥
अशी इच्छा मममानसीं ॥ ती कथिली हो तुजशीं ॥
समर्थ तूं पूर्ण करिसी ॥ निश्चयेसी राजेंद्रा ॥ ३ ॥

( नळराजा कौतुकानें गर्भिणीची आस पूर्ण करिता झाला. )

## आर्या.

जीजी इच्छा वाटे, दमयंतीतें समर्थ पुरवाया ॥
राजा ह्मणोन नव्हे, दोहद इच्छा नसोस पुरवाया ॥१॥

नळराजा यार्णे पुरोहिताचे अनुमतें पुंसवनादि[1] संस्कार गर्भाचे केले असतां नवमास पूर्ण होतांच दमयंती प्रसूत झाली.

## प्रवेश ६.

### सूतिकागृह.

### नळराजा, दासीजन सूतिका.

**सूतिका.**— ( दासीस ह्मणते. ) दमयंतीस पुत्र झाला ह्मणोन राजास लौकर कळवा बरें.

## आर्या.

दासीस सूतिका ती, ह्मणते रायास शीघ्र कळवाया ॥
जा हो सुपुत्र झाला, पाहुन वदतील जन सकळ वाह्[2] या[3] ॥१॥

**दासीजन.**— ( राजापाशीं जाऊन राजपदाचें अभिवंदन करून विनविती. ) हे राजन्, दमयंती प्रसूत होऊन पुत्र झाला.

## ओव्या

दासीजन ह्मणतो हो भूपती ॥ प्रसूत झाली दमयंती ॥
पुत्र झाला तिजप्रति ॥ आतां निगुति उत्साह करा ॥ १॥

**नळराजा.**— ( आनंदभरित होऊन त्या दासी जनांस साडी चोळी पृथक् पृथक् देता झाला. )

## ओव्या.

दमयंतीस झाला सुंदर सुत ॥ ऐकोनि राजा आनंद भरित ॥

---

१ पुंसवन, संस्काराचें नांव. २ वाहवा. ३ यामुळास.

तयास चिरे[1] चोळ्या अर्पित ॥ मग करित उत्साह बहु ॥१॥
रायें नगर शृंगारिलें ॥ दिव्यमंडप उभारिले ॥
पुरोहितास पाचारिलें ॥ स्नान केलें तत्क्षणीं ॥ २ ॥
उल्हाट[2] यंत्राचा भडिमार ॥ मंगलवाद्यें वाजती अपार ॥
तोरणें बांधोन राजद्वार ॥ शोभवी सत्वर तेधवां ॥ ३ ॥
पुत्रमुख पाहावया ॥ पुरोहितासमवेत राया ॥
आणिक ब्राह्मण घेऊनियां ॥ अरिष्ट[3] निलया चालला ॥२

नल०— ( दासीजनास सांगतो. ) हे दासीजनहो, मी ब्राह्मणासमवेत पुत्रमुख पाहाण्याकरितां सूतिकालयीं येतों, आमचे प्रियेस सूचना करा.

दासीजन.—( दमयंतीचे जवळ येऊन विनवितो. ) हे स्वामिणी दमयंती, भूपति पुत्रमुख पाहाण्याकरितां ब्राह्मणासमवेत येत आहे.

पद.

गज्जल.

( आला वनमाळीं रात्रीं सत्यभामे मंदिरीं. )

याचालीवर.

पुत्रमुख पाहावया नलराय पातला ॥ धृ० ॥ बसुनी तुं खटेवं[4] वरी निज वस्त्र सावरी ॥ आनंदाचा दीस सखे तुज आज उगवला ॥ १ ॥ दुंदुभिया वाजताती बंदिजन गर्जती ॥ नैषधाचे कुलावरी वंशध्वज लागला ॥ २ ॥ भरोनीयां घागरी ॥ नागरीक सुंदरी ॥ द्वारिं[5] हेली घालिताति ओघजाय निम्नगेला[6]॥३॥ रत्नताटें आचंण्यांनीं[7] भरूनीया सुवासिनी॥ भरावया ओटि तुझी मेळ त्यांचा दाटला ॥४॥

[न]लराजा.—( पुरोहितविप्रांसह सूतिकाग्रहीं जाऊन, विधानें करून, पुत्रमुख पाहून, बालकाचे मुखांत मधुबिंदु घालिता झाला. )

---

१ वस्त्रें. २ तोफा. ३ प्रसूत होण्याचे खोलींत. ४ बाजेवरी. ५ सूतिकेच्या घरापाशीं पाणी वोतितात तें. ६ नदी. ७ ओटी भरण्याचें साहित्य.

### अभंग.

सूतिकेचे मंदिरांत ॥ विप्रासह प्रवेशत ॥ १ ॥
विधिविधान करून ॥ राय पाहे पुत्रानन ॥ २ ॥
मधु बिंदु मुखीं घाली ॥ दमयंती आनंदली ॥ ३ ॥
विसरूनियां वेधना ॥ हर्षे पाहे पत्यानना ॥ ४ ॥

## प्रवेश. ७

### राजवाडा.

### नल.

( नलराजा पुत्रावण विधि संपादनकेल्यावर भांडार फोडून, अमितधनदानें ब्राह्मणांस देऊन, शर्करेने शकट[1] भरून, सर्वांस साखर वाटून, बंदिवान मुक्तकरिता झाला.

### ओव्या.

नामकरण[2] विधि संस्कार ॥ करोनियां नरेश्वर ॥
फोडोनियां भांडार ॥ धन अपार विप्रांस दे ॥ १ ॥
मुक्तकरी बंदिवान ॥ शर्करेनें शकट भरून ॥
पुढें वाद्यगजर येऊन ॥ आनंदानें वांटीतसे. ॥ २ ॥

इकडे दमयंती पुत्राच्या द्वादशदिवशीं नामकरण विधि झाल्यावर सुवासिनी सह पुत्रास पालरयांत[3] घालून इंद्रसेन असें नाम ठेविती झाली.

## प्रवेश ८.

### रंगभूमि.

### सूत्रधार व नट.

नट— ( हे सूत्रधारा, दमयंतीस एकपुत्र इंद्रसेननामेंकरून, व दुसरी कन्या इंद्रसेना यानामेंकरून, अशीं दोन अपत्यें झालीं, तेणें तीं संसारीं सुशोभित असतां तिचे सह क्रीडा व देवातिथी पूजन, पंचमहायज्ञ, अग्निहोत्रादि देवयज्ञ, पितृयज्ञ,

---

१ गाडे. २ बारसें. ३ पालण्यांत.

व्रतें, दानें, करून आनंदमय राज्य करित असतां त्यांस प्रारब्ध योगें करून अनिष्टदशा प्राप्त झाली तो खेळ करून दाखीव.

**सूत्रधार.**— ( सभासदांपुढें येऊन खिन्नमानसहोत्सातां सभासदांस विनवितो. ) हे सभासदहो, येथवर खेळ क्रीडाकौतुकाचा असून क्लेशास कारण जो नलदमयंतीचा संसार त्याचा खेळ करून दाखवण्याची इच्छा नट करितो, तेणें करून माझें चित्त फार खिन्न होतें. परंतु जें प्रारब्धें नियमित आहे तें हरिहरांसही अलोट. यास्तव प्रालब्ध भोगणें व पाहाणें अवश्य आहे. तर पूर्वानुसंधानाकडे अवधान द्या बरें. दमयंतीनें इंद्रादिदेवांचा त्याग करून नलास वरिलें, असें देवांचे मुखें श्रवण करून कली संतप्त होऊन "नल दमयंतीचा सूड घेईन" अशी प्रतिज्ञा करून नल नगरीं नलाचें छिद्र पाहात गुप्त होता.

## ओवी.

पुण्यश्लोक नलराय ॥ तेथें नसे अधर्माशि सोय ॥
कली करावया अपाय ॥ करी उपाय बहुवर्षें ॥ १ ॥
द्वादश संवत्सर गेलियावर ॥ लघुशंका करून नरेश्वर ॥
पाद प्रक्षाळितां नीर ॥ गुल्फका[1] वर नाहीं गेलें ॥ २ ॥
किंचित चरण कोरडा राहिला॥त्यांतोन कली संचारला॥
नलदेहीं विस्तारला ॥ मग मांडिला अपाय तेणें ॥ ३ ॥

## प्रवेश. ९

## पुष्करगृह.

### कलि. द्वापर. पुष्कर.

**कलि.**— ( द्वापरास ह्मणतो. ) हे अग्रजा द्वापरा, मी राजाचे अंगी कांहीं संधी पाहून प्रवेश केला. तूं वृषभहो, मी कपटी

१ पायाचे डोळे, घोटे.

आहेत, यातें जाणत नाहीं कसें बरें.

### आर्या.

जन ह्मणती काय असा, राजा अनुकूल द्यूतकर्माला ॥
झाला हे त्यजुनन घे, रामस्मरणार्ह[1] हेतु करमाला ॥१॥

**प्रधान.**—( रायापुढें येऊन हात जोडून विनवितात. ) हे राजन्, द्यूत व्यसनांत तल्लीन काय झालां? अपयश येऊन सर्वधन धान्य हरण होत आहे. याणें कपटपाश केले आहेत, तर आतां खेळ पुरे करावा.

### आर्या.

प्रधान ह्मणती राया, टाकावा खेळ सर्व कपट असे ॥
शेवटवर कोण तरे, कुत्सित कर्मां करोनि कुभट असे ॥१

**नागरिक संभावितजन.**— हे राजा, हा कपटी कपटपाश करून खेळतो, याणें सर्व वैभव हरण केलें. याशीं खेळूंनको. यास बाहेर घालीव बरें.

### श्लोक.

मालिनीछंद.

वदति सुजन राया याशि खेळूंनकाची ॥
असति कपट फासे बुद्धि ऐका न काची[2] ॥
हरिल सकल राज्या दुःख देईल हाजी ॥
श्रमित करिल आह्मां बोलतां हांजिहांजी ॥ १ ॥

**दमयंती.**— ( इला अंतःपुरांत दासींनीं वर्तमान सांगितल्या वरून ती घाबरून सभास्थानीं येऊन राजास विनविते. ) हे राजन्, या शत्रूपाशीं द्यूत खेळूंनका. सर्व प्रजा, प्रधान, या कर्मांचा निषेध करित आहेत त्यांचे ऐका.

### श्लोक.

स्रग्धरा छंद.

बोले कांता नलाची करयुग जुळुनी दुःख अस्मादिकां हो ॥

---

१ रामस्मरणा विषयीं श्रेष्ठ हेतु करणारी माला. २ अहो.

हाहा राजा तुं ऐके सकळ विनविती द्यूत खेळूं नकाहो ॥
आलें कर्मास कां हें असुन चतुर तूं काय झाला विचार॥
पावे नाशास सद्यां नच मनन करी हीत लोकोपचार॥१॥

## पद.

राग जोगी.

(मुद्रे सांगेहो मजपाशीं कांत्यजिलें रामाशीं)

याचालीवर.

अतां तरि काय करूं यासमर्यां राजा ऐकत नाहीं ॥धृ०॥
केशी आहेही कालगती ॥ राजा भुलुनीचित्तीं ॥ वैभव
हरवीतो सांगुंकिती ॥ जनहे रोदन करिती ॥ १ ॥ प्रभु-
शीं सांगाया दटाउनी ॥ अणुतरीं कोणा लागुनि ॥ प्रधा
न विनवीती आर्जउनी ॥ करिती बहुशोक मनीं ॥ २ ॥
याची जाणेना कपटकळा ॥ राजा आहे भोळा ॥ येतें
काय तरी या भाळा ॥ कठींण दिसते वेळा ॥३ ॥ हाहा-
कर्म कसें ओढवलें ॥ त्याचें फळ हें आलें ॥ अपुले ह-
स्तानें बुडवीलें ॥ रायें कैसें केलें ॥ ४ ॥

श्रवण करून जन दीर्घ रोदन करूं लागले, आणि राजा स्तब्ध होऊन उगीच बसला ॥

## आर्या.

उरलें नाहीं काहीं, "दमयंतीला पणास घाल तुं रे" ॥
दायादानें वदतां, जनमुखि वाजति विशोक याचितुरे[1] ॥१

## श्लोक.

इंद्रवज्रा छंद.

मागे पणाला दमयंति जेव्हां ॥
राजा नबोले प्रतिवाक्य तेव्हां ॥
शोकीं बुडाली नलराजकांता ॥
फोडोनिभाळा करिती अकांता ॥ १ ॥

---

१ वाद्य.

## प्रवेश ११.

दमयंती. वार्ष्णेय.

दमयंती.— ( शोकाकुल होऊन वार्ष्णेयसारथी यास ह्मणते. ) हे सूता रथ लौकर आण, आणि हीं माझीं दोन्हीं मुलें घेऊन माझे माहेरीं नेऊन पोहोंचीव आणि हें वर्तमान भीमकायास सांग.

### ओवी.

वार्ष्णेय नामा सारथी ॥ याशीं ह्मणे तेव्हां दमयंती ॥
बालकें वाहोनियारथीं ॥ पितृगृहाप्रती पोहोंचवी ॥१॥

### पद.

राग पिलू.

( कंसें अक्रूरपाठविला गोकुळाशीं )

याचालीवर.

बाळें माझी पोंचवी माहेराशीं ॥
वार्ष्णेया तूं संभाळून नेयी यांशीं ॥ धृ० ॥
दध्योदन तें घालुनी भोजनातें ॥
अंग्डें टोपी घालुनी बाळकांतें ॥
गालीं बोटें तिटलावि अपुले हातें ॥
दृष्टी होईल तान्हीया राजसांशीं ॥ बा० ॥ १ ॥
स्फुंदस्फुंदून दमयंती रडे तेव्हां ॥
बाळेंमाझी दृष्टीशीं पडतील केव्हां ॥
कोपलाशी मजवरी कैसा देवा ॥
फुटला पान्हा पाजूं हा कवणाशीं ॥ बा० ॥ २ ॥
दुरदेशीं धाडणें बाळकाला ॥
काय आलें माझिया कपाळाला ॥
जन्मांतरीं मी अन्याय काय केला ॥
ह्मणुनी घडतो विघड यांचा माशीं ॥ बा० ॥ ३

१ कपाळावर आणि गालावर काळीं बोटें.

अवदशाही लागली अह्मांपाठीं ॥
विपरित बुद्धी रायाची यांचे साठीं ॥
दारिद्रानें बाळकें होतिल कष्टी ॥
माय पाळिल माझिया आत्मजाशीं ॥ बा० ॥ ४ ॥

**वार्ष्णेयसारथी.**—( दमयंतीस ह्मणतो. ) तूं यांची काळजी करूं नको. काल सुपरीत झाला ह्मणजे या बालकांची तुझी भेट होईल. व यांचें पालन तुझेहून तुझी मातापिता अधिक करितील.

## आर्या.

सारथि बोले स्वामिणि, आतां तूं काळजी कधीं नकरी ॥
विपरित काळाचीगति, ब्रह्मादिक यां क्षणांत हीन करी ॥१॥

## श्लोक.

इंद्रवज्रा छंद.

घालोनि तेव्हां रथि बालकांतें ॥
जावोनि भेटे कथि भीमकातें ॥
वार्ष्णेय बाळा मति पोंचवोनी ॥
घेई निरोपाशिच आचवोनी ॥ १ ॥

## ओवी.

बाळकें ठेवोनि विदर्भनगरीं ॥ वार्ष्णेय प्रवेशे अयोध्यापुरीं ॥
येरीकडे वर्तमान ते अवसरी ॥ कथिता झाला तेधवां ॥ १ ॥

## प्रवेश १२.

नल. नलदायाद.

**नलदायाद.**— ( नलास पुन्हां ह्मणतो ) तुजपाशीं कांहीं उरलें नाहीं, दमयंतीचा पण घालून खेळ, नाहीं तर डाव पुरे कर.

## ओव्या.

दायाद ह्मणे नलाशीं ॥ दमयंती घाली पणाशीं ॥
ना तरीं खेळ समाप्तीशीं ॥ करोनि येथुन उठावें ॥ १ ॥

उमयतां टाका अलंकार ॥ निघा माझे नगराबाहेर ॥
नेसावयास एक अंबर ॥ घेऊनि सत्वर निर्घरे ॥ २ ॥
नल दमयंती वस्त्रालंकार ॥ देऊन चालली नगराबाहेर ॥
जन करिती हाहाकार ॥ ह्मणती सर्वेश्वर कोपला ॥ ३ ॥
आपण राजा झाला ह्मणोन ॥ दंवडी फिरवी गर्जोन ॥
वश करोनि प्रधान ॥ राज कारण संपादी ॥ ४ ॥

**इति नल राज्य हरण नाम.**

**तृतीयांक समाप्त.**

# अंक. १

## पात्रें.

| | |
|---|---|
| सूत्रधार. | नाटककर्ता. |
| नट. | त्याचासोबती. |
| नल. | विदर्भदेशचा राजा |
| दमयंती. | त्याची भार्या. |
| कर्कोटक. | नाग. |
| ऋतुपर्ण. | राजा. |

मुनिवर, राजमाता, सुनंदा, सुबाहुमाता, सेवक

## प्रवेश. १

स्थल. रंगभूमि.

सूत्रधार नट.

**सूत्रधार.**—नलराजा एक वस्त्रानिशी दमयंतीसह नगराबाहेर गेल्यावर त्याचा कसा काय परिणाम झाला त्याचा खेळ करून सभासदांचें रंजन करण्यास तूं दक्ष आहेस तर लौकर तयारी कर पाहूं.

**नट.**—( सभासदां पुढें येऊन, परमदुःखी उगीच उभाराहून, दीनमुख करून, विस्मय करित होत्साता सभासदांस विनंती करितो. ) हे सभासदहो, नलराजाचें राज्यवैभव पुष्कर दायादानें हरण करून त्यास दमयंतीसुद्धां एक वस्त्रानिशीं राज्याचे बाहेर घालविल्यावर त्यांणीं विपत्ति काळ कसा घालविला त्याचा खेळ करून दाखविण्याची इच्छा सूत्रधार करितो, तर सर्वांनीं धैर्य धरून अवलोकन करावें.

नलदमयंती नगराबाहेर जाऊन एक्या ओसाड धर्मशाळेंत उपोषित त्रिरात्र राहिलीं असतां दमयंतीचे हाल राजानें पाहून तो हृदयांत फार कष्टी झाला. आणि त्याचे मनांत असें आलें कीं हा विपत्तिकाळ आहे यांत ही सकु-

मार माहेरीं गेली तर हिचा बंदोबस्त चांगला राहील आणि आपण निरुपाधी होऊं.

## प्रवेश २

नल. दमयंती.

**नल.**— हे कोमलांगे प्राणवल्लभे दमयंती, मला कालानुरूप विपरित बुद्धि होऊन मी द्यूतकर्मात लुब्ध झालों, तेणेंकरून ही दारिद्र घोरदशा प्राप्त झाली आहे. अशा प्रसंगीं तूं आपले माहेरीं राहाशील तर तुला क्लेश होणार नाहींत.

### लावणी.

( सखयेगे होते जिवाची लाही ॥ कसे टाकुन गेले गुणग्राही )॥ या चालीवर.

माहेराशीं दमयंती तुं जागे ॥ श्रमशिल वनि कोमलांगे ॥धृ॥
सुखासनीं बसुनी फिरणारी ॥ पुष्प शय्येवरी निजणारी ॥
मधुरान्नें सदा जेवणारी ॥ येऊंनको सखे ममसंगें ॥ १ ॥
फिरणेंगे असे आड वाटे ॥ रुततील तुझेपदिं कांटे ॥ लागतील उन्हाळिचेपेटे ॥ कर्मदशा आहे माझ्या मागें ॥ मा०॥२॥
व्याघ्र सिंह वनांतरिं घोर ॥ सर्प क्रिडीं फिरति अनिवार ॥
पाहोनियां भिशील तूं फार ॥ झालामधें पडतिस कांगे ॥३॥
पापदशा संसारि उदेली ॥ विपरित बुद्धि मला झाली ॥
निजहस्तें दशा अशी केली ॥ कष्टूनियां भरशिल रागें ॥ ४ ॥

### श्लोक.

स्रग्धरा छंद.

माहेराशीं तुं जाणें वनि फिरशि कशी अन्न वस्त्रां विना तूं ॥
पाळी राजासुखानें निजगृहिं विमले आत्मजापाशि[2] नातु ॥
कष्टा आली दशा जी भरुन दिसतिचे भेटणें तें सुखाचें ॥
आपत्काळीं नसावी तुजअशि सुरुपा पाळणें हें विखाचें॥१॥

---

१ हळा. सळा. २ मुलांपाशीं.

दमयंती.— हे प्राणजीवना, माझें अंतःकरण पाहाणें नलगे. मी तशी गौतीस्त्री नव्हे; पतीस आपत्काळ प्राप्त झाला असतां त्याचा त्याग करिते, अथवा अमर्यादा करिते, किंवा सुमनानें त्याशीं वागत नाहीं, अशी जी स्त्री ती नरकपंथास जाते. कुलवधु पतीचे वैभव काळीं किंवा विपत्काळीं सारखी विनय संपन्न होत्सातां सेवा सुमुखें करिते त्याचा वियोग तिला लव मात्र सहन होत नाहीं; मला तर तुह्मांशिवाय एक घटका युगाप्रमाणें होऊन वियोगाग्नीनें प्राणान्त होतो. यास्तव मी आपलेपाशीं जेथें जसे राहाल तेथें सेवा करून राहीन, यांत सर्व सौख्य पावेन. माहेरीं प्राणान्त झाला तरीं जाणार नाहीं.

## श्लोक.

### स्रग्धरा छंद.

जाचे वांचोनि जीला लवयुग समहो हास्यवाणी रुचेना ॥
वाटे कारागृहाचे परिघर शरिराची निगाही सुचेना ॥
वैरी भासे निशेचा पति ऋतु पहिला पुष्पहारांहि जेवी ॥
कानी नाणीच केव्हां रसविविधकथा प्राणरक्षार्थ जेवी ॥ १

## आर्या.

ऐशा कुलवधुला हो, करूनि विरहास सूज्ञ वागे ना ॥
राया मीही तैशी, तुझियासेवे विनान्य मागेना ॥ १ ॥

## ओव्या.

दमयंती ह्मणे अगाराया ॥ जन्माची सांगातिण ही जाया ॥
या दशेंत तुह्मांस त्यजुनियां ॥ जनकालया जाते कशी ॥ १ ॥
तुह्मी घेऊन मशीं चला ॥ भेटा जाऊनि श्वशुराला ॥
तो कांहीं राज्य देऊनि आपणाला ॥ दारिद्र्याला हरिलपैं ॥ २
विपत्तिकाळीं आप्त गुण ॥ करिताति संकट हरण ॥
विलंब न करावा अर्धक्षण ॥ दशा संपूर्ण हरेल तेथें ॥ ३ ॥

---

१ मूर्ख. २ क्षण. ३ शुश्रूषा. काळजी. ४ अही, सर्पा, प्रमाणें हार.

**नलराजा.**— हे चातुर्यखाणी दमयंती, आपल्यास विपत्तिकाळ आला असतां सुत्द्दाचे घरीं जाऊंनये. तेथें गेल्यानें अपमान होतो. त्यांत श्वशुरगृहीं तर विपत्तिकाळीं जाऊंच नये. तूं कन्या जरीं गेलीस तरीही मान्य नव्हे, परंतु स्त्रियानें माहेरीं राहणें एकपक्षीं बरें, अशा हालांत वागणे हें मात्र कठीण आहे. यास्तव तूं जाशील तर चांगलें, मला चल ह्मणतेस हें चांगलें नाहीं.

### श्लोक.

#### शार्दूलविक्रीडित छंद.

बोले तो नलराज भीमकसुते प्राणान्त झाला जरीं ॥
आप्ताचे घरिं दैन्यकाळिं नवसे तेथें मती लाजरी ॥
होवोनी हत भाग्य खेद करितो अत्यंतगे सुंदरी ॥
या पेक्षां सुख माग याच समयीं जी पर्वताची दरी॥ १ ॥

### अभंग.

सुत्द्दाचे घरीं आपत्काळीं जातां ॥
अवमानें माथा लवे सदा ॥ १ ॥
जाला भाग्य आहे त्याला सर्व जन ॥
देताती गे मान अहर्निशीं ॥ २ ॥
जाचे गांठीं आहे द्रव्याची गे कोटी ॥
जन त्याचे साठीं राबताती ॥ ३ ॥
एक द्रव्या वीण सर्व शून्य आहे ॥
विचारुनी पाहे सुजाणे तूं ॥ ४ ॥

**दमयंती.**— हे विचारदक्षा प्रियकरा, आपले विचारास येईल तसा कालक्षेप माझे सहवर्तमान करावा, माझा आग्रह कांहीं नाहीं.

### ओव्या

दमयंती बोले मधुर बोल ॥ जैसा तुमचे मना येईल ॥
तैसा घालवा विपत्काल ॥ सेवा सकल करीन मी ॥ १ ॥

मज विषयीं कांहीं कठीण ॥ मनांत नाणी मद्दूषण ॥
तूंच माझा असशील प्राण ॥ एक क्षण न विसंबे ॥ २ ॥
त्वद्वीयोगानलबाधा ॥ नसोसे मजला कदा ॥
सदैव पाहातां मुखारविंदा ॥ मज आपदा नसे पैं ॥ ३ ॥

## लावणी.

( तुझी धुंद नयनकां झाली, अपरात्र फार कुठे केली. )
या चालीवर.

जगीं सौख्य पतीविण नाहीं ॥ इतरातें करुंतरी काई ॥ धृ ॥
पतीविण सर्वालंकार ॥ ते शरिरीं होती भार ॥ भूषाती प्रिय सत्कार ॥ सारिभर पायीं ॥ १ ॥ राजा अथवा गरिबाची ॥ जी ललना तरुणी साची ॥ पतिविण तीचे मदनाची ॥ कशि तरि सोई ॥ २ ॥ पुरषाहुन तो अष्ट. गुण ॥ स्त्रीदेहामधिं पंच बाण ॥ त्याचि शांती ती पतिवीण ॥ करुनि सुख देई ॥ ३ ॥ पति तत्पर ज्या ललनास ॥ नाहिं दुसऱ्याची ती आस ॥ काय करणें माहेरास ॥ राहिन तव पायीं ॥ ४ ॥

— अशी नलदमयंतीचीं भाषणें होऊन स्थीर राहिलीं. परंतु उपोषीत जठराग्नि संतप्त करित होत्साता घोर वनांत प्रवेश करिते झाले. तों कलि शकुंत पक्ष्याचें स्वरूप धरून राजाचे संनिध भूमीवर फिरुं लागला. त्यास धरून त्याचे मांसानें क्षुधाग्नि शांत करावा असें नलाचे मनांत येऊन त्यास धरण्या करितां राजा प्रयत्न करूंलागला. तो पुढेंपुढें पळूंलागला. त्याकाळीं नलानें नेसतें वस्त्र अर्धें त्याचे अंगावर टाकिलें असतां पक्षी तें वस्त्र आसडून वस्त्रासहित उडून झाडावर गेला, आणि ह्मणतो. "मी कलि. तुझें वस्त्र नेण्या करितां पक्षी झालों" असें त्याचें भाषण ऐकून नलराजा नग्न असून फार खेद करिता झाला. हें प्रिया दमयंतीनें पाहून आपले अर्ध वस्त्रानें राजाचें शरीर झांकिती झाली.

## ओव्या.

परस्परें अनुवादत ॥ दोघें प्रवेशती घोरवनांत ॥
अत्यंत झाले क्षुधाक्रांत ॥ तव शकुंत तेथें दिसे ॥ १ ॥
मांसल पक्षी यास पाहुनी ॥ त्याचे मांसें जठर वन्ही ॥
शांत करावा ह्मणोनी ॥ आणी मनीं नल तेव्हां ॥ २ ॥
पक्षी यास धरूं धावत ॥ तंव तो पुढें उडोनी जात ॥
नेसतें वस्त्र राव त्वरित ॥ त्यावर टाकित तेधवां ॥ ३ ॥
वस्त्र आसडोन पक्षी गेला ॥ नल तेव्हां नग्न झाला ॥
द्विज वृक्षी आरूढला ॥ बोलूं लागला नला पाशीं ॥ ४ ॥
"मी पक्षी नव्हें असें कलि ॥ तव वस्त्र नेण्यास प्राप्त केली" ॥
तों दमयंती धांविली ॥ राजा खालीं पाहतसे ॥ ५ ॥
अर्ध वसन देउनि रायास ॥ झांकी त्याचे शरिरास ॥
एकवस्त्र नेसोन आसमास ॥ फिरतां बहुवस[1] शीणती ॥ ६ ॥

## श्लोक.

### इंद्रवज्रा छंद.

शाकुंत पक्षी वसनास जेव्हां ॥
घेऊनि गेला नळ नग्न तेव्हां ॥
पाहोनि अर्धे निज अंबरास ॥
वैदर्भि देई सुमुखें वरास ॥ १ ॥

— दमयंतीनें दिल्हेलें राजा वस्त्र नेसून दोघे एकवस्त्रानिशी फिरत असतां क्षुधेनें विव्हळ झालीं. तों एक नदी आढळली तिचे तीरीं आले. तेथें कलि मच्छ होऊन उदकाबाहेर पडला. त्यास पाहून राजानें धरून पाक करण्याकरितां दमयंती पाशीं दिल्हा.

## आर्या.

नदितटिं फिरतां दोघे, कलि उदका भिन्नमच्छसा पडला ॥
राजासंनिध जाउनि, धरितां कपटी करांत सांपडला ॥ १ ॥

---

१ बहूत.

## ओव्या.

नल रायें मच्छ धरिला ॥ दमयंतीकरांत दिधला ॥
ह्मणे पचवोनिगे याला ॥ याक्षुधेला शांतवूं ॥ १ ॥
धुवोनि स्वच्छ करण्या साठीं ॥ त्याचे मुखीं तेव्हां गोरटी ॥
करांगुळी घालितां मच्छ पोटीं ॥ अमृत वृष्टी झाली पैं ॥ २ ॥
दमयंती बोटांचें अमृत ॥ लागतां मच्छ झाला जित ॥
उसळोनि गेला उदकांत ॥ झाली चकित दमयंती ॥ ३ ॥
पाहातां नल क्रोधावला ॥ रागें भरे दमयंतीला ॥
ह्मणे नयनें मच्छ धरिला ॥ घालविला तो तूं कसा ॥ ४ ॥

— नल दमयंती क्षुधाक्रांत तशींच फिरत असतां सायंकाळ झाला असतां एक्या धर्मशाळेंत तृणशय्या करून निद्रिस्थ झाली त्यांत दमयंतीस दुःखानें गाढ निद्रा लागली. नल जागृत राहिला. त्याचे मनांत कलीनें संचार करून ग्रावरें केलें ह्मणून नलाचे मनांत दमयंतीचा त्याग करून जावें असें आलें. जाण्यास अडचण, एक वस्त्र दोघांनीं परिधान केलें होतें. आतां जाणें घडत नाहीं. इतकें नलाचे मनांत येतांच कलीनें सुरी टाकिली. ती वाजतांच राजानें घेतली व तिणें वस्त्र मधें छेदून दमयंतीचा त्याग करण्यास निश्चय करून तिला तेथें निद्रिस्थ ठेऊन निघाला. कंठ सद्गदित झाला. त्याग करवेना. परंतु कलीनें मनास बाध केला. जावेंच असें वाटून पंचभूतांची प्रार्थना करितो, "हे पृथ्वि, हे जल, हे तेज, हे वायू, हे आकाश; तुह्मीं माझे प्रियेचें संरक्षण करा" अशी प्रार्थना करून मागें पाहे, पुढें चाले, असा डोळ्यानीं अश्रुगाळित निघाला तो दमयंतीचे गुण आठवीत असून रोदन करित घोर वनांत गेला.

---

१ दिल्हा. २ शिजवून.

### पद.

लइलई मीतकी बडी मजा होयरे.

या चालीवर.

यामिनींत कामिनी कशी त्यजुन जाशिरे ॥ धृ ॥
यावनीं एकली, करुं तरि काय; नव्हति चर्या तुझि अशिरे॥१
ऐशी ग्रीवा, कापुन जाशी; खरी देई मज फांशिरे ॥ २ ॥
तुजविण काया, झाली हि वायां; करूं गति मि कैशिरे ॥३॥
किमर्थचि राग, येउनि सांग; गुमचिकां फसविशिरे ॥ ४ ॥

बालमरे कांहां चलियो लगा.

या चालीवर.

प्राण सखा मजला टाकुन गेला ॥ धृ० ॥
प्रीतिकर असुनी घातच केला,
कोठेंगेला मज विरहित तो शोधा तयाला ॥ १ ॥
एक जिवें भावें वर्तत होतों,
कोणि त्याचा माझा ऐसा विरह केला ॥ २ ॥
कोणिकडे पाहूं प्राण विसाव्या,
धुंडु कुठें सारें वनया समयाला ॥ ३ ॥

— दमयंती असा नला करितां त्या वनांत अट्टाहास्यें[1] शोक करून वनांत फिरत असतां अजगरानें गीळिली. त्या समयीं“ हे नला धांवधांव. तुझी प्रिय कांता अजगरानें गिळिली. इची मुक्तता कर.” असा महान् शब्द करिती झाली; तो शब्द एका व्याधानें ऐकून धांवला आणि शस्त्रानें अजगरास चिरून दमयंतीस सोडविलें आणि तिची स्वरूप रेखा पाहून काममोहित होत्साता आलिंगन देण्यास सरसावला. हें पाहून दमयंती ह्मणते,“ तूं मला भयापासून मुक्त केलेंस ह्मणून माझा पिताच होय“ कारण

### श्लोक.

मातुलः श्वसुरश्चैव विद्यादातातथैवच ॥
अन्नदाता भयत्राता पंचैते पितरःस्मृताः” ॥

---

१ आक्रोशें.

असें शास्त्र आहे. तर मला कन्येला या वनांतून वस्तींत घालीव". असें भाषण करित असतां व्याध कामघूर्मित होऊन दीपावर जसा पतंग झेपावतो आणि भस्म होतो तसा आपला स्पर्श करण्यास उद्युक्त झाला हें पाहून दमयंतीनें श्वास टाकून त्याला तत्काळ भस्म करिती झाली. आणि पुन्हा नलास हांक मारून सिंहव्याघ्रादि भयंकर श्वापदांस ह्मणते " कोणी नल पाहिला असल्यास सांगा, नाहींतर माझें भक्षण करा " असें भाषण करून चालत असतां श्वापदें गहिंवरून मार्ग सोडिती झालीं. दमयंती नलाचा शोध करित उत्तरपंथें चालत असतां तिणें तपोधन ऋषीचें आश्रम पाहिले.

## ओवी.

नलें दमयंतीचा त्याग करितां॥वना माजी ती करित आकांता
इकडे तिकडे फिरत असतां ॥ गिळी अवचिता अजगर पैं॥१
दमयंती मारी दीर्घ हांका ॥ ह्मणे " नला धावे कां ॥
अजगर गिळी तव नायका ॥ अंत पालका पाहूंनको ॥२॥
तिचा घोर शब्द ऐकून ॥ व्याध आला धाऊन ॥
त्याणें अजगर चिरून ॥ त्या पासून सोडविली ॥ ३ ॥
दमयंती ह्मणे व्याधाशीं ॥ भयत्राता तूं पिता असशी ॥
तें नाणितां मनाशीं ॥ पाहून रूपाशी भूलला ॥ ४ ॥
तिचें करण्यास आलिंगन ॥ व्याध गेला सरसावून ॥
तिणें हुंकार टाकून ॥ केलें जाळून भस्म त्याचें ॥ ५ ॥
नला ह्मणोनि हांका मारी ॥ रोदन करी सकुमारी ॥
उत्तरपंथें त्या अवसरी ॥ जात नारी नलाची ॥ ६ ॥
तव ऋष्याश्रम दिसती ॥ तिकडे शोधित जाय सती ॥
तीतें ऋषी तेव्हां पाहती ॥ मनांत करिती विचार ॥ ७ ॥
कोण असे हि देवता ॥ शची पार्वती कीं समुद्रदुहिता ॥
आह्मांस वर द्यावया आतां ॥ ही सर्वथा येतसे ॥ ८ ॥

कीं नलाची दमयंती ॥ असें मुनी परस्पर बोलती ॥
तव समीप जाऊनियां ती ॥ झाली करिती नमस्कार ॥ ९ ॥

**दमयंती.**— ( ऋषींस नमस्कार करून ह्मणते. ) महाराज, माझा नल पती मला टाकून गेला त्याचा शोध सांगा, कृपा करा. मी त्यावीण दीन वनांत फिरत आहें.

### साकी.

पाहुन ऋषि जन करोनि नमन बोले केउ[1]ल वाणी ॥
हरी अपाया करी उपाया तुमची आशिर्वाणी ॥ १ ॥
नल पति माला टाकुन गेला दुःख मि सांगूं काय ॥
होतो त्याविण मजला बहुशिण झिजतो माझा काय॥२॥
या समयाशीं मम नयनाशीं दृष्टिस पडतिल पाय ॥
समर्थ तुह्मीं सांगा नामी मजला कांहि उपाय ॥ ३ ॥
त्या पति वांचुन व्यर्थचि वाचुन घेणें दुःख विभागा[2] ॥
दीना साठीं ममता पोटीं धरुनी सोधा मार्गा ॥ ४ ॥

### श्लोक.

शिखरिणी छंद.

नमोनीयां बोले मधुर वचनें ती ऋषिवरां ॥
त्यजोनीयां गेला मज अशि वनीं सूज्ञ नवरा ॥
तयाचे शोधातें करित फिरतें कालपसुनी ॥
अशी माझी झाली अति तर दशा साध्वि असुनी ॥ १ ॥

**मुनिवर.**—( अत्यंत तिची ग्लानी पाहून ह्मणतात. ) हे दमयंती, तुझीक्लेश गती खंडतांच तुला पति भेटेल बरें.

### ओवी.

देउनियां आशिर्वचन ॥ मुनी बोलती तये लागुन ॥
सत्वर तुज पती भेटुन ॥ सुख संपन्न करील वो ॥ १ ॥

( ऋषीचा आशिर्वाद घेऊन पुढें विंध्याद्रि पर्वत उल्लंघून गेली. तों अस्तमान झाला ह्मणून त्या स्थळीं कोणी सौदागीर उतरले होते, त्यांचे सोबतीनें तेथें वस्ती करून रा-

---

१ दीनाप्रमाणें. २ श्रमकरा.

हिली. इतक्यांत वनांत राहाणारे मत्त हत्ती शतशा येऊन सौदागिरांचा नाश करूं लागले. हें पाहून तेथून पळत कड्यावर जाऊन बसली आणि ह्मणते. ) “ हे नारायणा, तूं कोणते दोषानें पाठ मोहरा झालास ह्मणून अशा प्रसंगांत पडलें ?

## श्लोक.

### स्रग्धरा छंद.

आशिर्वादा मुनीचे ग्रहण करुन ती पंथ चाले दशेनें ॥
विंध्याद्रीला वळंघी मग तिथुन तळीं पातली तों निशेने ॥
केला अंधार जेव्हां नदितटिं सति जी संगतीलागि शोधी ॥
राहे सौदागिराचे निकट ह्मणति ते बाइ साध्वी न सोदी ॥ १

## श्लोक.

### इंद्रवज्रा.

सौदागिरांचे निकटीं बसोन ॥
रात्रीस ती लोटि कढीव सोन ॥
जेवी, परी त्यांत अरिष्ट जेव्हां ॥
होतां सती ती वळघेच तेव्हां ॥ २ ॥

## ओव्या.

शतशा मदोन्मत्त वन करी ॥ ते लोटले सौदागिरा वरी ॥
हाक गर्जली ते अवसरी ॥ भयें सुंदरी घाबरली ॥ १ ॥
अश्व वृषभांसहित सौदागिरां ॥ मारिती गज एक सरां ॥
पळोनि जाय नलदारा ॥ गिरिवरा वळंघी ॥ २ ॥
प्रातःकाळीं पाहे भीमक बाळा ॥ सौदागिरांचा थोडा उरला मेळा ॥
त्याबरोबर राज बाळा ॥ तयेवेळा निघाली ॥ ३ ॥

## प्रवेश. ४

## चैद्यपुर.

### सुनंदा, राजमाता, दमयंती.

## ओव्या.

आली चैद्य पुरा जवळ ॥ नगरांत प्रवेशे वेल्हाळ ॥
पाहतां जन सकळ ॥ झाले विव्हळ कामानळें ॥ १ ॥

नें अश्रुपात ढाळून ह्मणतो. ) काय पाहा! माझे सारखा अभागी या सृष्टींत नाहीं. दमयंती सारिखे रत्नाचा अपराधा वांचून मी त्याग केला. अशी स्त्री रूपगुण संपन्न, मनोवृतानुसारिणी, पतिपरायण असून मी तिचा वनांत रात्रीं त्याग केला हें फार अनुचित कर्म केलें. तिची दशा काय झाली असेल! माझे शिवाय कोणी तिजविषयीं पाप मनांत आणून प्रयत्न करील तर त्यास तत्काल भस्मच करील. तिचें श्वापदांनीं भक्षण केलें असेल. कदाचित् वांचून अरण्यांतून जनस्थानीं राहिली असल्यास उदकावांचून मच्छीण जशी तळमळते तशी मजवांचून तळमळून क्लेश पावत असेल. ( असें तिचें दुःख मनांत आणून रोदन करित वनांत फिरत असतां एक्या डोंगरास वणवा लागला होता तेथून "नला धांव धांव" अशी ध्वनी श्रवण करून जवळ गेला. )

## ओव्या.

दमयंतीचे गुण आठवून ॥ नल करी तेव्हां रोदन ॥
ह्मणे माझे समभाग्य हीन ॥ दुसरा न सृष्टी मधें ॥ १ ॥
महासाध्वी पतिव्रता ॥ रूपगुण संपन्न असतां ॥
रात्रीं वनांत एकटी वनिता ॥ करुनि निष्ठुरता त्यागिली ॥२
मी कृतघ्न दुःष्ट अभागी ॥ वनिता त्यजिली कोण प्रसंगीं ॥
चांगलें तरि मज लागीं ॥ या जगीं ह्मणेल कोण ॥ ३ ॥
भक्षिली असेल श्वापदांनीं ॥ किंवा गेली जनस्थानीं ॥
आयुष्य कैसें मानिनी ॥ दीन होउनि घालवील ॥ ४ ॥
पूर्वीं अविचार निःशंक ॥ करोनि आतां करितों शोक ॥
मज असा मूर्खनायक ॥ मीच एक दुसरा नसे ॥ ५ ॥
ऐसा करून विचार ॥ वनांत फिरे नरेश्वर ॥
तंव चेतला दिसे वैश्वानर ॥ वन अपार जाळीतसे ॥ ६ ॥

"नला धांव "ऐशी ध्वनी ॥ ऐकून राजा तेव्हां कानीं ॥
ह्मणे यांत माझी कामिनी ॥ सांपडोनी आरडते ॥ ७ ॥
धांव घेउनि राव पातला ॥ कर्कोटक नाग तेणें देखिला ॥
वेटाळें घालोनि बैसला ॥ ह्मणे नलाला काढीं मज ॥ ८ ॥
मी पूर्वी रूपगुणतारुण्यमदें ॥ साधूंस छळिलें निंदाशब्दें ॥
मज शापोनिया नारदें ॥ मग वदे उःशापा ॥ ९ ॥
"तूं वणव्यांत सांपडतां ॥ नल तेथें येईल अवचिता ॥
त्याणें तेथुन तुज काढितां ॥ शाप मुक्तता पावशील" ॥ १०
कर्कोटक लाहान झाला ॥ मग नलें वणव्यांतून काढिला ॥
तेणें हस्ताशि दंश केला ॥ ह्मणे नलाला भिऊंनको ॥ ११ ॥
मीं काळ पाहुन दंशिलें ॥ तुझे अंगी विष भरिलें ॥
अपूर्व रूप पालटिलें ॥ नच वोळखिले जाशील ॥ १२ ॥
कोणती बाधा तुज होईना ॥ मी देतों निज वसना ॥
हें रक्षी वीर सेन नंदना ॥ करोनी यत्ना निर्धारें ॥ १३ ॥
तुझी खंडतां कालगती ॥ तेव्हां भेटेल दमयंती ॥
माझें स्मरण करूनि चित्तीं ॥ तूं भूपती पांघरावें ॥ १४ ॥
होईल देह पूर्ववत ॥ वैभव पावशी समस्त ॥
शंका नाणी मनांत ॥ राहे स्वस्छ कोठें तरीं ॥ १५ ॥

**नलराजा.**— ( कर्कोटकास ह्मणतो. ) हे नागारे, तूं मजवर बहुत उपकार केलास.

## आर्या.

केलास दंश जेव्हां, तेव्हां आला मनांत अपकार ॥
परि यांत हीत झालें, राहिन सुस्छळिं भजोनि उपकार ॥ १ ॥

**कर्कोटक नाग.**— ( नलास ह्मणतो. ) हे राजन्, तुझा उपकार मजवर फार झाला. मला जीवदान देऊन शापापासून मुक्त केलेंस. तूं पुण्यश्लोक आहेस. मला आतां निरोप द्यावा बरें.

### श्लोक.

द्रुत विलंबित.

जड शरीर जुनें पडलें ढिलें ॥
परि तुवां अनलांतुन[1] काढिलें ॥
बहुत हा उपकारच येधवां ॥
करुनि बोलशि भीमकजा धवा[2] ॥१ ॥

### ओव्या.

नलाचा घेऊन निरोप ॥ अंतर्धान कर्कोटक सर्प ॥
पावतां तेथुन नराधिप ॥ मार्ग अमुप क्रमीतसे ॥ १ ॥
येऊनियां अयोध्या पुरीशीं ॥ भेटला ऋतुपर्ण रायाशीं ॥
राजा पुसे नाम तयाशीं ॥ येरु नृपा सांगतसे ॥ २ ॥
राया मला बाहुक बोलती॥अश्व परीक्षा सारथ्यगति ॥
शिल्पशास्त्र पाकरीती ॥ विद्या असती निपुणत्वें ॥ ३ ॥

**रुतुपर्ण राजा.**— ( बाहुकास ह्मणतो. ) तुझ्या विद्या ऐकून मला आनंद झाला. माझा सर्व अश्वशाळेचा अधिकार तुला दिल्हा. पूर्वीं नलाचा सारथी वार्ष्णेय याला ठेविलें आहे. त्यावर चतुर कामदार असें समजून स्वस्थ माझे पाशीं राहा बरें.

### श्लोक.

इंद्रवज्रा.

बोले तयाशीं रुतुपर्ण राजा ॥
अश्वाधिकारा दिधलें करा जा ॥
वार्ष्णेय आहे तुं तयावरी हो ॥
सर्वाधिकारी मग तो वदे हो ॥ १ ॥

**जीवनराज सेवक.**— ( एके दिवशीं बाहुकास विचारितो. ) हे बाहुका, तूं निद्रेंत फार विलाप किमर्थ करितोस ?

---

१ विस्तवांतून. २ नवरा.

## ओव्या.

जीवन पुसे हे बाहुका ॥ रात्रीं बहुत विलाप करिशी कां ॥
सर्व सोडोनियां शंका ॥ मजपाशीं कां कथन करी ॥ १ ॥

**बाहुक.**— कोणी एक पुरुष मूर्खत्वानें आपली स्त्री रूपगुण संपन्न पतिव्रता असतां तिला रात्रीं वनांत एकटी टाकून गेला मग तिचे गुण आठवून विलाप करितसे. तें मी पाहिलें होतें त्याचें स्मरण झालें ह्मणजे त्याचा भाव होतो.

## श्लोक.

### स्रग्धरा छंद.

कोणी एके नरानें वनिं निजवनिता साध्वि रूपें गुणानें ॥
अस्तां उत्कृष्ट लोकीं किमपि नसुन गा चूक तीची पणानें ॥
त्यागोनीयां प्रसंगी करि मग जनिं तो मूढ शोकास भारी॥
मी त्या पाहोनि मूर्खा स्मरुनि मनिं कधीं भाव तैसा उभारी॥ १ ॥

इति नल नाटके चतुर्थांक:
समाप्त:

# अंक. ५

## पात्रें.

सूत्रधार. . . . . . . . . . . नाटककर्ता.
नट. . . . . . . . . . . . . त्याचासोबती.
भीमक. . . . . . . . . . . . विदर्भदेशीचाराजा.
दमयंती. . . . . . . . . . . त्याची कन्या.
कलि. . . . . . . . . . . . युग.
सुदेव. . . . . . . . . . . . ब्राह्मण.
वार्ष्णेय. . . . . . . . . . . सारथि.
ऋतुपर्ण. . . . . . . . . . . राजा.

राजमाता, दमयंतीच्या सख्या, सेवक, दासी,
पर्णिदास. बाहुक. इत्यादि.

### प्रवेश. १

स्थल.— रंगभूमि.

सूत्रधार. नट.

**नट.**— हे सूत्रधारा, दमयंती चैद्यपुरीं, व नल अयोध्येंत, राहिल्या वर पुढें काय झालें, त्याचा खेळ करून खेळ पाहाण्यास परम उत्कंठित सभासदांचें रंजन करून गोड कर बरें.

**सूत्रधार.**— ( सभासदां पुढें येऊन थोडें हास्य करून विनविती. ) हे सभासदहो, नटाचे अभिप्रायाप्रमाणें प्रस्तुत खेळाची तयारी आहे. हा पाहाण्यांत अखेर सुख होईल यास्तव निद्रा आलस टाकून चित्त स्वस्थ करून पाहाण्यास उदित असावें ह्मणजे झालें. हा भीमक राजा सुदेवादि आश्रित मंडळी सहित राजमंदिरांत चिंता ग्रस्त बसला आहे.

## प्रवेश. २

### भीमक राजाचें मंदिर.

### भीमकराजा, सुदेवादि आश्रित ब्राह्मण.

**भीमकराजा.**—( दमयंतीचे बालकांकडेस पाहून नलदमयंतीचें स्मरण झालें ह्मणजे शोकाकुल होत्साता क्षीण होऊन ऐके दिवशीं आश्रितब्राह्मणांस पाचारून सांगतो. ) हे विप्रहो, तुह्मीं देशोदेशीं जाऊन दमयंतीचा शोध करावा. जो शोध लावील त्यास सालंकार सहस्र गोदानें देऊन मागेल तें देईन.

### ओव्या.

दमयंतीचीं बालकें पाहुन ॥ भीमक असे शोकसंपन्न ॥
तेणें आश्रित विप्र बोलावून ॥ बोले वचन तयांतें ॥ १ ॥
देशोदेशीं तुह्मीं जावें ॥ नलदमयंतीला शोधावें ॥
ठाई पाडोनियां बरवें ॥ मग यावें सांगावया ॥ २ ॥
जो शोध सांगेल येऊन ॥ सालंकार सहस्र गोदान ॥
त्यास देईन निश्चयान ॥ आणखी काय मागेल तें ॥ ३ ॥

**भीमकाश्रित.**—( राजाचें वचन श्रवण करून राजास ह्मणतात. ) आह्मीं जाऊन महाराजांच्या जामाताचा व कन्येचा शोध करून येतों. स्वस्थ असावें बरें.

### आर्या.

आश्रित ह्मणती राया, कन्या जामात पाडुनी[1] ठाई ॥
शमवूं तवचिंता[2] नलें, तोषें वाटी जनास सुमिठाई ॥ १ ॥

---

१ शोध लावून. २ चिंताग्नि.

## प्रवेश. ३

### चैद्यपूर.

### राजमाता, दमयंती, सुदेव.

### ओव्या.

देशोदेशीं ग्राम नगरीं ॥ वनोपवनीं गिरिकंदरीं ॥
धुंडताती घरो घरीं ॥ नाना परी कुशलपणें ॥ १ ॥
ऐसें शोधितां भूदेव ॥ त्यांत चैद्य पुरीं सुदेव ॥
प्रवेशतां अभिनव ॥ शकुनभाव त्यास हो ॥ २ ॥
प्रवेशला राज मंदिरीं ॥ सुबाहूस भेटोनि लवकरी ॥
प्रवेशला अंतःपुरीं ॥ नमन करी राजमाता ॥ ३ ॥
कुशल वृत्त पुसोनि तिशीं ॥ मग गेला सुनंदे पाशीं ॥
तव तेथें रूपराशी ॥ दमयंतीशीं देखतसे ॥ ४ ॥
शरीर झालें अतितर क्षीण ॥ देहीं ग्लान पंच प्राण ॥
कुरळ केशां मुक्तपण ॥ भूषवीण सर्व काया ॥ ५ ॥
अर्ध वस्त्र परिधान ॥ जसा चंद्र दिसे अभ्रांतून ॥
तैसें दिसे मंदवदन ॥ पाहे निरखून ब्राह्मण ॥ ६ ॥
त्याणे तीतें वोळखिली ॥ तंव ब्राह्मणा वर गेली ॥
दमयंतीची दृष्टी भली ॥ रडूं लागली तनयमोहें ॥ ७ ॥
करूनि विप्राशीं नमन ॥ करूं लागली दीर्घ रोदन ॥
ब्राह्मण रडे गहिंवरून ॥ रडे सद्गदून सुनंदा ॥ ८ ॥
रोदनध्वनी ऐकतां ॥ धांवत पातली राजमाता ॥
ती पुसे कांहो रडतां ॥ काय दुःखता मज सांगा ॥ ९ ॥
ब्राह्मण ह्मणे निश्चल ऐका ॥ ही तव भगिनीची कन्यका ॥
दमयंती ही नलनायका ॥ पावोनि दुःखा वसे येथें ॥ १० ॥
राजमाता आणोनि जळ ॥ धुवोन पाहे कपाळ ॥
वरील जातांनिघोन मळ ॥ रत्न तेजाळ लाल दिसे ॥ ११ ॥

---

१ उत्तम.

भाळीं अक्षय लाल रत्न ॥ तें मावशिनें ओळखोन ॥
मग तिचे गळां पडोन ॥ करी रोदन राजमाता ॥ १२ ॥

**राजमाता.** — काय मी बुध्दिमंद ! केवळ अंधच. माझे बहिणीचें लेंकरूं मी ओळखिलें नाहीं. आणि तिऱ्हाईता सारखी पाळून सेवा घेतली. मी मोठी अपराधी आहें.

॥ पद ॥

क्षण भंगुर संसार, गड्यांनों क्षण भंगुर संसार
याचालीवर.

भूल कशी पडली, सुदेवा ॥ धृ ॥
मंदमती मी केवळ अंधचि, हिलान ओळखिली, ॥ सु० ॥ १ ॥
ममभगिनीची कन्याही मज, नाहिं कसी कळली ॥ सु० ॥ २
मी अपराधी सांगु किती हो, पारक्यासम पाळिली ॥ सु० ॥ ३
दमयंती कोमल तिजपासुन, मी सेवा घेतली ॥ सु० ॥ ४ ॥

**दमयंती.**— मावशि, आमचे कालाची अशीच गती आहे, परंतु तूं फार सदयपणानें पाळण केलेंस. तुला वाईट वाटूं देऊंनको.

## ओवी.

दमयंती ह्मणे वोमावशी ॥ सुनंदे सारखे पाळिलें मशीं ॥
कोणीपाळील आमाशीं ॥ तिऱ्हाइताशीं तुज सम नसे ॥ १

**सुदेव ब्राह्मण.**— ( राजमातेस ह्मणतो. ) तुह्मीं आतां खेद करूं नको कालगती अशीच आहे.

## ओवी.

राजमातेस ह्मणे ब्राह्मण ॥ विपरीत काळाचें कर्म जाण ॥
मौक्तिक[1] पंकें माखतां कोण ॥ ओळखण करी तया ॥ १

**दमयंती.**— ( सुदेवास पुसते. ) माझीं बालकें कुशल आहेत कीं? मजकरितां फार टाकळलीं[2] असतील, माझें स्मरण वेळोवेळा करित असतील ?

---

१ मोति. २ दुःखाने क्षिण झालीं.

## पद.

भेटवा कुणी मीय माण मला.

याचालीवर

सुखि आहेत कीं मम बालकें ॥ मम चित्त हारकें ॥ धृ० ॥ बालपणामधें त्यांशीं झालें ॥ मातृसुख तरि पारखें हो ॥ १ ॥ घडि घडि माझें करुनी स्मरण ॥ रडत असतिल मम दुःखें हो ॥ २ ॥ माता माझी त्वदर्यी धरुनि ॥ रिजविल चुंबुनि मुखें हो ॥ ३ ॥ धिर धरवेना मजला आतां ॥ कधि पाहिन तत्कौतुकें हो ॥ ४ ॥

## आर्या.

बाळें माझीं कुशल कि, असती अजवर सुदेवसांग मला ॥
तूझे दर्शनमात्रें, या चित्ताला सुदेवसा गमला ॥ १ ॥

**सुदेवब्राह्मण.**—( दमयंतीस ह्मणतो. ) हे शुभानने, तुझीं बालकें क्षेम आहेत बरें.

**दमयंती.**— ( राजमातेस ह्मणते. ) मला भीमकाचे घरीं पाठीव.

**राजमाता.**— ( दमयंतीचें वचन श्रवण करून "उत्तम आहे," ह्मणून, बरोबर चतुरंग सेना देऊन, रथ तयार करवून दमयंतीस ह्मणते. ) वस्त्रभूषणें घालून रथांत बैस.

## ओंवी.

दमयंतीस ह्मणते राजमाता ॥ वस्त्रालंकार लेई आतां ॥
पितृ गृहीं जा तत्वतां ॥ माझी ममता सांडू नको ॥ १ ॥

**दमयंती.**— ( राजमातेस ह्मणते. ) मावशी, पतीची भेट झाल्यावांचून वस्त्रालंकार माझे शरीरास दाह करितील माझ्यानें धारण करणें घडत नाहीं. मी अशीच जातें. माझे अपराध क्षमा कर.

## पद

आला वनमाळी रात्रीं सत्यभामे मंदिरीं.

गजलाच्या चालीवर.

अलंकार भार मला पतीवीण होइल ॥ धृ ॥ सख्यावीण

---

१ पाठमोरें. २ सुखी.

होत असे, शरीराचि मृत्तिका ॥ करिन जरिं वेणि फणी, मुख कोण पाहिल ॥ १ ॥ पतीवीण आरशा, मध्यें मुख पाहातां ॥ क्रकेच परी कर्वतुनी, जीव माझा घेइल ॥ २ ॥ पुष्पहार सर्प जसा, मोदगरल लेपन ॥ लावितांचि एकसरें, मम काय दाहिल ॥ ३ ॥ धवावीण सर्व शीण, अलंकार जाचणी ॥ जिवालागिं दुःख सदा, बळें कोण घेइल ॥ ४ ॥

## प्रवेश. ४

### भीमकनगरी.

### सुदेव. भीमक.

### दमयंतीची माता. बाळकें. परिणदास.

सर्वांस विचारून दमयंती सुदेवासहवर्तमान माहेरास गेली. तेथें जातांच बाळें येऊन गळीं पडून रोदन करूं लागलीं. तशीच दमयंतीची माता कन्येस भेटून मोहानें रोदन करिती झाली.

( सुदेव ब्राह्मणानें सर्वांस सुविचाराचा उपदेश करून शांतवन केलें. )

**भीमकराजा.**—( दमयंतीस भेटून सकल वर्तमान श्रवण करून श्रमी झाला, आणि सुदेवास ह्मणतो.) तूं फार मेहेनत करून दमयंतीचा शोध करून तिची आमची भेट केलीस. तुझा उपकार मोठा झाला. ( असा गौरव करून सालंकार सहस्र गोदानें देता झाला. )

### आर्या.

पूजुनि त्याविप्रादे, भीमकराजा सहस्र गोदान ॥
घेउनि पदतीर्थ वदे, पावन केलें असेंहि गोदान ॥ १ ॥

**दमयंती.**— ( आश्रित ब्राह्मणांस बोलावून नमस्कार करून सांगते. ) जसा माझा शोध केला, तसा जो नलाचा शोध लावील त्यास सालंकार सहस्र गोदानें देऊन मागेल तें देईन.

---

१ कर्वत. २ सुवास. ३ एकदांच. ४ पती. ५ गोदावरी.

## अंजनी गीत

दमयंती आश्रित विप्रांस ॥
शोधिल कोणी ह्मणे नलास ॥
सहस्र सालंकार तयास ॥
अर्पीन मि धेनू॥ १ ॥
देशोदेशीं विप्र फिरती ॥
दमयंतीचें वृत्त सांगती ॥
पर्णिदास अयोध्ये निगुती ॥
शोध करी तेव्हां ॥ २ ॥
सुगवा कांहीं त्यास लागला ॥
मग तो मागें परतुन गेला ॥
येऊन दमयंतीस भेटला ॥
हर्षें करी कथन ॥ ३ ॥

**पर्णिदास.**— ( दमयंतीस ह्मणतो. ) मी अयोध्येस मनुष्यमात्रांस तुझें वर्तमान कळविलें. त्यांत राजाचा बाहुक नामें नवा अश्वाधिकारी आहे. त्याणें तुझें वर्तमान आस्थेनें श्रवण करून मनांत फार कष्टी झाला. वर्णा खेरीज सर्व मोहरा नला सारिखा दिसत आहे.

## अभंग.

अयुध्ये[2] मांझारी विप्र[1] पर्णिदास ॥
करित शोधास फिरे तेव्हां ॥ १ ॥
दमयंतीवृत्त कथी घरोघरीं ॥
आवडीनें परी ऐके कोणा ॥ २ ॥
येऊनि बाहुक जवळ बैसला ॥
ऐकोनि कथेला टाकी श्वास ॥ ४ ॥
त्याचीं सारीं चिन्हें विप्रें पाहियेलीं ॥
सर्व वोळखिली नलाकृती ॥ ४ ॥

---

१ ब्राह्मण. २ अयुध्येमधें.

## ओव्या.

मागें फिरला पर्णिदास ॥ येऊन भेटला दमयंतीस ॥
सांगतसे शुभ वार्तेस ॥ ह्मणे अयोध्येस शोधिलें ॥ १ ॥
प्रतिनराशीं तव वृत्त कथिलें॥चित्त लावूनि कोणी ऐकिलें ॥
परि बाहुकें श्रवण केलें ॥ तेणें टाकिलें दीर्घश्वासा ॥ २ ॥
मनांत शोकाविष्ट जाहला ॥ मग मी निरखून पाहिला ॥
नसे वर्ण त्याचा पहिला ॥ आकृतीला मिळतसे ॥ ३ ॥
तो नूतन राजघरीं ॥ झाला असे अश्वाधिकारी ॥
ऐकोनियां ती सुंदरी ॥ ह्मणे खरी बातमी ही ॥ ४ ॥
तव वाम बाहुस्फुरण ॥ होवोनि सांगे शुभलक्षण ॥
दमयंतीनें पूजिला ब्राह्मण ॥ करी कल्याण धनदानें ॥५॥

**दमयंती॰** — भीमकराजास पर्णादासानें सांगितलेलें वर्तमान सांगून पुढें प्रयत्न करण्याची आज्ञा मागते.

**भीमकराजा॰** — ( दमयंतीस ह्मणतो. ) हे कन्यके, सुदेवास पाठवून तो बाहुक येथें येई असा प्रयत्न कर. मीही करितों.

**दमयंती॰** — ( सुदेवास बोलावून त्यास कांहीं गुप्त विचार सांगून ह्मणते. ) सुदेवा, तूं जाऊन ऋतुपर्णासहवर्तमान बाहुक येथें येई असें कर.

## आर्या.

विप्रह्मणे दमयंती, आणिन ऋतुपर्ण बाहुकासहित ॥
स्वस्थ करी तव मानस, होइल ह्या पासुनी बहूत हित ॥१॥

**सुदेव॰**— ( दमयंतीस ह्मणतो. ) तूं स्वस्थ असावें, मी बाहुकासहित ऋतुपर्णास घेऊन येतों.

## प्रवेश. ५

## अयोध्या.

ऋतुपर्ण. ..................... बाहुक.

**सुदेव ब्राह्मण, वार्ष्णेय सारथी, राजसेवक.**

याप्रमाणें दमयंतीस आश्वासन देऊन सुदेव अयोध्येस जाता झाला. ऋतुपर्ण राजास भेटतांच राजानें नमन केलें असतां आनंदाचा भाव दाखवून आशिर्वाद करिता झाला.

### श्लोक.

शिखरिणी छंद.

अयोध्येशीं गेला झडकर मुनी राजसदनीं ॥
रिघोनीयां भेटे नरपति नमी त्यास वदनी ॥
प्रमोदाचा दावी बहुत ऋषि तो भाव करुन ॥
वदे आशिर्वादा कपट विमनी फार धरुन ॥ १ ॥

ऋतुपर्णराजा. —( सुदेवास नमन करून पुसतो. ) हे मुनिवर्या, कोणीकडोन येणें झालें? मनांत काय इच्छा आहे ती सांगा.

### आर्या.

ऋतुपर्ण सुदेवाशीं, प्रश्नकरी कोठुनीं तुह्मी आलां ॥
काय प्रवास कारण, इच्छा मनिं तेंचि आयकायाला ॥१

सुदेवब्राह्मण. —(ऋतुपर्ण राजास सांगतो.) हे राजन्, भीमकराजाची दमयंती कन्या तिणें प्रीतिपूर्वक नल वरिला असतां त्या राजास अवदशेनें द्यूतमिसें करून राज्यभ्रष्ट वनवासी केलें. तेव्हां पातिव्रत्य तीव्र ग्रहण करून त्याबरोबर दमयंती वनवासी होऊन त्याची सेवा करित असतां नलराजा तिचा वनांत कठोरपणें त्याग करून गेला. मग ती वनांत

१ जाऊन.

एकटी फार दुःख पावून चैद्यपुरींत काल कंठून, राजमाते पाशीं होती. तिचा शोध भीमकराजानें करून आपले घरीं आणिली असतां तिणें बहुत काल नलाची मार्गप्रतीक्षा केली, परंतु नलाचा ठिकाणा नाहीं तिचें तारुण्य व्यर्थ जातें, यास्तव ती पुन्हा स्वयंवर करणार याजकरितां कांहीं राजांस सूचना गेली, त्यांत आपणासही करितों. उदयीक प्रातःकाळीं स्वयंवर आहे, तर तुह्मीं तेथें चलावें.

**अभंग.**

भीमकाची कन्या नलाची जी जाया ॥
तिचें यौवन वायां जाऊं पाहे ॥ १ ॥
द्युतीं अवदशा नलाशीं हो आली ॥
मग दोघें गेलीं वना लागीं ॥ २ ॥
एकटी वनांत सांडोनियां तीला ॥
निशेमध्यें[1] गेला नलाख्य तो ॥ ३ ॥
आभागी तो वनीं त्यजुन तिला जातां ॥
तिशीं वनीं व्यथा झाली भारी ॥ ४ ॥
पुढें चैद्य नगरीं येवोनियां राहे ॥
व्हदयांत वाहे स्वामी शोका ॥ ५ ॥
दमयंती तेथें नाम चोरोनियां ॥
काळ कंठावया होती गुप्त ॥ ६ ॥
जावोनियां मी ती राजा वोळखीली ॥
मग तीला नेली माहेराशीं ॥ ७ ॥
आजवरी अस्ता नलाची धरोनी ॥
निराशा ह्मणोनी वरी दुजा ॥ ८ ॥
उदयीक प्रातः[2] स्वयंवर तीचें ॥
ह्मणोनी तूमचें जाणें व्हावें ॥ ९ ॥

**ऋतुपर्ण राजा.** —(मोठा आनंद पावून सुदेवास धनदानानें संतोषवीत होत्साता सेवकास आज्ञा करितो. ) तूं अश्व

---

१ रात्रीं. २ प्रातःकाळीं.

शाळेंत जाऊन बाहुक अश्वाधिकारी याला शीघ्र बलाविलें असें सांग बरें.

**राजसेवक.** — (ऋतुपर्णाची आज्ञा वंदन करून बाहुकास सांगतो.) हे बाहुका, तुला राजा शीघ्र बलावितो.

**बाहुक.** — (राजाची भेटण्याची आज्ञा झाली ह्मणोन राजापाशीं जाऊन वंदन करून ह्मणतो.) हे प्रभो, किमर्थ पाचारिलें बरें.

### ओवी.

बाहुक राजा निकट जाऊन ॥ वंदन करोनि बोले वचन ॥
मला बलाविलें काय ह्मणोन ॥ कृपाकरून कथावें ॥ १ ॥

**ऋतुपर्णराजा.** — (बाहुकास ह्मणतो.) हे बाहुका, उदयीक दमयंतीचें स्वयंवर दुसऱ्यानें होत आहे. यास्तव मला पाचारण करण्यास सुदेव ब्राह्मण आला आहे. तर रातोरात गेलें पाहिजे. याजकरितां रथास अश्व चांगले नेमून रथ तयार करून आण.

### श्लोक.

इंद्रवज्रा छंद.

बोले प्रमोदें ऋतुपर्ण राजा ॥
बा बाहुका सिद्धरथा करा जा ॥
जाणे असें भीमक रावराया ॥
योजी हयां[1] दूर पथा हराया ॥ १ ॥

**बाहुक.** — (ऋतुपर्ण राजाचें वचन श्रवण करून ह्मणतो.) महाराज, उत्तम आहे, रथ तयार करून आणितों. (असें बोलून अश्वशाळेंत येऊन विचार करितो "दमयंतीनें मला नेण्याकरितां ही अपूर्व विचारणा केली आहे." मग अश्वशाळेंतून परीक्षेनें रोडके घोडे जुंपून रथ राजाचे मंदिरा बाहेर स्थीर करिता झाला.)

---

१ घोडे.

## अंजनी गीत.

ऐके वचन ऋतुपर्णाचें ॥
चित्त विचार करी नलाचें ॥
पुन्हा स्वयंवर दमयंतीचें ॥
हें साचें नव्हे ॥ १ ॥
सुगवा माझा धरोन चित्तीं ॥
योजिली ही तिणें युक्ति ॥
तेथें न्यावया मजप्रती ॥
दमयंती इच्छी ॥ २ ॥
रथीं रोडके वाजी जुंपुन ॥
स्यंदन[1] आणि सिद्धकरून ॥
राजा पाहे द्वारीं येऊन ॥
बोले हांसुनत्या ॥ ३ ॥

**ऋतुपर्णराजा.**—(द्वारीं येऊन रथ सिद्ध पाहातांच हास्य करून बाहुकास ह्मणतो. ) हे बाहुका, मला मोठें आश्चर्य वाटतें. मोठे धष्ट पुष्ट अश्व टाकून, रोडकीं तट्टें रथास लाविलींस हीं दूरमार्ग एका रात्रींत कसे क्रमून जातील!

## श्लोक.

शार्दूलविक्रीडित छंद.

बोले तो ऋतुपर्ण हास्य करुनी हे बाहुका रोडके ॥
योजीशी असले रथास तरिहो हे चालती थोडके ॥
रात्रीं माजि कसा क्रमेल पथ तो जो दूर येथोनि गा ॥
केले व्यर्थ कसेच पुष्ट दुसरे राखोन त्यांची निगा ॥ १ ॥

**बाहुक.**— ( ऋतुपर्णास ह्मणतो.) राया, रोडक्यावर काय आहे? यांची गती मी जाणतों. तुला मग कळून येईल.

## ओव्या.

बाहुक ह्मणे ऋतुपर्णाशीं ॥ काय करणें धष्टपुष्टांशीं ॥
मी जाणतों यांचे गतीशीं ॥ कळेल तुजशीं चालतां ॥१॥

---

१ रथ.

## प्रवेश. ६

### विदर्भदेशाचा मार्ग.

### ऋतुपर्ण. वार्ष्णेय.

### बाहुक. सुदेव. कलि.

**ऋतुपर्णराजा.**—( बाहुकाचें वचन श्रवण करून संतोष पावला आणि अश्वांची पूजा करून रथावर बसतानां वार्ष्णेय सारथी व सुदेवास रथावर घेतलें. बाहुकानें तीव्र वेगानें रथ चालविला असतां राजाचें उत्तरीय[1] वस्त्र खालीं पडलें; तें "घेघे" असें बाहुकास राजा ह्मणाला त्याजवरून बाहुक ह्मणतो, "बारा योजनें दूर राहिलें" असें श्रवणकरून राजा ह्मणतो.) अशी अश्वगती मातुली[2] अथवा नल जाणतो. ही विद्या तुला कोठून लाभली ?

#### अभंग.

सुदेव ब्राह्मणा सारथी वार्ष्णेया ॥
रथीं घेवोनीयां बैसे तेव्हां ॥ १ ॥
बाहुकानें वेगें रथ चालवीला ॥
पाहोनी गतीला राजा तोषे ॥ २ ॥
इतक्यांत खालीं ते पडे उत्तरीय ॥
घेघे ह्मणे राय बाहुकाशीं ॥ ३ ॥
ऐकोनी बाहुक हांसोनियां बोले ॥
राया तें राहीलें भागीं दूर ॥ ४ ॥
घेघे ह्मणतां बारा योजनें हा रथ ॥
क्रमोनीयां पंथ आला वेगें ॥ ५ ॥
ऋतुपर्ण बोले वाजिविद्या ऐशी ॥
नलमातुलीशीं मात्र येते ॥ ६ ॥
तुजतरीं कोणी विद्या शिकवीली ॥
प्रत्यक्ष पाहिली नयनीं ह्यां ॥ ७ ॥

---

१ अंगवस्त्र. २ इंद्रसारथी.

**बाहुक.**— ( रथ चालवित असतां मार्गांत एक बिब्याचा वृक्ष अढळला, तेथें रथ थांबवून ऋतुपर्णास ह्मणतो. ) हे राजन्[1] तूं गणितविद्या जाणतोस, तर या वृक्षाचीं फळें व पानें किती आहेत तें सांग.

## ओव्या.

नल बाहुक ह्मणे ऋतुपर्णाशीं॥ तूं गणितविद्या जरीं जाणशी॥
पर्णे[1] फळें या भल्लातकाशीं[2] ॥ करून गण तिशीं कथी किती॥ १ ॥

**ऋतुपर्णराजा.**— ( बाहुकाचें वचन श्रवणकरुन गणित करून फळें पर्णें सांगितलीं; तीं नलानें मोजून पाहातांच बरोबर भरलीं तेव्हां बाहुक संतोष पावून ऋतुपर्णाशीं भाषण करितो. )

## आर्या.

गणतीकरून तेव्हां, सांगे ऋतुपर्ण पर्णफळ सारीं॥
मोजुनि नल मनिं ह्मणतो,विद्या दुसऱ्यास नाहिंया सारी॥१॥

**बाहुक.**— ( ऋतुपर्णास ह्मणतो. ) हे राजन्, ही गणितविद्या तुला सर्वोत्कृष्ट येते. ही व दुसरी अक्षन्हृदय[3] परिज्ञान ही विद्या मला सांग, मी पालट[4] अश्वगतिपरीक्षा उपचार[5] विद्या सांगेन. कारण एक गुरूचे सेवनानें, किंवा गुरूस यथेष्ट धन दिल्यानें, अथवा विद्येचे बद्दल त्यास दुसरी विद्या दिल्यानें विद्येची प्राप्ति होते. चौथा उपाय यास नाहीं. याम शास्त्रप्रमाण.

## श्लोक.

गुरुशुश्रूषया[6] विद्या पुष्कलेन धनेनवा॥
अथवा विद्यया विद्या चतुर्थं नैव लभ्यते॥ १ ॥

याप्रमाणें शास्त्र आहे तर विद्या देणें घेणें हें युक्त आहे.

## श्लोक.

बाहूक बोले ऋतुपर्ण राया॥
विद्या हि द्यावी गणती कराया॥

---

१ पानें. २ बिब्बा. ३ फांसेविद्या. ४ मोबदला. ५ औषधकरणें. ६ सेवा.

मी अश्वविद्या तुजलागिं देतों ॥
बरें ह्मणे बाहुक यांतिं देतो ॥ १ ॥

**ऋतुपर्णराजा०** — ( बाहुकास गणितविद्या व अक्षहृदय परिज्ञान दोन विद्या देऊन अश्वविद्या बाहुकापासून घेता झाला. )

## ओव्या.

गणितविद्या तो ऋतुपर्ण ॥ बाहुकास शिकवोनि जाण ॥
अक्षहृदय परिज्ञान विद्या पूर्ण ॥ त्यांत निपुण करीतसे ॥१॥
दोन विद्या बाहुकास ॥ शिकवोनि शिके अश्वविद्येस ॥
विद्यालाभ परस्परांस ॥ होतां हर्षास पावले ॥ २ ॥

## अभंग.

अक्षहृदय विद्यापरिज्ञानें झाला ॥
तेव्हां त्या कलीला बहु त्रास ॥ १ ॥
नलाचे शरीरा बाहेर पडोनी ॥
कली जोडी दोन्ही हात तेव्हां ॥ २ ॥

**कली.**— ( नलास अक्षहृदयविद्या परिज्ञान होतांच त्याचे शरीरांतून बाहेर पडून नलाचे चरणीं मस्तक ठेवून ह्मणतो. ) हे बाहुका, तुझा छल व्यर्थ केला, याजकरितां तुला वर देतों, तुझे व दमयंतीचे चरित्राचें व ऋतुपर्ण राजाचें व कर्कोटक नागाचें स्मरण करणाऱ्यांस मी बाधा करणार नाहीं. हें सत्य वाक्य मान बरें. ( असें बोलून बिबव्याचे झाडांत शिरला. लोक बिबव्याचे झाडाखालीं कोणी बसत नाहींत, याचें कारण हें. )

## अभंग.

कलि वदे नला व्यर्थ छल तुझा ॥
केला ह्मणुनी माझा वरा घेई ॥ १ ॥
कर्कोटक नाग ऋतुपर्ण राजा ॥
तूं आणि भार्या तुझी यांतें ॥ २ ॥

---

१ बाहुकास. २ गणित विद्या. ३ रुतुपर्ण. ४ स्त्री

स्मरे आणी ऐके तुझीया चरीता ॥
त्याचे पुढें माथा लवे माझा ॥ ३ ॥
ऐसें बोलोनियां चिंबच्याचे झाडांत ॥
होवोनियां गुप्त राहे कली ॥ ४ ॥
भल्लांकन छाया वर्ज बसावया ॥
तेव्हां पासोनियां कवी बोले ॥ ५ ॥

यारीतीनें परस्पर विद्या शिकून पुन्हा रथारूढ होऊन रथ बाहुकानें चालविला.

## ओवी.

परस्पर विद्या शिकले ॥ मागुती रथा रूढ झाले ॥
दोघेही मनीं हर्षले ॥ मार्गी चालले तेव्हां ते ॥ १ ॥

## प्रवेश. ७

## दमयंतीचा माहाल.

### दमयंती. तिच्या सख्या.

**दमयंती**— ( गच्चीवर जाऊन अयोध्येचे मार्गाकडेस पाहाते तों एक रथ येत आहे असें पाहून सख्यांस ह्मणते. ) हे प्राण सख्यांनो, तो रथ येत आहे त्याची चालण्याची गती नलाप्रमाणें दिसते. तेव्हां नलच असेल. ( असें ह्मणत आहे तों दमयंतीचा डावा बाहू स्फुरण होऊन, डावा नेत्र लवला ह्यां वरून सख्यांस सांगते. ) सख्यानो शुभचिन्हें होत आहेत!

### श्लोक.

शार्दूल विक्रीडित छंद.

जावोनी दमयंति सात मजली गच्चीवरी राहुनी ॥
बोले ती सखयांशि येत रथ हा याची गती पाहुनी ॥
वाटे हा नलराज चालवि रथा ऐशीहि वाजीगती ॥
अन्याची नच, तों तिचे तनुसहो चिन्हें शुभें सांगती ॥१॥

१ चिंचवा.

## ओवी.

दमयंतीची डावी बाही ॥ स्फुरूं लागली ते समयीं ॥
वाम नेत्र लवे तेंही ॥ सख्यां प्रती सांगतसे ॥ १ ॥

**दमयंती सख्या॰** — ( दमयंतीस ह्मणतात. ) हे इंदुवदने दमयंती, तुझा वाम नेत्र लवतो, हा प्रियकराचे मुख पाहील, तसाच वामबाहु स्फुरतो तो जिवलगाचें गाढालिंगन करील. हीं शुभ चिन्हें आहेत.

**दमयंती॰** — ( सख्यांस ह्मणते. ) तुह्मीं भाषण करितां हे खरें झाल्यास तुमची वाचा शर्करेने पूर्ण करीन बरें.

असें परस्पर बोलतात तों रथ विदर्भ नगरांत आला. राजमंदिरा जवळ आले तों लग्न समारंभाचीं चिन्हें कोठें नाहींत हें पाहून ऋतुपर्ण लज्जित झाला. तों भीमकास श्रुत झाले कीं अयोध्याधिपती भेटीस आला तें ऐकून भीमक सामोरा जाऊन परस्पर भेटले.

## प्रवेश. ८

## भीमकाचें घर व जवळील वाडा.

### ऋतुपर्ण. भीमक. नल. केशी. दमयंती. देव.

## ओव्या.

सख्या दमयंती अनुवादती[2] ॥ तों रथ पातला शीघ्र गती ॥
वैदर्भपुरींत येतां मंदगती ॥ होवोनियां चालत ॥ १ ॥
आले राजमंदिरा समीप ॥ तेथें पाहे नराधीप ॥
तव मंगल कार्याचा साक्षेप[3] ॥ कांहींच कोठें दिसेना ॥ २ ॥
ऋतुपर्ण झाला लज्जायमान ॥ भीमकास समजलें वर्तमान ॥
तो सामोरा ये धावून ॥ ने सत्कारून निजालयीं ॥ ३ ॥
परस्पर कुशल वृत्त पुसती ॥ एकमेका आलिंगिती ॥
प्रेमभरें अनुवादती ॥ मग बैसती सुखासनीं ॥ ४ ॥

---

१ दंड. २ भाषण करती. ३ खरे पणा.

**भीमकराजा.** — ( ऋतुपर्णास ह्मणतो. ) हे पार्थिवो ऋतुपर्णा, कोणी कडोन येणें झालें ? काय कार्याची योजना आहे तें सांगावें.

## ओवी.

भीमक ह्मणे ऋतुपर्णराया ॥ काय कार्य चिंतुनियां ॥
आरंभिलें प्रवासकार्या ॥ या समयाशीं सांग पा ॥ १ ॥

**ऋतुपर्णराजा.** — ( भीमकाचें वचन श्रवण करून ह्मणतो. ) हे भीमक राजन्, तुमचे भेटीस फार दिवस झाले ह्मणोन येण्याचें प्रयोजन आहे, दुसरें कार्य कांहीं नाहीं.

## ओवी.

ऋतुपर्ण ह्मणे भीमकाशीं ॥ फारदिवस झाले भेटीशीं ॥
ह्मणोनि पातलों दर्शनाशीं ॥ उद्यीक अयोध्येशीं जाणें असे ॥१

**भीमकराजा.** — ( ऋतुपर्णास राहाण्याकरितां उत्तम मंदिर नेमून ह्मणतो. ) रात्रौ तुह्मास जागर[2] झाला आहे. तर निद्रा करून विश्रांति करावी बरें.

## आर्या.

निजदर्शनका प्रीत्या, ऋतुपर्णाशीं रहावया जागा ॥
नेमुनि भीमक बोले, जागर नाशा करावया जा गा ॥१॥

( भीमकराजानें नेमिल्या मंदिरांत ऋतुपर्ण जाऊन उतरला. तेथें बाहुक अश्वासह उतरला आणि बाहुकानें यथाप्रयती अश्वाची सेवा केली असतां, त्याचे श्रम दूर होऊन सुखी झाल्यावर बाहुक निजासनीं विश्रांती करिता झाला. )

## ओव्या.

भीमकानें नेमिले मंदिरीं ॥ राहून ऋतुपर्ण विश्रांती करी ॥
मग बाहुक ते अवसरीं ॥ श्रम हरी अश्वांचे ॥ १ ॥
बाहुक सोडोनि परिकरें[3] ॥ निजासनीं होवोनि स्थीर ॥
निद्रा करोनि क्षणभर ॥ घे समाचार अश्वांचा ॥ २ ॥

---

१ पृथ्वीपती. २ जागरण. ३ कवर.

**दमयंती.** — ( केशी नामें दासीस ह्मणते. ) अगे सखे, तूं त्या बाहुका पाशीं जाऊन येण्याचें कारण विचारून त्याचीं लक्षणें पाहा.

## अभंग.

सांगे दमयंती अगे केशी दासी ॥
तूं बाहुकापाशीं जावोनियां ॥ १ ॥
सर्व चिन्हें त्याचीं पाहोनियां यावें ॥
मग तुवां न्यावें बालकांशीं ॥ २ ॥
ऐकोनी शिवासी जाऊनियां वेगें ॥
येवोनियां सांगे वार्ता सर्व ॥ ३ ॥

## प्रवेश. ९

### बाहुकस्थान.

### बाहुक. केशी.

**केशीदासी.** — ( बाहुका पाशीं जाऊन त्यास विचारिते. ) तुमचें येणें कशाकरितां झालें ?

**बाहुक.** — दमयंतीचें पुन्हा स्वयंवर आहे असें आमचे राजानें ऐकिलें यास्तव अह्मीं आलों.

## प्रवेश. १०

### दमयंतीचे मंदीर.

### दमयंती, केशी.

**केशीदासी.** — ( त्या बाहुकापाशीं बसून त्याचीं सर्व कृत्यें लक्षणें वगैरे पाहून दमयंतीपाशीं सांगते. ) हे स्वामिणी दमयंती, त्यापुरुषाची वागणूक नलासारिखी आहे बरें, ठेंगणे दारांतून मान खालीं नकरितां लाहान होऊन वागतो, व तृण काष्ट यांस फुंकतांच अग्नी प्रज्वलित होतो, रिक्त घटाला स्पर्श करून आंत जळ उत्पन्न करितो, त्याचे हातानें अग्नीवर वस्त्र पडलें असून जळलें नाहीं, पुष्पें त्याणें चुरून टाकिलीं असतां पुन्हा टवटवीत होतात.

## अंजनीगीत.

केशी सांगे दमयंतीस ॥
मी पाहिलें बाहूकास ॥
विचारिलें कारण तयास ॥
येण्याचें येथें ॥ १ ॥
बाहुक वदला असें उत्तर ॥
दमयंतीचें पुन्हा स्वयंवर ॥
ऐकोनियां नरेश्वर ॥
पातला येथें ॥ २ ॥
ऐशीं ऐकोनी भाषणें ॥
मग पाहीलीं सर्व लक्षणें ॥
सांगतें तीं सुलक्षणे ॥
स्वामिणी तुजला ॥ ३ ॥
तृण काष्टी खालोनि फुंकर ॥
नसतां काढी वैश्वानर ॥
रिक्त घटा स्पर्शे नीर ॥
उत्पन्न करी ॥ ४ ॥
त्याचें हातें अग्नीवर ॥
पडतां नजळे कांहि अंबर ॥
पुष्पें चुरूनी सत्वर ॥
पुन्हा टवटवितीं ॥ ५ ॥

**दमयंती.** — ( केशीदासीस ह्मणते. ) हे चातुर्यभरिते, तूं जीं लक्षणें व कर्में सांगतेस तीं नलाचीं आहेत, यांत संशय नाहीं. आणखीं शोध करावा. हीं दोन्ही बाळकें नेऊन त्याचे दृष्टीस पाड बरें. मग त्याचें लक्षण स्पष्ट समजेल.

## श्लोक.

स्रग्धरा छंद.

केशीदासी मुखानें श्रवण करुन तीं लक्षणें बाहुकाचीं ॥
बोले तेव्हां नलाची रमणि नल खरा सांगशी तूं नकोंची ॥
आतां बाळें तुवांही सहज रिजवितां दावणें बाहुकाला ॥
पाहोनीयां जरी तो खचित अणिल गे पाणि त्या स्वाबकालों[2] ॥

## प्रवेश. ११

## बाहुस्थान.

## केशी, बाहुक.

( दमयंतीचे आज्ञेप्रमाणें बाळकें बाहुकाजवळ केशीनें नेलीं, तीं पाहतां बाहुकानें प्रेमभरानें ह्रदयीं आलिंगून वियोगदुःखानें डोळ्यांत अश्रु आणिले.

**केशीदासी.** — ( हें पाहून बाहुकास पुसते. ) तुह्मीं हीं बाळें प्रेमभरानें ह्रदयीं धरून रोदन कां करितां हें सांगा बरें ?

### ओवी.

केशी पुसे बाहुकाशीं ॥ हीं बाळकें ह्रदयाशीं ॥
कवटाळून कां रडण्याशीं ॥ देता मशीं सांगा त्वरें ॥ १ ॥

**बाहुक.** — ( केशीस सांगतो. ) हे दक्षमती केशिके, माझीं बाळें अशींच राजसें दूर देशांत घरीं टाकून मी प्रवाशी झालों. त्यांचें यांस पाहून स्मरण झाल्यामुळें डोळ्यास पाणी आलें. अपत्यमोह मोठा कठीण आहे. अनुभव असल्यास समजशील.

### आर्या.

बाहुक बोले केशी, माझीं दुरदेशिं दोन या सारीं ॥
बाळें सुंदर असती, यांचा घडला वियोग संसारीं ॥ १ ॥
त्यांचे वियोगदुःखें, नयनीं आलोट येत हें पाणी ॥
ऐसें बोलुन फिरवी, बालकपृष्ठीवरी सदा पाणी[3] ॥ २ ॥

---

१ कच्ची. २ स्वतांच्या नेत्राला. ३ हस्त.

## प्रवेश १२.

### दमयंतीचें मंदीर.

### दमयंती, केशी.

**केशीदासी.** — ( बाहुकाचें लक्षण ध्यानीं आणून तेथून बाळकें घेऊन निघाली आणि दमयंती पाशीं जाऊन ह्मणते. ) बाई साहेब, तो बाहुक नल खरा.

**दमयंती.** — केशी, तुझी पुर्ति खात्री झाली काय ?

**केशी.** — बाईसाहेब यांत काय संशय आहे, माझे कामाविषयीं बाईसाहेबांची खात्री नाहीं.

**दमयंती.** — केशी, हें खरें, माझे दासींत तूं कामावर भरंवसा ठेवण्याजोगी आहेस.

**केशी.** — बाईसाहेब, तुह्मी चतुर ह्मणून चाकराचे चाकरीची परीक्षा करितां.

**दमयंती.** — केशी, हें खरंचगे मूर्खांची सेवा करून फळ काय बरें ?

**केशी.** — तूं कुशल समजदार ह्मणून तुला शास्त्र प्रमाण सांगतें.

### श्लोक.

#### अनुष्टूप छंद.

अभ्रछाया तृणाग्नीच मूर्खसेवा स्थलेजलं ॥
वैश्या स्नेहः खले भीतिः षडेते बुधुदोपमाः ॥ १ ॥

बाईसाहेब तुह्मी सर्व शास्त्रविषय जाणता ह्मणूनच सेवकांस वागवून घेतां.

**दमयंती.** — केशी, हें सारें खरेंगे, पण पती वांचून सर्व गुणांची धूळधानी होते. नाहीं बरें ?

**केशी.** — बाईसाहेब ही गोष्ट खरीच आहे.

## प्रवेश १३.

### भीमकगृह.

### भीमक, ऋतुपर्ण, दमयंती, बाहुक.

**दमयंती.**— केशी, तुझे सांगण्यावरून बाहुक हा नलच आहे मी त्यास प्रत्यक्ष पाहाण्याचा विचार करितें.

**केशी.**— बाईसाहेब, फार चांगलें. यांतच कृतकार्य व्हाल.

**दमयंती.**— ( मातापित्यास ह्मणते. ) बाहुक हा नलच असा शोध समजतो. याजकरितां मला त्यास प्रत्यक्ष पाहण्याची आज्ञा व्हावी.

## पद.

( नैना कटारीरे ॥ लागीरे मेरीजान )
याठुंबरीच्या चालीवर.

हेमम जनकारे ॥ आज्ञा दे मजला ॥ धृ० ॥
शोध करुन केशी ॥ सांगतसे मज ॥ बाहुक नल ठरला ॥ १ ॥ तल्लक्षणानें ॥ नलचि असे तो ॥ त्याला पाहायाला ॥ २ ॥

**भीमकराजा.**— ( बाहुकास बलावून ह्मणतो. ) दमयंतीस तुला पाहवें वाटतें, तर तूं तिच्या मंदिरांत जा.

**बाहुक.** — ( आज्ञा वंदन करून ) उत्तम आहे.

## ओवी.

भीमक पाचारोन बाहुकास ॥ सत्कारोनी सांगे तयास ॥
तुह्मीं भेटा दमयंतीस ॥ ह्मणे तयास उत्तम तो ॥ १ ॥

## अभंग.

श्वशुराची आज्ञा वंदोनीयां शीरीं ॥
दमयंतीमंदीरीं प्रवेशला ॥ १ ॥
निज अंगनेशीं पाहोनी बाहुक ॥
मनामाजी शोक करीतसे ॥ २ ॥
पाहोनी बाहुका वोळखोनी निका ॥
करी मग शोका सती तेव्हां ॥ ३ ॥
दमयंती तेव्हां प्रार्थी ईश्वराशीं ॥
नल स्वरूपाशीं दावी देवा ॥ ४ ॥
तंव देववाणी गर्जे आकाशांत ॥
नको पाहूं अंत नला आतां ॥ ५ ॥

प्रगट करोनी आपुलीया रूपा ॥
हरी आतां तापा [1] वनितेच्या [2] ॥ ६ ॥

**बाहुक.**— ( देववाणी श्रवणकरून कर्कोटक नागाचें स्मरणकरित होत्साता त्याणें दिल्हेलें वस्त्र पांघरता झाला, तेव्हां तत्काल पूर्वीपेक्षां अधिक दैदीप्यमान नल प्रगट झाला. त्यास पाहून धांवत पदावर मस्तक ठेऊन स्फुंदस्फुंदून रोदन करूं लागली. )

## श्लोक.

ऐकोनी सुरवाणि बाहुक तदा अंगावरी घेतसे ॥
कर्कोटें दिधल्या प्रसाद वसना तत्काल होतें तसें ॥
झालें दिव्य शरीर खूण पटली धावोन पायीं मिठी ॥
तेव्हां ती दमयंति घालि कथना आली कथा ही मिठी [3] ॥१॥

## अभंग.

वियोगाचे दुःखा आठवोनी मनीं ॥
तेव्हां ती स्फुंदोनी भारी रडे ॥ १ ॥
नलें उचलोनी ह्रदीं आलिंगीली ॥
तेव्हां हारपली मान साधी ॥ २ ॥
अमरांनीं केली सुमनाची वृष्टी ॥
वाढली हे तुष्टि [4] राजालयीं ॥
राजा विदर्भ तो धावोनीयां आला ॥
भेटे जामाताला प्रेमें तेव्हां ॥ ४ ॥

**भीमकराजा.**— ( आपले घरीं मोठा उत्साह करून नल दमयंतीचें कल्याण कोणते रीतीनें होईल याचा विचार करिता झाला. )

## आर्या.

करि मग भीमक गेहीं, उत्साहातें सितोंहि [5] वाटितसे ॥
कन्या जामाताचे, कल्याणाचा विचार घाटितसे ॥ १ ॥
अभ्यंगातें करवी, लेववि भूषा तसें सुवासातें ॥

१ स्नेहा. २ स्त्रिच्या. ३ गोड. ४ संतोष. ५ साखर.

षड्रस भोजन घाली, विमांसहदे तया सुवासातें[1] ॥ २ ॥
कळतां सुवृत्त झाला, हर्षा[2] कुलजन विदर्भनगरांत ॥
झालें सुखद तयेतें, नल संयोगें प्रमोद नगरा[3]त[4] ॥ ३ ॥

**ऋतुपर्णराजा.**—( नल राजास भेटून ह्मणतो. ) मी न जाणून तुजपासून सेवा घेतली याविषयीं क्षमा असावी बरें.

## ओव्या.

ऋतुपर्ण नलरायास भेटून ॥ ह्मणे तूं तें मी न जाणून ॥
सेवा घेतली हें क्षमा करून ॥ राहे प्रसन्न मजवरी ॥ १ ॥

**नलराजा.**—( ऋतुपर्णाचें भाषण श्रवण करून ह्मणतो. ) याविषयीं तुमचेकडे काय आहे बरें ? माझ्या कालदशेनें दुसऱ्याचें दास्यत्व करायास लाविलें. तुह्मांस संकोच होण्याचें कारण नाहीं.

## ओवी.

नल प्रार्थी ऋतुपर्णाशीं ॥ तुह्मी खेद न करावा मानसीं ॥
माझी दशा होती तशी ॥ तुजपाशीं काढिली ॥ १ ॥

**ऋतुपर्ण.**— ( भीमक राजा व नलराजा यांचा निरोप घेऊन अयोध्येस गमन करिता झाला. )

**नलराजा.** — ( भीमक यास ह्मणतो. ) हे वडीलहो, आज वरीं विपरीत कालदशा होती; ती भोगून आतां उर्जित काल प्राप्त झाला, तर मी निजनगरास जाऊन पुष्करास द्यूत कर्मांत अगर युद्धांत जिंकून आपलें राज्य हरण करणार, त्यास मला निरोप दिल्हा पाहिजे.

## आर्या.

नल बोले श्वशुरातें, माझा विपरीत काल जो सरला ॥
पुष्कर युद्धीं जिंकिन, अथवा द्यूतीं हि वेल मज सरला ॥ १

**भीमकराजा.** — हे जामातारे, फार उत्तम आहे. ऐश्वर्यानिशी माझी सेना घेऊन जावें बरें.

---

१ चांगल्या हातें. २ हर्ष. ३ दागिने. ४ रात्रीं.

## ओवी.

भीमक ह्मणे आलें मना ॥ माझी घेऊनियां सेना ॥
येथोन जावें आनंदमना ॥ गुणसंपन्ना जामाता ॥ १ ॥

## प्रवेश. १४

## दमयंतीची खोली.

### दमयंती, सखी.

**दमयंती.** —( सखीस बलावून प्रेमानें पुसते. ) सखे, माझा पती मला घेऊन उदयीक जाणार. मजवर लोभ असूंदे बरें.

**सखी.**— बाई फार चांगलें, येथें आजवर मोठ्या दुःखांत होतीस.

**दमयंती.** — खरें गडे, त्या दुःखास पार व उपमा नाहीं.

**सखी.** — बरें बाई तुला ईश्वर लौकर पावला. आतां तूं आनंदांत आहेस. आमचे मनांत चार दिवस सुखाच्या गोष्टी करूं असें होतें. पण तूं लौकरच निघण्याची घाई केलीस.

**दमयंती.** — जाऊं नको तर कसें करूं बरें ?

**सखी.**— तें खरें. पण माझे घरीं जेवली नाहींस. मी उद्यां तुला भोजनास बलावणार होतें. पण तूं लौकर निघालीस. चार दिवस राहाशील तर चांगलें होईल.

**दमयंती.**— खरें गडे. पण मी आपले स्वाधीन आहे? ते नेतील तिकडे गेलें पाहिजे.

**सखी.**— पण तूं जर आपले पतीपाशीं बोलशील तर ते चार दिवस राहातील.

**दमयंती.**— हें बाई कुठून घडायाला, स्वारीसमोर बोलेल कोण? गडे, तुझा नवरा तुझे स्वाधीन असेल ह्मणून तूं ही गोष्ट मला सांगतेस.

**सखी.**— होय, स्वाधीन ह्मणजे काय ? मी जसें सांगेन तसें वागायाचें.

**दमयंती.**— खरें गडे, तूं फार सुगर, ह्मणून पतीस वश करून ठेविलास.

**सखी.**— असो बाई, आज तरीं रात्रीं भोजनास येतेस ?

**दमयंती.**— हें तरीं कसें घडेल? या भरीस पडूं नको. तुझी आस्था आहे तर तुला अनुकूल असेल तें फराळाचें दे. मार्गानें उपयोग करीन. ह्मणजे जेवल्यापेक्षां अधिक आहे.

## प्रवेश. १५
## निषध देश.
### नलराजा व पुष्कर.

**नलराजा.**— ( श्वशुरानें दिल्हेली सेना घेऊन सबालक स्त्री सहवर्तमान स्वदेशीं गेला, तेथें नगराबाहेर उतरून पुष्करास सांगून पाठविलें. ) हे दायादा, पुन्हा मशीं द्यूत खेळ; अगर युद्ध कर.

### ओवी.

श्वशुराची सेना संगें घेऊनी॥ सबालकभीमकनंदिनी ॥
स्वराज्या जवळ येऊनी॥ नल मनी विचार करी ॥ १ ॥
पुष्कराशी पाठवी सांगोन ॥ मजशी द्यूत खेळ मागुतोन ॥
किंवा करी युद्ध कंदन ॥ घेईन हिरोनी निज राज्य ॥ २ ॥

**पुष्कर.**— (द्यूत कर्माविषयीं प्रमुख जाणून, द्यूत खेळूं लागला. त्यांत सर्व राज्य हरविता झाला. नलानें आपलें राज्य ग्रहण करून त्यास एक ग्राम देऊन तो निजसत्तेंत ठेविला आणि पुष्कर जाऊन तेथें राहिला.)

### साक्या.

नलरायाचा निरोप ऐकुन पुष्कर तो अभिमानें ॥
बोले तेंव्हां नलरायाशीं द्यूतच मजला मानें ॥ १ ॥
तो समरंगणि डाव मांडुनी खेळे ह्राव भरानें ॥
त्या काळानें दरडावानें जय घे रायभरानें ॥ २ ॥
प्रमोद पोटीं मानि गोरटी भीमकजा वरसीला ॥
राज्य हिरोनी वैरी दवडुनि तो नलराव रसीला ॥ ३ ॥

एक ग्रामच त्याशीं अर्पुनि नैषध रक्षी त्याला ॥
अंगीकारु वैभव सारें कळवी नारि पित्याला ॥ ४ ॥

## श्लोक.

स्रग्धरा छंद.

अंगीकारोनि राज्या नल नरवर तो दाय याला हि रक्षी ॥
तो सन्मानास अर्पी नरपति सुमनें सर्व ठेवोनि साक्षी ॥
मोदें भार्या सुपुत्रांप्रति रिझवि सदां पाळि धर्मे प्रजाला ॥
शोभे भूमीवरी तो शिव वदति तया सर्वदा विघ्न त्याला ॥ १ ॥

## पद.

बहिरवी राग.

कछु कछू कहो मन लागारे ॥

या चालीवर

राज्य करी सुखें नलराजा रे ॥ धृ ॥
हरवुन द्यूतीं, दाय पुष्कर ॥
गृहण करी राज्य काजारे ॥ १ ॥
वैरी जिकुनि, राज्य हिरोनि ॥
सुख देई नल स्वप्रजारे ॥ २ ॥
संसारी ही सुख भोगिती ॥
नल आणि त्याची भाजारे ॥ ३ ॥

## प्रवेश १६.

### रंगभूमि.

### सूत्रधार व नट.

नट.— हे सूत्रधारा, तूं सुभग पापविमोचन सर्व नलाचें चरित्र याचा खेळ करून दाखविलास, तो पाहून सभासदांचे चित्ताचें रंजन झालें व पाहाणाराचें पाप दूर झालें. व रात्रीचें मान थोडें राहिलें या पुढें काय कर्तव्यता आहे त्याची आज्ञा कर.

**सूत्रधार.**— हे नट श्रेष्ठा, तुझें भाषण श्रवण करून मला फार आनंद व सूचना झाली; नलराजा याणें काल प्रतिकूल झाला असतां फारच क्लेश भोगून पुन्हा दमयंतीसहित राज्यवैभव पावून, हा नाशिवंत जो संसार त्यांत शृंगारादि सुखाचा अनुभव करून परलोक साधन केलें. आतां नाटक पूर्ण झालें.

## इतिश्री नलनाटक

## समाप्त.

---

## ओंव्या ग्रंथकर्त्याच्या.

परशुराम क्षेत्रीं अलौलिक ॥ वाकरूळ नामें ग्रामएक ॥
तेथें राहाणारा मी विनायक ॥ माहादेव पार्वती तोक असे ॥ १ ॥
मुंबई येथें सद्या राहुन ॥ नलनाटक यथामती कथन ॥
केलें हें पंडितां पाहुन ॥ द्यावा मान कथेसी ॥ २ ॥
चुकोन दोष असेल जरीं ॥ पंडित करोत नीट तरीं ॥
यथामति माझी वैखरी ॥ वदोन गेली स्वभावें ॥ ३ ॥
मार्गशीर्ष शुक्ल एकादशी ॥ शके सत्रार्शे न्याऐर्शी ॥
यादिनी ग्रंथपूर्णतेशी ॥ होवो रसिकांशीं रुचिकर ॥ ४ ॥
महाराष्ट्र जन प्रबोध कविता प्रसारक ॥ हि मंडळी गुणग्राहिक
यांचे आश्रयानें हें नलनाटक ॥ पूर्ण झालें यथामती ॥ ५ ॥

# LIST OF SUBSCRIBERS:

N. B. The Committee feel great pleasure to thank publicly the following gentlemen for their warmly supporting their cause. The names of the members of the Society are marked with an asterisk.

| | |
|---|---|
| Bhau Daji Esquire. G. G. M. C.; J. P. | 40 |
| Dhanjibhai Framji Esqr. J. P. | 20 |
| The Hon'ble Jagannathji Shankarshet J. P.<br>Vinayakrao Jagannathji Esqr. J. P. | 20 |
| His Highness Ramchandra Appasaheb, Chief of Jamkhindi. | 10 |
| Atmaram Madhavji Esqr. | 5 |
| Khanderaw Raste Esqr. Poona. | 5 |
| Narayan Dinanathji Esqr. J. P. | 5 |
| Narayan Wasudevji Esqr. | 5 |
| Wishwanath Atmaram Esqr. | 5 |
| * Atmaram Jagannathji Esqr. | 3 |
| * Narayan Ramchandra Esqr. | 3 |
| * Vinayak Moroji Zaoba Esqr. | 3 |
| * Wasudev Krishnanath Esqr. | 3 |
| Annesley J. T. Captain. | 2 |
| * Balkrishna Lakshmanji Esqr. | 2 |
| Bhau Shastri Esqr. Poona. | 2 |
| * Keroba Lakshmanji Esqr. | 2 |
| * Khanderao Moreshwar Esqr. | 2 |
| Krishnanath Raghunath Esqr. | 2 |
| Mahadev Govind Shastri, Rao Saheb. | 2 |
| Ramchandra Balkrishna Rao Bahadoor. J. P. | 2 |
| * Ramchandra Ganpatji Esqr. | 2 |
| Ramchandra Lakshmanji Esqr. | 2 |
| Sakharam Sitaram Esqr. | 2 |
| * Venktesh Atmaram Esqr. | 2 |
| Vinayak Krishnarao Esqr. | 2 |
| Vinayakrao Wasudevji Esqr. J. P. | 2 |

Vinayak Wasudevji Esqr. 2
Anandrao Balaji Esqr. 1
Anandrao Bhagvantrao Esqr. 1
Anandrao Bhau Esqr. 1
Anandrao Chapaji Esqr. 1
Anandrao Harishankar Esqr. 1
* Anandrao Vinayak Esqr. 1
Ananta Chandroba Esqr. G. G. M. C. 1
Appa Baji Josi Esqr. 1
Appaji Janardan Esqr. 1
Ashena Shivaji Esqr. 1
* Atmaram Balkrishna Esqr. 1
Atmaram Manik Esqr. 1
Atmaram Sadanandji Esqr. 1
Atmaram Sadanandji Esqr. 1
Atmaram Shivshankar Esqr. 1
Atmaram Sitaram Esqr. 1
Babaji Kashinath Esqr. 1
Babul Ambarnathji Esqr. 1
Babul Narayan Esqr. 1
Babul Raghunath Esqr. 1
Bajirao Bapuji Esqr. 1
Bajirao Tatia Raoji Esqr. 1
Bal Bapu Esqr. 1
Bala Mangesh Esqr. B. A. 1
Balaji Ganesh Esqr. Poona. 1
Balkrishna Damothar Esqr. 1
Balkrishna Raghoba Esqr. 1
Balkrishna Trimbak Esqr. 1
* Balkrishna Wasudev Dinanathji Esqr. 1
* Balkrishna Wasudev Narayan Esqr. 1
Balvant Ramkrishna Esqr. 1
Bamu Sakardande Esqr. 1
* Bapuji Narayan Esqr. 1
Bapuji Raghunath. Esqr. 1
Bhaskar Hari Bhagvat Esqr. 1
Bhaskar Nana Kantak Esqr. 1
Bazonji Burjorji Esqr. 1

| | |
|---|---|
| Bhagvantrao Dwarkanathji Esqr. | 1 |
| Bhagvantrao Bhowanishankar Esqr. | 1 |
| Bhai Ganoba Esqr. | 1 |
| Bhaironath Mangesh Esqr. | 1 |
| Bhaskar Bapu Josi Esqr. | 1 |
| Bhavan Mahadev Josi Esqr. | 1 |
| Bhawanishankar Raghavanand Esqr. | 1 |
| Bhikaji Ramchandra Esqr. | 1 |
| Calliandas Mohandas Esqr. | 1 |
| Chandrashekhar Moroji Esqr. | 1 |
| Chimnaji Rajaram Esqr. Mandlesar. | 1 |
| Chintaman Shivram Esqr. | 1 |
| Chintamanrao Bhaskarji Esqr. | 1 |
| Chintoba Bhaskarji Esqr. | 1 |
| Dadaji Narayan Esqr. | 1 |
| Dadaji Sitaram Esqr. | 1 |
| Dadoba Pandurang Rao Bahadoor | 1 |
| Daji Ramchandra Esqr. | 1 |
| Damothar Balkrishna Esqr. | 1 |
| Divakar Dadambhat Esqr. | 1 |
| Dhondu Govind Karbharkar Esqr. Goregav | 1 |
| Dhondu Shamrao Esqr. | 1 |
| Dhonda Sundar Esqr. | 1 |
| Dowlatrao Balkrishna Esqr. | 1 |
| Ganpat Anandrao Palekar Esqr. | 1 |
| Ganpat Mahadev Esqr. | 1 |
| Ganpatrao Mankoba Esqr. | 1 |
| Ganpat Shamrao Esqr. | 1 |
| * Ganpatrao Pandurangji Esqr. | 1 |
| Ganpatrao Narayan Esqr. Kelva Mahim. | 1 |
| Ganpatrao Shrikrishna Esqr | 1 |
| Ganpatrao Venkaji Esqr. | 1 |
| Gopinath Wasudevji Esqr. | 1 |
| Govind Narayan Esqr. | 1 |
| Govind Vishnu Esqr. | 1 |
| Govindrao Ramshankar Esqr. | 1 |
| Hari Bhagvant Esqr. | 1 |
| Harischandra Krishna Josi Esqr. | 1 |

Harischandra Harishankar Esqr. J. P. 1
Harischandra Naronji Esqr. 1
* Harischandra Shamrao Esqr. 1
Harischandra Withoba Esqr. 1
Harishankar Balcrishna Esqr. 1
Jagannath Shankar Shenvi Esqr. 1
Jagannath Vinayak Esqr. 1
Janardan Atmaram Esqr 1
Janardan Balkrishna Esqr. 1
Janardan Ramchandra Esqr. 1
Janardan Sakharam Gadgil. Esqr. 1
Javerilal Umiashankar Esqr. 1
Kashinath Moreshwar Esqr. 1
Kashinath Withoba Esqr. 1
Keroba Damothar Shenvi Esqr. 1
Keshav Vinayak Esqr. 1
Khanderao Chimanrao Esqr 1
Krishnaji Bapuji Bal Esqr. 1
Krishnanath Ambarnathji Esqr. 1
Krishnanath Balkrishna Esqr. 1
Krishnanath Raghav Sowmitra Esqr. 1
Krishnanath Raghunath & Brothers Esqrs. 1
Krishnarao Ganesh Esqr. 1
Lakshman Dowlutrao Esqr. 1
Lakshman Jagannath Esqr. 1
Lakshman Makundji Esqr. 1
Lakshman Wishwanathji Esqr. 1
Madhavrao Haritrimbakji Esqr. 1
Madhavrao Janardanji Esqr. 1
Madhavrao Lakshmanji Esqr. 1
Madhavrao Shamrao Esqr. 1
Maininath Ganpatrao Esqr. 1
* Madsudan Harischandra Esqr. 1
Mairal Ganesh Shastri Esqr. 1
Merwanji Cowasji Esqr. 1
Moroba Balaji Esqr. 1
Moroba Harischandra Esqr 1
Moroba Jagannath Esqr. 1

| | |
|---|---|
| * Moroba Jivaba Esqr. | 1 |
| Moroba Kesharinath Esqr. | 1 |
| Moroba Sunderji Esqr. | 1 |
| Moroba Vinoba Esqr. | 1 |
| Moreshwar Janardan Esqr. G. G. M. C. | 1 |
| Moreshwar Ramchandra Esqr. | 1 |
| Moroji Kashinath Esqr | 1 |
| Motabhai Anandrao Esqr. | 1 |
| Nana Bapu Josi Esqr. | 1 |
| Nana Bhau Esqr. | 1 |
| Nana Dwarkanathji Esqr. | 1 |
| Nana Govindraoji Esqr. | 1 |
| Nana Ramchandra Esqr. | 1 |
| Nana Ramchandra Esqr. | 1 |
| Nanabhai Dinanathji Esqr. | 1 |
| Nanu Sundar Esqr. | 1 |
| Narayan Amritrao Esqr. | 1 |
| Narayan Dhondoba Esqr. | 1 |
| Narayan Kashinath Esqr. | 1 |
| Narayan Keshav Esqr. | 1 |
| Narayan Lakshmanji Esqr. | 1 |
| Narayan Mahadev Esqr. | 1 |
| * Narayan Raghoba Esqr. | 1 |
| Narayan Raghunathje Esqr. | 1 |
| Narayan Pandurang Esqr. | 1 |
| Narayan Sheshadri Rev. | 1 |
| Narayan Trimbakji Esqr. | 1 |
| Narayan Vishram Esqr. | 1 |
| Narayan Wasudev Naik Esqr. | 1 |
| Narmadashankar Lalshankar Esqr. | 1 |
| Nilkanth Narayan Esqr. | 1 |
| Niloba Ganpatji Esqr. | 1 |
| * Pandurang Balibhadra Esqr. | 1 |
| Pandurang Bapuji Esqr. | 1 |
| Pandurang Gopalji Esqr. | 1 |
| Pandurang Lakshmanji Esqr. | 1 |
| Pandurang Sakharam Esqr. | 1 |
| Pandurang Sundarji Esqr. | 1 |
| | 1 |

Parkar. M. S. Esqr. 1
Raghoba Narayan Esqr. 1
Raghunath Janardan Esqr. 1
Raghunath Ramchandra Esqr. 1
Ramchandra Atmaram Esqr. 1
Ramchandra Govind Pai Esqr. 1
Ramchandra Govindji Esqr. 1
Ramchandra Jagannath Esqr. 1
Ramchandra Moreshwar Esqr. 1
Ramchandra Pandurang Esqr. 1
Ramchandra Purshottamji Esqr. I
Ramchandra Sakharamji Esqr. 1
* Ramchandra Sundarji Esqr. 1
Ramnath Pandurang Esqr. 1
Rav Pandurang Esqr. 1
Ravji Pandurangji Esqr. 1
Ravji Sakharam Esqr. 1
Rustomji Hormusji Esqr. 1
Sadanand Madhavrao Esqr. 1
Sadanand Moroji Esqr. 1
Sadanand Purnanund Esqr. 1
Sadashiv Balcrishna Esqr. 1
Sadashiv Gopal Esqr. 1
Sadashiv Keshav Esqr. 1
Sadashiv Purshottam Esqr. 1
* Sadashiv Shivram Esqr. 1
Sadashiv Wiswanath Esqr. 1
Sagun Atmaram Esqr. 1
Sakharam Anandrao Esqr. 1
Shamrao Jagannath Esqr. 1
Shamrao Kashinath Esqr. 1
Shamrao Sadanandji Esqr. 1
Shankar Pandurang Pandit Esqr. 1
Shantaram Lakshman Esqr 1
Shantaram Mangesh Esqr. 1
* Shantaram Narayan Esqr. 1
Shantaram Withal Esqr. L. M. 1
Shivshankar Muloji Esqr. 1

Sitaram Balaji Esqr. 1
Sitaram Jivaji Esqr. 1
Sokar Bapuji Esqr. 1
Sundar Keroba Esqr. 1
Sundarrao Bhaskar Esqr. 1
Suryaji Sadashiv Mahatme Esqr. 1
Tatia Sakharam Esqr. 1
Trimbakrao Anandrao Esqr. 1
Trimbakrao Bapuji Esqr. 1
* Vasantrao Balmakundji Esqr. 1
* Vasantrao Wasudevji Esqr. 1
Vasudev Abaji Esqr. 1
Vasudev Canoba Esqr. 1
Vasudev Crishna Shenvi Esqr. 1
* Vasudev Jagannath Esqr. 1
Vasudev Sadanand Esqr. 1
Vinayak Bajirao Esqr. 1
Vinayak Balkrishna Esqr. 1
Vinayak Janardan Kirtane Esqr. 1
Vinayak Madhavrao Esqr. 1
Vinayak Moroji Esqr. 1
Vinayak Pilaji Esqr. 1
Vinayak Sadanand Esqr. 1
Vinayak Shricrishna Esqr. 1
Vinayak Sitaram Esqr. 1
Vinayak Wishwasrao Esqr. 1
Vinayakrao Harischandra Esqr. 1
Vishnu Ganesh Esqr. 1
Vishwanath Jagannath Esqr. 1
Vishveshwar Bhavanishankar Esqr. 1
Vishwanath Yashvant Esqr. 1
* Vithoba Crishnarao Esqr 1
Vithoba Esoba Esqr. 1
Vitthul Gopal Pendharkar Esqr. Nagotne 1
Vitthul Wasudev Esqr. 1
Wilson J. Doctor Rev 1
Yashvantrao Ramchandra Esqr 1